साप्ताहिक

12 जानेवारी ८५/2 रुपये

# माणूस



## काँग्रेस: स्थापन होण्यापूर्वी

## राजीव गांधींचं आर्थिक-औद्योगिक धोरण: जैसे थे ?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : तेहतिसावा

¤

१२ जानेवारी १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस


१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

राजू देशपांडे



# मुंबापुरी

## □ आमचं काय चुकलं ?

हल्ली आम्हाला फार वाईट दिवस आलेत. आमची फार कुचंबणा होतेय. केवढे व्याकूळ, कष्टी आहोत आम्ही. त्या गौतम बुद्धाला अन् परवीण बाबीलाही इतकं भयाण दुःख सोसावं लागलं नसेल. पण ते पडले पॉश लोक. आम्ही काय ? फाइव्ह पैसा कॉईन ! आपलेच हात उलटे, दुसरं काय ?

हो. हे सगळं घडलंय हातामुळेच. परवाच्या निवडणुकीत आमचे सगळे अंदाज तद्दन खोटे ठरवून कॉंग्रेस (आय)च्या हाताने बाजी मारली. आम्ही सारे ऊठसूट प्रत्येकाला छातीठोकपणे सांगत होतो की, राजीव गांधींना ही निवडणूक तशी कठीणच जाईल. जेमतेम अडीचशे तीनशे जागा मिळतील. पण या पठ्ठ्या राजीवने आम्हाला चांगलाच हात दाखवला. आता जो तो उठतो तो आमची खिल्ली उडवतो. दुसरं कोणीच भेटलं नाही यांना.

आमचं नेमकं कुठे चुकलं ते तुम्हीच सांगा. शंकरराव चव्हाण नांदेडमध्ये आपटी खाणार असं चव्हाणांनी नॉमिनेशन भरलं त्या दिवसापास्नं जो तो सांगत होता. आम्ही ते खरं मानलं. बुजुर्ग पत्रकार कधी खोटं बोलेल का ? बाळशास्त्री जांभेकर आणि नरसिंह चिंतामणि केळकर यांच्या थोर परंपरेचे हे पाईक. ह्यांचा अंदाज कधी खोटा ठरेल का ? म्हणून आम्ही प्रत्येकाला बिनधास्त सांगत सुटलो की, शंकरराव चव्हाण, वसंत साठे पडणार, अंतुले प्रचंड लीडने येणार. आता अंतुले पडले आणि चव्हाण–साठे निवडून आले तो काय आमचा गुन्हा ?

आता लोक म्हणतात की, आम्हा पत्रकारांचा रियॅलिटीशी सुतराम संबंध नाही. भले शाब्बास ! आता एकदम रियॅलिटीवर घसरलात होय ? इतके दिवस आम्ही मानेवर जू ठेवून बातम्या लिहून काढत होतो. त्यात वास्तवाचा कुठे औषधापुरताही संबंध नव्हता. तेव्हा कुणी हाकाटी केली नाही. अन आता एखाद्या निवडणुकीचे काही अंदाज ढासळले, थोडं इकडचं तिकडे झालं तर एकदम रियॅलिटीचा मुद्दा काढता लेकोहो ?

रियॅलिटी केवढी प्रचंड अन् प्रखर असते हे तुम्हाला सांगून पटायचं नाही. त्या एसेम जोशींना विचारा. वास्तव हे डोळे दिपवून टाकणारं असतं असं ते नेहमी सांगतात. (स्मिता पाटील नावाच्या अल्लड, चुणचुणीत, राष्ट्र सेवा दलाच्या महान परंपरेत वाढलेल्या मुलीने सुनिल दत्तचा प्रचार करून आंतरभारतीचं स्वप्न साकार केलं हे सुद्धा एक डोळे दिपवून टाकणारं सत्यच, हो की नाही अण्णा ? )

लोकांना धगधगीत रियॅलिटीचा एकदम त्रास होऊ नये म्हणून आम्ही कागदी कंदिल लावत होतो. कित्ती, कित्ती छान फुलाफुलांसारखं लिहित होतो. सगळ्यांना आवडेलसं. गुबगुबीत, मस्त. थोडं इकडचंही अन् थोडं त्या तिकडचं. सगळ्यांना खूष करणारं. बच्चा भी खेले और बच्चेका बाप भी. एका पानावर घटस्फोटितांचे जळजळीत, भेदक वगैरे अनुभव. तर उजव्या हाताला डिग्जेमच्या जाहिरातीतली पदर टाकून उभी असलेली नवयौवना. पब्लिक आमच्या रिपोर्टिंग स्किलवर फिदा होती. रियॅलिटी–बियॅलिटीचा मुद्दा कोणी काढत नव्हता. आम्ही साऱ्यांनी मिळून एक छान फेर धरला होता. वर पुन्हा आम्ही परखड, बाणेदार वगैरेही होतोच. तेरी भी चूप. मेरी भी चूप.

आता सगळे कुत्सितपणे बोलतायेत. परवा दारात पेपरची लाईन टाकणारा शेंबड्या मुलगा माझ्याकडे बघून पकपक दात विचकून गेला. इतकं जीवाला वाईट वाटलं सांगू.

तरी बरं आम्ही आमचे निवडणुकीचे अंदाज कुठे छापले नाहीत. नाही तर गहजब

झाला असता हो! विरोधी पक्षाला झुकतं माप दिलं असतं तर देशबुडवे पत्रकार म्हणून धिंड काढली असती लोकांनी. कॉंग्रेस (आय) ची लाट येईल असं लिहिलं असतं तर ढोलबडवे पत्रकार म्हणून शिक्का पडला असता. अन आमच्या हृदयाला वेदना झाल्या असत्या. म्हणून आम्ही तोंडीच टिमकी वाजवली. अन थोडक्यात वाचलो. तेरी भी चूप. मेरी भी.

आता आम्ही वर पुन्हा सांगायला मोकळे, की राजीव गांधी चारशेचा मार्क ओलांडतील हे आम्हाला आधीपास्नं ठाऊक होतं. मग लिहिलं का नाहीत? अहो, कसं लिहिणार? न्यूज एडिटर छापायला तयार नव्हता. तुम्ही आता हसताय. पण पब्लिकला हे आस्ते–आस्ते पटेल. अन आमची अन रियॅलिटीची पुन्हा एकदा मस्त फारकत होईल. पुन्हा आम्ही फेर धरून नाचायला लागू. तुमच्याभोवती. पुन्हा सगळं कसं छान छान. तेरी भी चूप. मेरी भी चूप.

## □ हा कार्यक्रम कसा वाटतो?

सध्या आम्ही राजकारणाचा विचार सोडून दिलाय. पॉलिटिक्सवर लिहून लिहून काय इतकं लिहिणार? तेव्हा आता आम्ही आमचा मोहरा कल्चरकडे वळवलाय. परवा एशियाटिक सोसायटीतनं एनसीपीएत जातेवेळी (ही आमच्या प्रगल्भ सांस्कृतिक जाणिवेची झलक) आम्हाला एक नामी कल्पना सुचली. म्हणजे मऱ्हाटी संस्कृतीचं दालन अधिक समृद्ध कसं होईल याचा सर्वांगीण विचार करताना आम्हालाही योजना सुचली. ती अशी:

यंदाचं वर्ष महाराष्ट्र राज्याचं रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. त्यात महाराष्ट्राने अठ्ठेचाळीसपैकी त्रेचाळीस जागा कॉंग्रेस (आय) ला देऊन 'देशकी अखंडता और एकता' मजबूत केली आहे. पुन्हा राजीव गांधींसारखा दैदिप्यमान नेता मिळालाय. वर आणखीन कॉंग्रेसचं हे शतसंवत्सरीचं साल. तेव्हा राज्य शासनाने शिवाजीपार्कवर एक जंगी सोहळा घडवून आणावा. कार्यक्रमाची स्थूल रूपरेषा अशी असावी :–

१) महाराष्ट्र गीत :– 'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा' हे गाणं नजिया हसन, जोहेब हसन, उषा अय्यर आणि शेरॉन प्रभाकर गातील. पॉप किंवा रॉक स्टाईलने. याच तालांवर बाळासाहेब विखे पाटलांच्या लीडरशिपमध्ये लेझिम नृत्य असावे.

२) नंतर राजकपूर, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, संजय दत्त प्रभृती मंडळींनी 'चरखा चला चलाकर लेंगे स्वराज्य लेंगे' हे गाणं डिस्को पद्धतीने पेश करावे.

३) निर्मला ठोकळ, प्रभा राव, प्रेमलाकाकी चव्हाण, प्रमिलाबेन याज्ञिक स्वागतगीत गातील. नंतर मुख्य कार्यक्रम.

४) महाराष्ट्रातील वेगवेगळ्या नद्यांच्या पवित्र जलाने भरलेला मंगल कलश मिरवणुकीने शिवाजी पार्कवर आणावा. मिरवणुकीचं नेतृत्व वसंतदादा, धीरूभाई अंबाणी, श्रियांसप्रसाद जैन, नवल टाटा करतील. या सगळ्यांनी कॉंग्रेस (आय) चा पंजा असलेल्या गंज्या घालाव्यात.

(या मिरवणुकीवेळी लोकांच्या हळुवार भावना उचंबळून येण्याचा खतरा इंडियन मार्केटिंग रिसर्च ब्यूरोला आढळेलच. तेव्हा उचंबळून आल्यावर लोकांनी काय काय करावं याचं प्रात्यक्षिक पोलीस आयुक्त ज्युलियो रिबेरो यांनी दूरदर्शनवर करून दाखवल्यास बरे.)

या अमृत कलशावरोबरच एक विशेष अश्रू कलश असो द्यावा. ह्यात वेळोवेळी उद्भवलेल्या सहानुभूतीच्या प्रसंगाचे पब्लिकचे खास अश्रू साठवलेले असतील. याला सहानुभूती कलश असंही म्हणता येईल. मिरवणुकीप्रसंगी जर एखाद्याला भावनावेग झाला तर त्याचे अश्रू या कलशात साठवण्यात यावेत. 'बूंद बूंदसे देशकी रक्षा' असं ह्या कलशावर लिहावे. म्हणजे लोकांना बरं वाटेल.

**सांस्कृतिक कार्यक्रम :**

नाट्यप्रवेश –

मानापमान – पुष्पा भावे / वसंत साठे.

संशयकल्लोळ – बाळासाहेब ठाकरे / प्रमोद महाजन

एकच प्याला – माधव गडकरी (सोलो)

खडाष्टक – जगन्नाथराव जोशी / मोहन धारिया

राणीचा बाग – समस्त विरोधी पक्षनेते

तो मी नव्हेच – रामराव आदिक.

'हिंदू सारा एक' या परिसंवादात सी. डी. ऊमाचेन, अस्लम शेर खान, युसूफ पटेल, नज्मा हेपतुल्लाह यांनी भाग घ्यावा. मधूनमधून सुधीर फडक्यांनी 'हिंदू सारा एक' हे थीमसाँग हळुवार आवाजात गायल्यास वातावरण तरल आणि सेक्युलर बनेल.

'सरकारी फ्लॅट कसा मिळवावा' या विषयावर भक्ती बर्वे आणि उत्तमराव पाटील अनुभवाचे बोल बोलतील.

'अस्सा नवरा सुरेख बाई' या लडिवाळ, हळुवार कार्यक्रमात शालिनीताई पाटील व छाया दातार यांनी भाग घ्यावा.

मध्येच पार्वतीबाई मलगोंडा बडबडगीते गाऊन दाखवतील. भाई सावंत व एस. एन. देसाई 'ठाणे–मुंब्रा–कल्याणाची ओलांडून खाडी, आलो कोंकण गाडी दादा आली कोंकण गाडी' हे गीत साभिनय गाऊन दाखवतील.

राम पंडागळे यांच्या 'मुक्काम पोष्ट दामूपाडा' या धगधगीत, भेदक आत्मनिवेदनाचा प्रकाशन सोहळाही याच शुभदिवशी करून टाकावा. वक्त्यांची काळजी नको. हवे तितके मिळतील.

'अपना हाथ जगन्नाथ' या नव्या धडाकेबाज हिंदी पिक्चरचा मुहूर्त व्हावा. मुख्य भूमिका अर्थातच खासदार बच्चन. त्यांची हिरॉइन – जयललिता. खानदानी वळणाचे वडील एम्. जी. आर. सोशिक आई वैजयंतीमाला आणि भाऊ (सख्खा की सावत्र, ते अद्याप कॉम्प्युटरने ठरवायचंय) सुनिल दत्त.

पत्रकारांची एक फ्री–स्टाइल कुस्ती ठेवावी अशी एक सूचना आहे. पत्रकारांचे दोन गट करावेत. एक देशबुडवे पत्रकार. दुसरे ढोलबडवे पत्रकार; पण आम्हाला यात काही खास रस वाटत नाही. कारण होणार तसं काहीच नाही. रोमहर्षक वगैरे कुछ नही. फक्त आरडाओरड भयंकर होईल आणि एखादा जोडा इकडचा तिकडे गेला तर बस्स. इतकंच. आणि शेवटी सुरतेच्या कॉंग्रेसमध्ये असेच जोडे फेकले गेले होते या गोड आठवणीने तृप्त होत्साते दोन्ही गटातले पत्रकार घरी जातील.

असो. कार्यक्रम कसा काय वाटतो, कमलाकर सोनटक्के?

## □ तरीच!

'येत्या निवडणुकीत सगळ्या कागदी वाघांचा साफ धुव्वा उडेल.'

– चंद्रशेखर. डिसेंबर १९८४ च्या एका मुलाखतीत.

– तरीच सगळ्या शोभिवंत डरकाळ्या शांत झाल्या.

–विष्णू जयदेव

राजधानी दिल्ली

# मराठी मुलांचे हरवलेले 'रूट्स'

निशिकांत मिरजकर

मराठा मित्र मंडळ या संस्थेनं चालवलेल्या 'चौगुले शिशुविहार विद्यालय' या शाळेच्या मॅनेजिंग कमिटीची नुकतीच सभा झाली. सध्या ही शाळा आठवीपर्यंतच आहे, पुढच्या वर्षी नववी आणि दहावी सुरू व्हायची आहे. त्या अनुषंगानं येणाऱ्या जबाबदाऱ्यांचा विचार सभेत केला गेला. आणि एक महत्त्वाचा ठराव संमत करण्यात आला. तो असा की नववी, दहावीसाठी मराठी या विषयाचीही आपण सोय व्यवस्था करायची.

या ठरावाला खरोखरीच महत्त्व आहे.

सध्या या शाळेत आठवीपर्यंत मराठी हा एक अनिवार्य विषय म्हणून शिकवला जातो. शाळेमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त मुलं मराठी मातृभाषा नसलेली–हिंदी किंवा पंजाबी मातृभाषा असलेली–अशी आहेत. ती सगळी हौसेनं मराठी शिकतात.

पण नववी–दहावीला मराठी शिकवायचं म्हणजे तो वैकल्पि विषयक ठेवावा लागणार आहे. हिंदी किंवा संस्कृत किंवा मराठी अशी एक भाषा आपल्या आवडीप्रमाणं निवडण्याचं स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना राहील.

दिल्लीमध्ये तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम् इत्यादी सर्व भाषा अशा तऱ्हेनं पूर्वीपासूनच नववी, दहावीला वैकल्पिक स्तरावर शिकवल्या जातात. खूप विद्यार्थी त्या भाषा घेतात. शिकतात. पुढे अकरावी–बारावीलाही घेतात. साहजिकच कॉलेजमध्येही त्यांना बी. ए. साठी या भाषा घेता येतात.ज्या भाषा शिकवण्याची सोय कॉलेजांमध्ये केलेली नसेल, त्या भाषांचे बी. ए. चे वर्ग विद्यापीठात आधुनिक भारतीय भाषाविभागातर्फे घेतले जातात.

मराठीसाठीदेखील नववीपासून बी. ए. पर्यंतचा सर्व अभ्यासक्रम तयार आहे. पुस्तकं नेमलेली आहेत. दरवर्षी परिक्षेकरिता पेपर–सेटर्सची नावंही निश्चित होतात पण पेपर निघत नाहीत. कारण मराठी घेणारे कुणी विद्यार्थीच नसतात. तशी सोयच कुठल्या शाळेमध्ये केलेली नसते. पहाडगंजमधल्या 'नूतन मराठी विद्यालयानं' पूर्वी तो उपक्रम करून पाहिलेला होता; पण पालक आपल्या मुलांना मराठी घेऊ देत नाहीत, असा अनुभव आला.

इथंच तर खरी गोम आहे.

दिल्लीतल्या बहुसंख्य मराठी भाषिकांना आपण मराठी असण्याविषयी आणि खासकरून मराठी भाषेविषयी एक विचित्र गंड आहे. तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम् या भाषा बोलणारी माणसं आपापसात बोलताना आपापल्या भाषेतच बोलतात. इतरांशी बोलताना शक्यतो इंग्लिश आणि अगदी नाइलाजानं हिंदीचा वापर करतात. बंगाली माणसं इतरांशी आवर्जून कौतुकानं हिंदी आणि सफाईदार इंग्लिश बोलतात; पण आपापसात बोलताना बंगालीचा निःसंकोचपणे वापर करतात. आणि पंजाबी तर हिंदीऐवजी पंजाबीच नेहमी पसंत करतात. पंजाबी ही दिल्लीची सेकंड लॅंग्वेजच बनलेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मराठी माणसं एकदम वेगळी वागताना दिसतात. आपापसात बोलतानाही त्यांना मराठीपेक्षा इंग्लिश किंवा हिंदीचा उपयोग करणं जास्त स्वाभाविक आणि जास्त प्रतिष्ठितपणाचं वाटतं. दोन तमिळ किंवा कन्नड किंवा बंगाली एकमेकांना अचानक रस्त्यात किंवा बसमध्ये भेटल्यावर, किंवा एकमेकांशी फोनवर बोलताना अगदी सहजपणे आणि अपरिहार्यपणे आपापल्या भाषेमधेच बोलू लागतात; तसं दोन मराठी माणसांचं नेहमी होईलच असं नाही. केवळ मराठी माणसंच जिथं सदस्य आहेत, अशा एखाद्या मंडळाचं, समितीचं किंवा संस्थेचं कामकाजही नेहमी मराठीमधूनच होईल असं आढळत नाही. आमची दोन मुलं तमिळ शाळेत आहेत, आणि धाकटा मुलगा मराठी शाळेत आहे. (म्हणजे अनुक्रमे तमिळ आणि मराठी संस्थेनं चालवलेल्या इंग्लिश माध्यमाच्या शाळेत) तर त्या दोन्ही शाळांमध्ये येणारा अनुभव बोलका आहे. तमिळ शाळेच्या कार्यालयाकडे सगळे कर्मचारी कुठल्याही अपरिचित पालकाबरोबर बोलताना आधी तमिळमध्ये बोलायला सुरुवात करतात, आणि मग समोरच्याला तमिळ येत नाही असं लक्षात आलं की इंग्लिशमध्ये बोलू लागतात. या उलट मराठी शाळेतले कर्मचारी अपरिचित पालकाशी आधी हिंदीतनंच बोलायला सुरुवात करतात, आणि तो माणूस मराठीतनं बोलायला लागला तरच मराठीत बोलतात. नाहीतर दोघांनाही परस्परांचं मराठीपण लक्षात आलं, तरी देखील कित्येकदा त्यांचं संभाषण हिंदीतनंच चालू राहतं. फार कशाला, घरीसुद्धा आपल्या मुलांशी लाडालाडात हिंदीतून किंवा इंग्लिशमधून बोलणारे मराठी पालक दिल्लीमध्ये हवे तेवढे पहायला मिळतात. आपल्या मुलांना चांगलं मराठी बोलता येत नाही, त्यांच्या तोंडी हिंदी आणि इंग्लिश शब्दच सारखे येतात याचं त्यांना साभिमान कौतुक वाटतं. दरवर्षी दिल्लीत बाल-पुस्तक-मेळा भरतो. एक वर्षाआड पुस्तक–जत्रा असते. त्यावेळी मराठी पुस्तकं विकत घेऊन आपल्या मुलांना वाचायला द्यावी, असं इथल्या फार थोड्या मराठी बांधवांना वाटतं. सेंट्रल गव्हर्नमेंटची 'तुलसी ग्रंथालय' ही लायब्ररी किंवा महाराष्ट्र परिचय केंद्राची लायब्ररी इथं मुलांनी आवर्जून वाचण्यासारखी सुंदर सुंदर मराठी पुस्तकं पुष्कळ आहेत; पण यांचे सदस्य ती वाचण्यासाठी आपल्या मुलांना उद्युक्त करताना फारसे आढळत नाहीत. परिणामी दिल्लीतल्या बहुसंख्य मराठी मुलांना मराठी वाचन किंवा लेखन एकतर जमत नाही, किंवा त्याचा कंटाळा असतो. महाराष्ट्रातल्या आजी-आजोबांचं किंवा काका–काकींचं पत्र ती वाचू शकत नाहीत, मग त्यांना मराठीतनं पत्र लिहिणं तर दूरच.

दिल्लीत राहिल्यावर शिक्षण इंग्लिश (किंवा हिंदी) माध्यमातनं मिळणं हे अपरिहार्यच आहे. 'माझे सर्व शिक्षण माझ्या मातृभाषेतून मला मिळाले असते, तर माझ्या

आयुष्याची वीस वर्षे तरी वाचली असती ' हे लोकमान्यांचे उद्गार इथं केवळ अनाठायी; पण शिक्षण इंग्लिशमधनं घेतलं तरी मराठी ही एक समर्थ आणि सुंदर भाषा आहे, त्या भाषेत अमृताशी पैजा जिंकणारं मधुर काव्य ज्ञानेश्वर–नामदेवांनी लिहिलं, रामजोशी–परशरामांनी त्या भाषेचा नाचरा रूपविलास शब्दांकित केला, केशवसुत–मर्ढेकरांनी तिचं आशयलक्षी सामर्थ्य नव्या रेषांनी अधोरेखित केलं, या भाषेत 'रणांगण 'सारखी कादंबरी, 'स्मृतिचित्रां 'सारखं आत्मचरित्र, 'नटसम्राट' सारखं नाटक आणि 'काजळमाया 'सारख्या कथा निर्माण झाल्या, वगैरे गोष्टी या मुलांना केव्हा तरी समजायलाच हव्यात. ती तर मराठी संस्कृतीची चौकट आहे. आपले रूट्स त्यात आहेत. असायला हवेत. मराठीपासून मराठी मुलांना वंचित ठेवलं, तर हे रूट्स ती विसरून जातील. त्यापासून दुरावतील. दिल्लीमध्ये ती उपरी राहतील. आणि स्वतःची ओळखही हरवून बसतील.

केव्हातरी कुणी तरी पुढाकार घेऊन हे दुष्टचक्र थांबवायला हवं होतं.

केवळ दिल्लीतल्या मराठी मुलांचीच ही समस्या आहे, असं नाही. तर आजच्या झपाट्याने औद्योगिकीकरण झाल्यानं आणि बदलत्या गतिमान राजकीय स्थित्यंतरांमुळं आपणा सर्वांचेच रूट्स एकेक करून सुटत तुटत चाललेले आहेत. अगतिक बनण्याची पाळी यायच्या आत उरलेसुरले रूट्स तरी घट्ट पकडून ठेवायला हवेत.

'चौगुले शिशु विहार 'च्या मॅनेजिंग कमिटीच्या सभेत बसलो असताना हे सगळे विचार माझ्या मनात घोंघावत होते. नववी दहावीसाठी मराठीची सोय करणं हा एक अतिशय सामान्य वाटणारा उपक्रम माझ्या दृष्टीनं एका मोठ्या सांस्कृतिक जतनाचं छोटंसं प्रतीक होता.

दिल्लीसारख्या राजधानीच्या ठिकाणं येऊन पडलेल्या मराठी माणसांच्या अनुभवसृष्टीतली एक पोकळी त्या निमित्तानं माझ्या मनात स्पष्टपणानं चमकून गेली.

—निशिकांत मिरजकर

## ह्या ना त्या निमित्ताने

# 'मी आधीच म्हटलं होतं'

फिरोझ रानडे

'मी आधीच म्हटलं होतं की, इंदिरा काँग्रेसला ८० टक्के मतं म्हणजे जवळजवळ ४०० जागा मिळणार म्हणून' असे राधा म्हणाली आणि एखादा माणूस हतबुद्ध झाला म्हणजे डोक्याला हात लावतो तसे व तितके हतबुद्ध होऊनसुद्धा श्यामला डोक्याला हात लावायचे भान राहिले नाही.

गेले दोन दिवस राधाने हे वाक्य ७–८–१० वेळा म्हटले होते; पण आताची मात्र कडी होती.

हे दोन दिवस श्याम–राधाचे घरात एकच गोंधळ माजला होता. निवडणुकीची खास बातमीपत्र द्यायला सुरुवात झाल्यापासून ती ती देणे संपेपर्यंत हा गोंधळ चालू होता.

प्रथम खालचा तरुण कामत व त्याची तेवढीच तरुण बायको आले. त्यांच्याकडे दूरदर्शन होता पण तो नेहमीप्रमाणे महत्त्वाचे प्रसंगी बंद पडला होता. शेजारच्या स्वातंत्र्य-सैनिक बर्व्यांकडे दूरदर्शन होता व चांगला चालू पण होता; पण त्यांची सून आणि मुलगा बर्व्यांशी कोणत्याही बाबतीत चर्चा करत नसत वा त्यांना मतप्रदर्शन करू द्यायला उत्साहित पण करत नसत.

त्यांना श्याम व राधा आवडत कारण श्याम त्यांच्या सगळ्या गोष्टींना होला हो करत असे व राधा त्यांच्याशी प्रत्येक बाबतीत वाद घालत असे. तेव्हा बर्वेपण त्या गोंधळाचे दिवशी आले होते.

दुसऱ्या बाजूचे शेजारी कर्वे कचेरीतून थोडे लवकर आले होते. त्यांच्याकडे दूरदर्शन नव्हता. दूरदर्शन न घेण्याचे कारण ते 'मुलं बिघडतात, त्यांचा अभ्यास होत नाही' असे सांगत. मात्र खालचा कामत कर्व्यांनी दूरदर्शन न घेण्याचे कारण त्यांचा जातीसिद्ध कंजूषपणा असल्याचे सगळ्यांना सांगत असे.

प्रथम कर्वे एकटेच आले. कारण कर्वेबाईंना संध्याकाळचा स्वैपाक करायचा होता म्हणजे कुकरमध्ये भात लावायचा होता. थोड्या वेळाने त्या पण आल्या.

कर्वेबाई आल्यावर श्यामची कळी खुलली. नेहमी क्रिकेट मॅच वगैरे कर्वेबाईंना समजून सांगताना श्यामला फार मौज वाटत असे. कर्वेबाई नेहमी अगदी मौलिक व बुनियादी प्रश्न विचारत असत.

आजसुद्धा तसेच झाले. एकतर कर्वेबाईंचा कोणती पार्टी व कोणता उमेदवार ह्याचा फार गोंधळ होत होता. त्यांना तर प्रथम असे वाटत होते की, सगळे सिंग लोक एका पक्षाचे असतात व ते चरणसिंगाच्या पक्षात असतात म्हणून; पण जेव्हा इंदिरा काँग्रेसचे काही सिंगलोक निवडून आल्यावर त्यांना फार आश्चर्य वाटले व निवडणुकीत काही तरी गोंधळ होत असावा असे त्यांच्या मनाने घेतले. मग श्यामने त्यांना वेगवेगळ्या सिंगातला फरक समजावून सांगितला.

त्यामानाने राधाला काही समजून सांगण्यात श्यामला फार मौज वाटत नसे. कारण समजून सांगणे झाले की, ते मला माहीतच होते म्हणून राधा सांगत असे.

असा गेल्या शुक्रवारी संध्याकाळी ५॥ वाजता सुरू झालेला हा गोंधळ शनिवारी १२–१२॥ वाजता संपला. वर्ष संपण्याआधी शिल्लक राहिलेली सुट्टी संपवावी म्हणून श्याम घरीच होता. बर्वे स्वातंत्र्य-सैनिक नेहमीच घरी असत. कर्वे व कामत कचेरीतून मुद्दाम लवकर आले होते. साधारण ५–५। पर्यंत सगळे लोक जमले होते.

राधाने फर्मास चहा केला होता. साधारणपणे ती दूरदर्शन बघायला येणाऱ्या लोकांकरता चहा वगैरे बनवत नसे; पण आज निवडणुकीच्या निकालाचा दिवस! पाच वर्षांने एकदा येणार. तेव्हा प्रसंगाचे

महत्त्व जाणून राधाने चहा केला होता. चहामुळे त्या गोंधळाला चांगलीच गोडपणे सुरुवात झाली.

भारतातल्या बाकी सगळ्या जनतेप्रमाणे ही मंडळीसुद्धा काय निकाल लागणार ह्याबद्दल साशंक होती.

कामत इंदिरा काँग्रेसचा होता. त्याच्या मते इंदिरा काँग्रेसला अगदी भरघोस यश मिळाले नाही तरी कामचलावू यश तरी मिळेल असे होते. कर्वे काँग्रेसचे जुने कार्यकर्ते. मनापासून त्यांचा कल मोरारजी वगैरे जुन्या पुढाऱ्यांकडे होता; पण इंदिराजींनी त्यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून दंड नाही. तनखा द्यायला सुरुवात केली होती व वेळोवेळी त्यात वाढपण केली होती. तेव्हा ते हल्ली-हल्ली इंदिरा काँग्रेसला खरी काँग्रेस मानायला लागले होते.

कर्वे म्हणजे पूर्वाश्रमीचे खाकी हाफ्-पँट-वाले. त्याची सगळी मते पक्की व ठाम असत. भाजपचे सगळेच्या सगळे म्हणजे २००–२२५ उमेदवार निवडून येणार याची त्यांना खात्री होती. मध्ये नानांच्या 'राजीवचे हात पक्के करा' पत्राने त्यांची मनोवृत्ती थोडी बावरली होती; पण ती तेवढ्यापुरतीच.

झालं. चहा वगैरे पिऊन झाला. परीक्षेच्या निकालाप्रमाणे सगळे दूरदर्शनकडे डोळे व कान लावून बसले होते. एकामागून एक निकाल येऊ लागले. प्रथम काँग्रेसला १२३ का काही जागा मिळाल्याचे जाहीर झाले. त्याबरोबर इतक्या जागा काँग्रेसला मिळणार होत्या असे मी म्हटलेच होते, असे राधा म्हणाली. मग जसजशा २००,२५०,३०० जागा मिळाल्याचे जाहीर झाले त्या त्या वेळी-सुद्धा इतक्या जागा मिळणार असे मी म्हटलेच होते असे ती निर्धावपणे सांगू लागली. त्या बाबत ती अगदी कोणा मराठी दैनिकाच्या संपादकाप्रमाणे निर्धावलेली वाटत होती. कोणी संपादकाने नाही का सांगितले की काँग्रेसला ३५० च्यावर जागा मिळणार म्हणून मी म्हटलेच होते म्हणून? पण ते सगळे पुढे.

काँग्रेसला पन्नास टक्क्यापेक्षा जास्त जागा मिळाल्याचे जाहीर होताच कामत आनंदाने ओरडला. नेहमीच्या वेळी तो असा ओरडला नसता व त्याला कोणी ओरडूही दिला नसता; पण युद्धात व निवडणुकीत सगळे काही चालते ह्या म्हणीप्रमाणे कामतचे ओरडणेही चालून घेतले गेले. आता स्वातंत्र्य सैनिक कर्वे स्वतःला प्रछन्नपणे इंदिरा काँग्रेसचे म्हणवून घेऊ लागले.

कर्व्यांचा चेहरा नेहमीच पडल्यासारखा असे. त्यामुळे ह्या निकालांमुळे त्यांचा चेहरा किती जास्त पडला आहे वा पडतो आहे ते कळत नसे. भाजपचा कोणी हरला की कर्वेबाईंना फार आनंद होत असे. ह्याचा अर्थ भाजपने कर्वेबाईंचं काही घोडं मारलं होतं असं नाही; पण ज्या गोष्टीचा कर्व्यांना आनंद होत असे त्यात त्यांना दुःख वाटायचे व त्यांना ज्या गोष्टीचं दुःख होत असे त्याचा कर्वेबाईंना आनंद होत असे. जगात किती तऱ्हेचा दुष्टपणा असू शकतो नाही?

पण जेव्हा अटलबिहारी बाजपायी हरल्या-बद्दल बातमी आली त्या वेळी मात्र वातावरण खूप तंग झाले होते. जेथे जमलेल्या लोकांना त्यातल्यात्यात बाजपायींबद्दलच आदर होता. राधासुद्धा 'बाजपायी हरणार असे मी आधीच म्हटले होते' म्हणायचे विसरून गेली होती.

कर्व्यांची पोझिशन फारच अवघड झाली. तीन–चार वर्षापूर्वीच कर्वे वगैरे मंडळींनी मुंबईत त्यांची 'शोभा–यात्रा' काढली होती. पुढले पंतप्रधान होणाऱ्यांच्या बारीत त्यांना बसवले होते. आपण लोकांनी बाजपायींना बारीत बसवण्यात फार घाई तर केली नाही ना? असा त्यांना प्रश्न पडला. आता भाजपचे अध्यक्ष हरले म्हणून दुःख मानावे की पेशव्यांच्या एका सरदाराचा नातू–वा खापरपणतू निवडून आला म्हणून आनंद मानावा असाही त्यांना प्रश्न पडला.

असं होता, होता जसा मुंबईत धुम–धडाक्याचा पाऊस पडतो तशा काँग्रेसला जागा मिळू लागल्या. कुठे २६ पैकी २६, कुठे ९८ पैकी ७५, कुठे ४८ पैकी ४३ जागा त्यांना जाहीर झाल्या. हैद्राबादमध्ये काही जागा तेलगु–देशमला व काश्मिरमध्ये तीनच्यापैकी तीन जागा फारुक अब्दुल्लाच्या पक्षाला मिळाल्याचे जाहीर झाले. पण त्याच्याकडे कोणाचे लक्ष नव्हते. आता जवळजवळ सगळेच 'आम्ही असे होणार असे आधीच म्हटले होते' म्हणू लागले.

मुंबईत गुणवंत व नामवंत लोक पडले होते. घराणेशाहीला विरोध असतानासुद्धा रोझाबाईंनी आपल्या वडलांच्या जागेवर उभे रहाण्याचे धाडस दाखवले होते. पण दुर्दैवाने त्यांचं धाडस लोकांना आवडलं नव्हतं. सुनील दत्ताच्या सिनेमाला कोणी गेलं नसतं. कदाचित्; पण मतं मात्र त्याला दिली गेली होती.

दत्ताजी सामंत मात्र ऐतिहासिक दत्ताजी शिंद्यांप्रमाणे लढले होते. पण त्यांच्याप्रमाणे हार न पत्करता मोठ्या मताने जिंकून त्यांनी गळ्यात यशोमाळ घातली होती. दत्ताजी सामंत आततायी आहेत येथपासून तो त्यांना कामगार चळवळीचे रहस्य समजले नाही आहे येथपर्यंत त्यांच्यावर टीका झाली होती. पण त्यांनीच कामगारात गेले ५–५० वर्षे काम करणाऱ्या डाव्या पुढाऱ्यांची सुट्टी केली होती.

इतकी मोठी इंदिरा–राजीव लाट येऊन गेली. पण तिने सामंतांचे काही बिघडवले नव्हते. ती लाट सामंतांचे, शरद पवारांचे व मधु दंडवत्यांचे फक्त पाय धुऊन गेली.

अशी कधी कौतुक, कधी राग, कधी लोभ वगैरे रसात चर्चा होत होती. आपण म्हटले होते त्याप्रमाणे निवडणुकीचे निकाल लागत आहेत म्हणून राधाला उत्साह आला होता. ती सढळपणे चहा करत होती. आता त्या बरोबर खायचे पण केले होते.

मधूनमधून दु. द. वर लोकांच्या प्रतिक्रिया घेण्याचा भाकड कार्यक्रम चालू होता. दू. द. ला अशा वेळी फक्त सामान्य लोकच का मिळावेत ह्याचे श्यामला आश्चर्य वाटत होते. ह्याचा अर्थ सामान्य लोकांच्या प्रतिक्रियेला महत्त्व नाही असे नाही. पण बुवा श्रीपाद अमृत डांग्यांची वा जे. आर. टाटांची वा जयंत नारळीकरांची वा सुनील गवासकरची मुलाखत घ्यावी. त्यांची प्रतिक्रिया समजून घ्यावी असे ह्या दू. द. च्या लोकांना कसे ध्यानात येत नाही बरे?

आता काँग्रेसने जिंकलेल्या जागांचा आकडा ऑस्ट्रेलिया वा वेस्ट इंडीजच्या स्कोअरसारखा वाटू लागला. त्यांची टक्केवारी वाढू लागली.

पण ह्याचबरोबर आंध्र प्रदेशात २५ पेक्षा जास्त जागा तेलगू देशमला मिळाल्या आहेत. तेथे नरसिंहराव, ब्रह्मानंद रेड्डी आणि चार–पाच मध्यवर्ती सरकारातले मंत्री हरले

मलपृष्ठ १ वर

## राजीव गांधींचे सरकार

# नेतृत्त्व नवे, पण धोरणे जुनीच ?

शिरीष सहस्रबुद्धे

घरात नवी सून आली म्हणजे लहानथोर सगळेच तिच्याकडनं काही ना काही अपेक्षा करीत असतात. बदलत्या कुटुंबव्यवस्थेत तर या अपेक्षा फक्त ती कशी वागेल एवढ्यापुरत्याच मर्यादित नसून ती आपल्याला कशी वागवील याबद्दलही असतात. राजीव गांधी आणि त्यांच्या नव्या सरकारची अवस्थासुद्धा काहीशी या नव्या सुनेसारखीच आहे. त्यातनं राजधानी नवी दिल्लीमध्ये आपल्या अपेक्षा पुऱ्या न करणारी सून चार सहा महिन्यातच जाळून मारायची प्रथा आहे हे लक्षात घेतल्यानंतर तर राजीव सरकारच्या बऱ्या वाईटाची अंमळ जास्तच काळजी वाटल्याखेरीज राहात नाही; पण या झाल्या फार पुढच्या विवंचना. सध्या तर नव्या सरकारच्या मधुचंद्राचाच हंगाम चालू आहे, तेव्हा हे सरकार आणि आपल्या अपेक्षा याबद्दल एकदम निराश किंवा फार आशाळभूत न होता काही वस्तुनिष्ठ विचार करायला हवा आहे. विशेषत: आर्थिक आणि औद्योगिक आघाडीवर राजीव आणि कंपनी नववर्षानिमित्त काय भेट आपल्याला देईल असा प्रश्न अनेकांच्या मनात उभा राहणं स्वाभाविक आहे.

असा प्रश्न मनात यायचं कारण असं की राजीव गांधी यांची स्वत:ची अशी काही आर्थिक विचारप्रणाली आहे असं अनेकजण गृहीत धरताहेत. काही जण त्यापुढे जाऊन असंही मानतात की ही विचारसरणी इंदिराजींपेक्षा खूपच जास्त अमेरिका धार्जिणी असणार आहे. साहजिकच निष्कर्ष असा निघतो की अमेरिकन भांडवलासाठी आणि एकंदरीतच बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी देशाचे दरवाजे सताड उघडले जाणार. परदेशी भांडवलाच्या बेलगाम आयातीमुळे गुलामगिरीची प्रवृत्ती बळावणं, देशी कारखानदारीची कुचंबना आणि आर्थिक-औद्योगिक क्षेत्रात नव्या वसाहतवादाचा प्रादुर्भाव असे धोके संभवतात.

हे असं खरोखरच होईल का या प्रश्नाचं उत्तर देताना प्रथम राजीव गांधी यांच्या मर्यादा लक्षात घ्यायला हव्यात.

**एक :** राजीव गांधी हे काही मोरारजीभाई देसाई यांच्याप्रमाणे कट्टर उजव्या किंवा भांडवलशाहीवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते म्हणून प्रसिद्ध नाहीत. त्यांची पूर्वपीठिका आणि अलिकडची वक्तव्यं यापैकी कशातूनच तसा निष्कर्ष निघत नाही.

**दोन :** अमेरिकन किंवा इतर बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांशी राजीव गांधी यांचे लागेबांधे असल्याचा काहीच विश्वसनीय पुरावा अद्याप उपलब्ध नाही. न्या. तारकुंडे यांनीही पुण्याच्या त्यांच्या सत्कारसभेत आपला अंदाज म्हणून या तऱ्हेचं निराधार विधान केलेलं आहे. माजी न्यायाधीशसुद्धा पुराव्याखेरीज निष्कर्ष काढायला लागले ही नवलाची बाब! खरं पाहता असे काही हितसंबंध जोपासायला श्री. गांधींना काय किंवा बहुराष्ट्रीय उद्योगांना काय अजून पुरेसा वेळच मिळालेला नाही. दोन वर्षानंतर त्यांची युती होईल की काय याबद्दल तर्कवितर्क रचायला आपण मोकळे आहोत; पण आता अशा हितसंबंधाचं अस्तित्व ठळकपणे दिसत नाही हे मान्य करायला हवं.

**तीन :** राजीव गांधी काहीसे अचानकपणे पंतप्रधान झाले असले तरी त्यांची परंपरा (ऊर्फ घराणेशाही) त्यांच्या मागे आहे. एखाद्या धूमकेतूप्रमाणे भुरटेपणानं त्यांचा उदय झालेला नाही. इंदिराजींनी १९८० नंतर त्यांना हाताशी धरलं ते पंतप्रधान करायच्या हेतूनंच. हा मधला प्रशिक्षणकाळ थोडा कमी असला तरी इंदिराजींच्या राज्यपद्धतीची मूलतत्त्वं लक्षात यायला पुरेसा होता. त्या तत्त्वांच्या चौकटीशी एकदम फारकत घेऊन राजीव गांधी वागतील किंवा मोठे निर्णय घेतील हे निदान सुरुवातीच्या काळात तरी संभवत नाही.

इंदिराजींच्या या राज्यपद्धतीतलं एक तत्त्व अमेरिकेकडे संशयानं नि सावधगिरीनं बघणं हे होतं. अमेरिकेतही रिपब्लिकन पक्ष सत्तारूढ असेल तेव्हा तेव्हा हिंदुस्थानविषयी असाच पवित्रा घ्यायची रीत आहे. हा दृष्टिकोन उभयपक्षी निवळायचा म्हटलं तरी ती दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे आणि ती पुरी झाल्याखेरीज अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्या हिंदुस्थानात येणं शक्य वाटत नाही. जवळपासच्या आशियाई राष्ट्रांचा आणि त्यात रुजलेल्या अमेरिकन भांडवलाचा इतिहास पाहिला तर असं लक्षात येईल की एखादा देश राजकीयदृष्ट्या अंकित होतो आहे याची खात्री करून घेतल्याखेरीज अमेरिकन भांडवलदार त्यात शिरत नाही. आता राजीव गांधी राजकीय क्षेत्रातही अमेरिकेचे मांडलिक व्हायला धडपडतील आणि परिणामी बहुराष्ट्रीय कंपन्या हिंदुस्थानात घुसतील, इतकं भलंमोठं भाकित कुणाला करायचं असलं तर तो विनासूत स्वर्गाला जायचा प्रकारच म्हणायला हवा. राजीव गांधी हे सीआयएचे हस्तक वगैरे असल्याचा आरोप त्यांच्यावर अगदी निवडणूकप्रचाराच्या रणधुळीतसुद्धा कुणी केलेला नाही, हे या ठिकाणी लक्षात घ्यायला हरकत नाही.

**चार :** राजीव गांधी एकदम वेगळं काही तरी करून दाखवतील अशी कुणाला आशा तर कुणाला भीती वाटते. या दोन्हीवर पाणी ओतायचं काम राजीवजींनी मंत्रिमंडळाच्या रचनेच्याद्वारा करून ठेवलंच आहे. इंदिराजींच्या कार्यपद्धतीच्या मूलभूत तत्त्वांशी राजीव गांधी एकदम फारकत घेणार नाहीत. घेऊ शकणारही नाहीत, याचा तो एक पुरावाच. या मंत्रिमंडळात नावीन्य कमी, आणि सातत्याचा धागा जास्त आहे. एरवी मुख्यमंत्री म्हणून अकार्यक्षम ठरलेले व जनतेनं झिडकारलेले बिहारचे अब्दुल गफूर व आंध्रचे टी. अंजय्या यांचा नव्या पंतप्रधानांनी जीर्णोद्धार केला तो कशासाठी ? संसदीय लोकशाहीत जे जे म्हणून दुरित (इव्हिल) असू शकतं त्याचा अव्वल नमुना ठरलेले

बन्सीलाल हे बदनाम गृहस्थ ज्या मंत्रिमंडळात रेल्वेखात्यासारख्या महत्त्वाच्या अडणीवर बसवले जातात, त्या मंत्रिमंडळाला नवं म्हणण्यात कितपत अर्थ आहे ? त्याच्याकडून एकदम नवं, ताजं काही घडेल अशी अपेक्षा बाळगायला कितीशी जागा आहे ? निरनिराळ्या क्षेत्रातले तज्ज्ञ मंत्रिमंडळात घेतले जाणार अशी जी आवई उठली होती, तिच्यावर विश्वास ठेवणारे फसलेच की नाही ?

### बदल नाही, फक्त अंमलबजावणी

या तीन आणि अशा इतर नामांकित माणसांना राजीव गांधींनी मंत्री का केलं याचं पोस्टमार्टम आता करायचं म्हटलं तर करता येईल; पण त्यातनं निष्पन्न हेच होईल की, ज्या चौकटीत इंदिराजी काम करीत होत्या, त्याबाहेर जाणं राजीवना सध्या तरी जमण्यासारखं नाही. उदाहरणार्थ आपल्या पक्षातल्या सगळ्या उपपक्षांना खूष ठेवण्यासाठी इंदिराजींना करावी लागणारी धरसोड नि कसरत यातनं राजीवचीही सुटका होणार नाही. आणि नाटकमंडळीतले नट जुनेच असले तर निव्वळ मालक बदलले म्हणून त्यांची अभिनयशैली बदलते थोडीच ? राजीव मंत्रिमंडळालाही हाच न्याय लागू आहे. राजीव गांधी यांच्या या चार मर्यादा लक्षात घेतल्या तर असं अनुमान काढावंसं वाटतं की, आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात त्यांच्या हातून काही आमूलाग्र बदल व्हायची शक्यता नाही, चांगलाही नाही किंवा वाईटही नाही. विशेषत: परदेशी भांडवल देशात आणणं हा चांगलाच मूलभूत निर्णय त्यांच्याकडून सध्या तरी घेतला जाण्याची शक्यता नाही. अशी काही गोष्ट ते करतील याचं कुठलंच चिन्ह त्यांच्या दोन महिन्यांच्या नेतृत्वकालात दिसलेलं नाही.

या अनुमानाला निव्वळ राजीवच्या क्षमतेवरच्या मर्यादा एवढा एकच आधार नाही. इतरही घटक जबाबदार आहेत. त्यातला महत्त्वाचा असा : आपलं आर्थिक– औद्योगिक धोरण हे परराष्ट्रीय धोरण किंवा संरक्षणविषयक धोरण यांच्याप्रमाणेच राष्ट्रीय स्वरूपाचं धोरण आहे. काळाच्या नि सत्ताबदलाच्या कसोटीवर तसं सिद्ध झालेलं आहे. एखाद्या पंतप्रधानाचं, अर्थमंत्र्याचं किंवा उद्योगमंत्र्याचं व्यक्तिगत मत काहीही असलं तरी त्याचा प्रभाव मर्यादित प्रमाणात पडतो. धोरणाची मूलभूत चौकट सहसा बदलत नाही नि बदलली जातही नाही, कारण देशांतर्गत स्थैर्याचा प्रश्न त्यात गुंतलेला असतो.

परराष्ट्रीय धोरणाचंच उदाहरण पाहू. या विषयीच्या धोरणाची घडी बसवली गेली ती पं. नेहरूंच्या अमदानीत. इंदिराजींनी वेळप्रसंगी कडक नि व्यवहारी भूमिका स्वीकारली तरी अलिप्ततेवर आधारलेली मूळ धोरणाची बैठक कायम ठेवली. अरब राष्ट्रांना पाठिंबा

---

## ....एसीसी आणि तिचे

ज्या एसीसीच्या बोनस शेअर प्रकरणाने मुंबई स्टॉक एक्सचेंज आणि देशभराचा शेअरबाजार गदगदा हलवला, तिच्याबद्दल थोडी माहिती घ्यायला हवीच.
एसीसी म्हणजे असोशिएटेड सिमेंट कंपनीज् लि. ची स्थापना झाली १९३६ मध्ये. तिचं मुख्य कार्यालय मुंबईत आहे अन् प्रख्यात कायदेपंडित श्री. नानी पालखीवाला हे एसीसीचे अध्यक्ष आहेत. सिमेंटच्या उत्पादनाबरोबरच रिफॅक्टरीज्, सिमेंट– उत्पादक यंत्रसामग्री आणि रासायनिक खतं यांचीही निर्मिती एसीसी करते. सिमेंटच्या उत्पादनाविषयी तांत्रिक सल्लामसलत देण्याचं कामही करते. एसीसी हा सिमेंटचा भारतातला सर्वात मोठा उत्पादक उद्योग. देशात सतरा ठिकाणी त्यांचे कारखाने आहेत आणि एकूण नोकरवर्ग तीस हजारांपेक्षा जास्त आहे. भारतात वर्षाला निर्माण होणाऱ्या एकूण सिमेंटपैकी बत्तीस टक्के, म्हणजे जवळजवळ एक तृतियांश वाटा एसीसीचा असतो. देशातल्या खाजगी क्षेत्रातल्या उद्योगांची क्रमवारी लावली तर एकूण जायदादीच्या दृष्टीने एसीसीचा नंबर तिसरा लागतो आणि विक्रीच्या आकड्यांनुसार सातवा लागतो.
एसीसीच्या भागधारकांची संख्या बासष्ट हजाराच्या आसपास आहे आणि १९८३ मध्ये कंपनीनं त्यांना वीस टक्के लाभांश (डिव्हिडंड) दिला होता. १९८० नंतर एसीसीच्या शेअरचा बाजारभाव दरवर्षी चांगलाच कडाडत असल्याचं स्टॉक एक्सचेंजचा कानोसा घेतल्यानंर समजतं. याच वर्तुळात हेही बोललं जातं की, एसीसीची आर्थिक आघाडीवरची कामगिरी भक्कम आहे आणि त्यामुळे बोनस शेअर्स इश्यू करायची कंपनीची निश्चितच पात्रता होती. या संदर्भात साहजिकच मनात येतं की, एखादी कंपनी बोनस शेअर्स केव्हा देऊ शकते ? या संबंधातल्या कायदेशीर तरतुदी काय आहेत ?
कॅपिटल इश्यूज् (कन्ट्रोल) अॅक्ट १९४७ यानुसार बोनस शेअर देऊ इच्छिणाऱ्या कंपनीला प्रथम केंद्रीय सरकारची परवानगी घ्यावी लागते. ती द्यायचा अधिकार कन्ट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज् यांना आहे. केंद्र सरकारनं ऑगस्ट १९८१ मध्ये त्यासाठी सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यातली पहिली अट अशी की राखीव निधीचं भागभांडवलात रूपांतर करण्यासंबंधीची तरतूद कंपनीच्या घटनेतच असली पाहिजे. नसल्यास कंपनीच्या सर्वसाधारण सभेनं तशी तरतूद अगोदर केली पाहिजे. तसंच बोनस शेअर देण्यासाठी परवानगी अर्ज करण्याअगोदर सर्वसाधारण सभेनं तसा ठराव केलेला असला पाहिजे. कंपनीच्या नफ्यातून राहिलेली गंगाजळी किंवा मुक्त राखीव निधी (फ्री रिझर्व्ज) यांच्या पोटीच बोनस शेअर्स देण्याची परवानगी मिळेल. बोनस शेअर इश्यू हा कंपनीचं भागभांडवल वाढवण्याचा मार्ग असल्यामुळे लाभांश न देता बोनस शेअर्स देण्याची परवानगी मिळणार नाही. उलट बोनस शेअर्स दिल्यानंतरच्या वर्षी आपण किती टक्के लाभांश देऊ शकू हे कंपनीनं नमूद करायला हवं. या तरतुदींचा हेतू हाच की मूळच्या भागधारकांच्या हिताचा बळी देऊन आपलं भागभांडवल विस्तारण्याचे उद्योग कंपन्यांनी करू नयेत. याच प्रकारची आणखी एक तरतूद म्हणजे कंपनीनं आपल्या कर्मचाऱ्यांना असलेली देणी (उदा. भविष्यनिर्वाह निधीला मदत,

नि इस्त्राइलला मान्यता नाही, हे या धोरणाचं मुल्य अंग होतं. पुढे जनता पक्षाची राजवट आली, नि अटलबिहारी वाजपेजी दोन अडीच वर्षे परराष्ट्रमंत्री राहिले. त्यांचा मूळ पक्ष जनसंघ हा अरबविरोधी नि इस्त्राइलशी मैत्री ठेवू इच्छिणारा; पण म्हणून वाजपेयींना तसं करता आलं नाही, एवढंच नव्हे तर इस्त्राइलच्या प्रतिनिधीची भेट घ्यावी लागली तीसुद्धा चोरून छपूनच. वाजपेयींनाही जाणवलं असेल की, सत्तेबरोबर जबाबदारीही येते आणि नेहरूंनी एक विशिष्ट धोरण स्वीकारलं, राबवलं ते अरबांविषयी त्यांना उपजत प्रेम नि ज्यूंविषयी द्वेष होता म्हणून नव्हे, तर आपल्या विकसनशील देशाची तेलाची वाढती गरज नि त्यामुळे अरब देशांवरचं आपलं वाढतं परावलंबन या गोष्टी लक्षात घेता अरबांना दुखावून चालणार नाही म्हणूनच. राजकीय पक्षाचं धोरण नि राष्ट्रीय धोरण यातला फरक हा असा असतो. विरोधी पक्ष म्हणून तत्वाचा आग्रह धरणारेसुद्धा सत्ताधारी म्हणून व्यवहाराची कास सोडू शकत नाहीत. जनता राजवटीत प्रंतप्रधान मोरारजीभाई, परराष्ट्रमंत्री वाजपेयी, अर्थमंत्री एच. एम. पटेल आणि अमेरिकेतले राजदूत नानी पालखीवाला हे चौघेही कमीजास्त प्रमाणात अमेरिकेबद्दल स्नेहभाव नि रशियाबद्दल दुरावा/संशय बाळगणारे होते.तरीसुद्धा ना अमेरिकेनं पाकिस्तानऐवजी आपल्यावर प्रेमवर्षाव केला, ना अमेरिकन भांडवलदारांना हिंदुस्थानात मुक्त प्रवेश मिळाला. त्याचीच दुसरी बाजू ही की जॉर्ज फर्नांडिससारखा कट्टर डावा नेता उद्योगमंत्री झाला तरी कोकाकोलासारखा अपवाद वगळता बहुराष्ट्रीय कंपन्याही सरसकट मोडीत निघाल्या नाहीत किंवा देशी मक्तेदार-भांडवलदारांचंही शेपूट काही वाकडं झालं नाही. राष्ट्रीय धोरणावर एखाद्या व्यक्तीचा प्रभाव कितपत पडू शकतो याचा अंदाज या उदाहरणांवरनं बांधता येईल. या सगळ्या मंडळींना जे साध्य झालं नाही ते राजीव गांधी यांच्यासारखा काहीसा नवशिका नि ताठर पूर्वग्रह नसलेला नेता करून दाखवील नि तेही तडकाफडकी करील असं म्हणणं हे कल्पनेला खूपच जादा वाव दिल्यासारखं होईल.

मुळात हे लक्षात घ्यायला हवं की, परदेशी भांडवलदारांना आपल्या देशात मोकळं रान देणं ही काही एका व्यक्तीच्या अखत्यारीतली बाब नव्हे. त्यासाठी काही यंत्रणा नि पद्धती आहे नि मोनॉपलिज् अ‍ॅन्ड रिस्ट्रिक्टिव्ह ट्रेड प्रॅक्टिसेस (एम्आर्टीपी) अ‍ॅक्ट व विशेषत: फॉरिन एक्सचेंज रेग्युलेशन अ‍ॅक्ट (फेरा) यासारखे कायदेही आहेत. पंतप्रधानांनी या सगळ्याला वळसा घालायचं ठरवलं (जसं इंदिराजींनी आपले सन्मित्र स्वराज पॉल यांच्या हौसेसाठी एल्आयसी नि रिझर्व बँकेला वेठीला धरून एस्कॉर्टस् कंपनीला कोंडीत धरलं होतं.) तर त्याची दखल

## बोनस शेअर्स....पार्श्वभूमी

ग्रॅच्युइटी, बोनस) भागविल्याशिवाय तिला बोनस शेअर्स इश्यूची परवानगी मिळणार नाही.

तीन वर्षातून एकदाच बोनस शेअर्स इश्यू करता येतील.

एका बोनस शेअर्स इश्यूमुळे गंगाजळीतून भागभांडवलात एकावेळी रूपांतरित होणारी रक्कम कंपनीच्या मूळच्या भरणा झालेल्या भागभांडवलापेक्षा जास्त असता कामा नये.

एका इक्विटी शेअरमागे जास्तीत जास्त एकच बोनस शेअर देता येईल.

बोनस शेअर दिल्यानंतर शिल्लक उरणारी गंगाजळी (फ्री रिझर्व्ज), वाढीव भरणा झालेल्या भागभांडवलाच्या किमान चाळीस टक्के तरी असली पाहिजे.

मागच्या तीन वर्षांचा सरासरी करपूर्व नफा एवढा असला पाहिजे की बोनस शेअर्स दिल्यानंतर वाढणाऱ्या एकूण भागभांडवलावर किमान दहा टक्के तरी लाभांश देता आला पाहिजे.

या मुल्यत: आर्थिक स्वरूपाच्या निर्बंधांचा विचार केला तर त्यातून कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत असल्याखेरीज भागभांडवल वाढवण्याचा मोह कंपनीच्या व्यवस्थापनाला होऊ नये याची दक्षता घेण्याचा उद्देश स्पष्ट होतो, नि स्वागतार्हच आहे.

या निकषांवर एसीसीचा विचार केला तर असं दिसतं की कालमर्यादेच्या दृष्टीनं त्यांना १९८४ मध्ये बोनस शेअर द्यायला हरकत नव्हती. यापूर्वीचा बोनस शेअर त्यांनी १९८४ मध्ये दिला होता. म्हणजे जून ८३ अखेर त्यांनी तीन वर्षांची मर्यादा ओलांडली होती.

इतर निकषांप्रमाणे सुमारे तेहतीस कोटी रुपये इतकी रक्कम गंगाजळीतून काढून एसीसी बोनस शेअर्ससाठी वापरू शकत होती आणि त्यानंतर त्यांचं एकूण भरणा झालेलं भागभांडवल सहासष्ट कोटी रुपये म्हणजे मूळच्या भांडवलाच्या दुप्पट झालं असतं. या वाढीव भांडवलावरही वीस टक्के लाभांश कायम ठेवण्याची हमी एसीसीनं दिली होती. निदान दर पाच इक्विटी शेअर्समागे दोन बोनस शेअर्स देण्याइतकी तरी पात्रता एसीसीजवळ निश्चितच होती. तीन बोनस शेअर्स दिले असते तरी कंपनीच्या अर्थव्यवस्थेला धक्का पोचला नसता. कर्मचारी अथवा सावकार यांना देणे असलेल्या रकमा कंपनीने बुडवल्याचे उदाहरण नाही. अर्थात १९८३-८४ मध्ये कंपनीच्या नफ्यात घट झाली होती ही गोष्टही तितकीच खरी. विक्री ५०१ कोटी रुपयांपासून ६०७ कोटी रुपयांपर्यंत वाढूनही, उत्पादनखर्चात वाढ झाल्यामुळे ढोबळ नफा (ग्रॉस प्रॉफिट) सहासष्ट कोटी रुपयांवरून साडेबावन्न कोटीवर घसरला. अर्थात १९८४-८५ च्या पहिल्या सहामाहीत तरी कंपनीची प्रगती पूर्वीच्या दोन्ही वर्षातल्या त्या सहा महिन्यांपेक्षा अधिक होती. अर्थात कंपनीला भांडवल पुरवणाऱ्या वित्तसंस्थांच्या सल्ल्याबाहेर जाऊन कृती करणं, कर्ज घेताना केलेल्या कराराच्या चौकटीत बसत नसल्यानं एसीसी व्यवस्थापकानं अखेर माघार घेतली आणि 'बोनस इश्यूचा विचार सध्या पुढे ढकलला असल्याचं' स्टॉक एक्सचेंजला हळूच कळवून टाकलं. आता त्यांच्या नि वित्तसंस्थांच्या आघाडीवर सामसूम आहे आणि शेअरब्रोकर नि गुंतवणूकदार मात्र झाल्या नुकसानीचा हिशेब करत बसले आहेत !

—शिरीष सहस्रबुद्धे

घेणारी न्यायालयं अजून आहेत. फेरा कायद्यातल्या तरतुदीनुसार हिंदुस्तानातल्या उद्योगव्यवसायात चाळीस टक्क्यांपेक्षा अधिक भांडवलगुंतवणूक परदेशी व्यक्ती वा संस्थेला करता येत नाही. याचा अर्थ देशातल्या उद्योगाचं नियंत्रण परदेशी भांडवलदाराच्या हातात जाऊ शकणार नाही. ज्या जुन्या उद्योगांमध्ये चाळीस टक्क्यांपेक्षा जास्त परकीय भांडवल गुंतलेले आहे अशा ३७९ उद्योगांपैकी ३५० उद्योगांनी परकीय हिस्सा ४०% पर्यंत घटविण्याची प्रक्रिया जवळजवळ पुरी केलेली आहे. उरलेल्या २९ कंपन्यांपैकी १५ ही प्रक्रिया करीत आहेत तर १४ कंपन्या ही अट नाकारून आपला धंदा गुंडाळण्यात गुंतल्या आहेत. यातल्या बहुसंख्य कंपन्यांनी जे भांगभांडवल देशात विक्रीसाठी काढलं (ज्याला ' फेरा इश्यूज् ' म्हणून प्रसिद्धी मिळाली) त्यामुळे हिंदुस्थानातल्या कॅपिटल मार्केटलाही चांगलं उत्तेजन मिळालं. पुरेसं सबळ कारण असल्याखेरीज राजीव गांधी घड्याळाचे काटे उलट दिशेनं फिरवतील असं कुणीही का मानावं ? आणि महत्त्वाची गोष्ट ही की, घड्याळाचे काटे उलटे फिरवावेत असं कुठलंच आव्हान परिस्थितीनं त्यांना आत्ता दिलेलं नाही.

## उदार–प्रागतिक दृष्टिकोन ?

राजीवना परिस्थितीची खरी आव्हानं आहेत ती दुसऱ्याच क्षेत्रात. कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या हाताळावी लागणार आहे. पंजाब आणि आसामचे नाजूक प्रश्न अजून अनिर्णीत आहेत. देशाबाहेर पाकिस्तान आणि श्रीलंका यांनी उभी केलेली प्रश्नचिन्हं केव्हा तरी निश्चित उत्तर मागणार आहेत. राजकीय आघाडीवर प्रणवकुमार मुखर्जीसारखे पक्षांतर्गत असंतुष्ट आणि विरोधीपक्ष यांना तोंड देऊन दहा महत्त्वाच्या राज्यातल्या विधानसभा निवडणुका लढवायच्या आहेत. आणि अशा ' प्रायॉरिटीज् ' समोर असताना परदेशी–देशी भांडवलदारीच्या बाबतीत राजीव गांधी काही धाडसी नि मूलभूत निर्णय घेतील अशी शक्यता वाटत नाही.

या सगळ्याचा अर्थ, राजीव गांधी आर्थिक नि औद्योगिक क्षेत्रात काहीच नवीन करणार नाहीत असा होत नाही. त्यांची काही करायची इच्छा जरूर आहे नि या क्षेत्रांचं महत्त्वही त्यांनी जाणलं आहे. उद्योग व वाणिज्य ही दोन्ही मंत्रालयं त्यांनी स्वतःकडे ठेवली आहेत ही गोष्ट काही कमी महत्त्वाची नाही. स्वातंत्र्यानंतर ही दोन्ही खाती पंतप्रधानांकडेच राहण्याची वेळ प्रथमच येते आहे. आपले सहाय्यक राज्यमंत्री अरीफ मोहमदखान व तिथे सचिव यांच्याबरोबर पंतप्रधानांची जी पहिली सविस्तर बैठक झाली तिचा अहवाल नुकताच आला आहे. त्यावरून दिसतं ते असं की एकीकडे पंतप्रधान औद्योगिक प्रशासनाची थोडी साफसफाई करू इच्छितात. प्रशासकीय सुधारणांद्वारे विलंबकाळ कमी करणं त्यांना शक्य होईलही. तसा वावही आहे, गरजही आहे. कारण औद्योगिक क्षेत्रात विलंबाचा एकेक दिवस हजारो रुपयांच्या नुकसानीतच मोजावा लागतो. दुसरीकडे देशी उद्योगाकडे पाहण्याचा प्रशासनाचा दृष्टिकोन थोडा जास्त प्रागतिक, उदार आणि लवचिक बनवण्याची प्रक्रिया राजीव गांधी सुरू करू शकतील. निदान तशी अपेक्षा आहे. विशेषतः लघुउद्योग नि लघु-मध्यम आकाराचे उद्योग यांना अशा दृष्टिकोनाद्वारे उत्तेजन देण्याची खरोखरीच आवश्यकता आहे, एरवी त्यांच्या आर्थिक उलाढालीवर आणि पर्यायानं उत्पादनक्षमतेवर जबरदस्त मर्यादा पडतील. परवानेपद्धती अधिक सोपी नि उदार करण्याचा इरादाही जाहीर झाला आहे. अशा घोषणा दरवर्षीच होतात; पण त्यातला काही अंश जरी कृतीत आला तरी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक व्हायला त्याचा हातभार लागेल. लघुउद्योग क्षेत्राला कायदेशीर संरक्षण देणं आणि लघुउद्योगांना मिळणाऱ्या सवलती त्यांचं मध्यम उद्योगात रूपांतर होताना एकदम काढून न घेता 'ग्रेडेड इन्सेंटिव्ह स्कीम' तयार करणं यासारखे प्रश्न अनिर्णित आहेत, त्यावरही अनुकूल निर्णय होणं अपेक्षित आहे. राजीव गांधी काय करतील, काय करू शकतील याची दिशा दर्शविणारा हा आलेख आहे. यापेक्षा अधिक काही भव्य आणि नेत्रदीपक असं किंवा दुर्दैवी आणि विघातक असं काही ते करतील असं मानायला आधार नाही. निदान कारकिर्दीच्या पहिल्या दोन वर्षात तरी नाही. या काळात त्यांच्या आर्थिक नि औद्योगिक धोरणांची मूळ बैठक तरी जैसे–थे वादाचीच राहणं अपेक्षित आहे. निव्वळ त्यांचे काही जवळचे सल्लागार वा मित्र कधी तरी खाजगी उद्योगक्षेत्राशी संबंधित होते, एवढ्यावरून ते काही विलक्षण घडवतील असा कयास बांधणं फार दूरान्वयाचं होईल. तर्क नि व्यवहार या दोन्ही कसोट्यांवर असा कयास टिकणार नाही, असं वाटतं. □

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

### काँग्रेस शताब्दी वर्षानिमित्त विशेष लेख

# गर्भगिरीय काँग्रेस

● प्र. ग. बापट ●

गर्भार स्त्रीने आनंदी राहावे, सकस पौष्टीक अन्न सेवन करावे, काम करावे, भीतीदायक, निराशाजनक वातावरणापासून दूर राहावे असा आग्रह असतो. पोटात वाढणाऱ्या जीवावर चांगले संस्कार व्हावेत हाच त्याचा उद्देश असतो. काँग्रेसच्या जन्मापूर्वी, त्या संघटनेचा गर्भावस्थेत विकास कसा झाला, कोणते संस्कार त्यावर झाले याचा विचार येथे अभिप्रेत आहे. इ. स. १८१३ ते १८८५ या काळरूपी गिरीत हा गर्भ वाढला म्हणूनच हे गर्भगिरीय काँग्रेसचे परीक्षण.

इ. स. १८८५ ते १९८४ बरोबर एक शतकाचा काळ. भारतीय राजकारणाच्या मंचावर या शंभर वर्षात अनेक अभूतपूर्व व न भूतो न् भविष्यति असे बदल झाले. १८८५ साली काँग्रेस अवतीर्ण झाली. राजा राजामधील युद्ध व तह म्हणजे भारताचे राजकारण हे समीकरण काँग्रेस स्थापनेनंतर पूर्णतया बदलले. पुढे आरामखुर्चीमधील राजकारणाची अवस्था संपली. लाल, बाल, पाल यांनी त्याला जहाल राजकारणाचे वळण देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक प्रांतात तरुण नेते निर्माण झाले. टिळकयुग संपले व गांधीयुगाला प्रारंभ झाला. चुंबकाने लोहाला आकर्षावे तसे घडले. या तरुणांनी गांधीजींचे नेतृत्वाखाली काँग्रेस खेडोपाडी पोहचविली. नेहरूयुगात काँग्रेसचे विसर्जन करण्याची म. गांधींची सूचना इतिहासजमा झाली. समाजवादी विचारांच्या नेत्यांनी नवीन पक्ष निर्माण केला. या काळापर्यंत अनेकांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली; पण त्यापेक्षाही अधिक संख्येने लोक काँग्रेसमध्ये आले. काँग्रेस सोडणाऱ्यांनी काँग्रेसचे ऋण मान्य केले पण त्याच्या नावावर हक्क सांगितला नाही. बऱ्यावाईट, लहान-मोठ्या स्वार्थी परार्थी कशाही स्वरूपाच्या देशसेवेचे काँग्रेस प्रतीक होते. सत्ता काँग्रेसला चिकटली व इंदिरायुगात होत्याचे नव्हते झाले. काँग्रेस सोडणारे दुसऱ्यांनी काँग्रेस सोडली असा दावा करू लागले. त्यामुळे आज १८८५ च्या काँग्रेसचे अनेक वारसदार आहेत. या लेखाचा उद्देश मात्र इ. स. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेसची मूळ बीजे कोणती व या काँग्रेसच्या जन्मानंतरच्या भारतीय राजकारणाचा तत्पूर्वीच्या भारतीय राजकारणाशी मुलभूत फरक कोणता हा आहे.

### काँग्रेस–सेफ्टी व्हॉल्व्ह

१७५७ मध्ये प्लासीची लढाई झाली. ईस्ट इंडिया कंपनीने ही लढाई जिंकून, भारतामध्ये इंग्रजी साम्राज्याचे रोपटे लावले. १७५७ ते १८५७ पर्यंत कंपनीला भारतीय राज्यकर्त्यांशी कठोर संघर्ष करावा लागला. अखिल भारतीय स्वरुपाच्या सशस्त्र संघर्षाचा भारतीय राज्यकर्त्यांचा शेवटचा प्रयत्न म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्यसमर. १८५७ नंतर इंग्रजी सत्तेच्या विरोधांत सशस्त्र क्रांतीकारक संघर्ष करीतच होते. क्रांतीकारकांचा त्याग, देशभक्ती वादातीत आहे; परंतु १८५७ चे स्वातंत्र्यसमर जरी अयशस्वी झाले तरी त्यामुळे ब्रिटीश साम्राज्याला धडकी भरली. भारतीयांच्या असंतोषाचा ज्वालामुखी पुन्हा असा उफाळून त्यात ब्रिटिश साम्राज्य भस्मसात होऊ नये, म्हणून काही ब्रिटिश माजी सनदी नोकरांनी १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना केली. रेल्वेच्या इंजिनाला ते फुटू नये म्हणून जसा सेफ्टी व्हॉल्व्ह असतो तशीच ही काँग्रेसची योजना होती, असे विधान अनेकवेळा करण्यात आले आहे.

काँग्रेसचा सेफ्टी व्हॉल्व्ह नसता तर १९४७ पूर्वीच ब्रिटीश साम्राज्याचे भारतीय इंजिन फुटले असते, असे वरील विधानांतून अप्रत्यक्ष पणे सुचित होते. मवाळपंथाचे नेतृत्वाखालील काँग्रेसचे पहिल्या अवस्थेतील ध्येय इंग्रजधार्जिणे होते. हाही आणखी एक अप्रत्यक्ष अर्थ यांतून सुचित होतो. क्रांतिकारकांचे स्वातंत्र्य प्राप्तीतील योगदान जास्त होते, हे सांगण्यात काँग्रेसच्या योगदानाचे अवमूल्यन करून सिद्ध करण्याचा हा एक प्रयत्नही असतो. वरील विधानातून व्यक्त होणाऱ्या या तिन्ही अर्थांचे परीक्षण करण्यापूर्वी एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे. ती म्हणजे स्वातंत्र्य हे मातृभूमीचे महावस्त्र आहे. हे महावस्त्र विणण्यात स्वतःच्या स्नायूंचे तंतू

—परणारे, स्वतःच्या रक्ताचा लालीमा त्याला चढविणारे व स्वतःच्या बुद्धीबलाने ते चिरतरुण बनविणारे सर्वच समानरितीने वंदनीय व पूज्य आहेत. त्यांतील कोणाला उणेपणा देण्याचा येथे हेतू नाही.

१८५७ च्या क्रांतीनंतरचा पहिला सशस्त्र क्रांतीकारक वासुदेव बळवंत होय. १८७९ मध्ये त्याने ब्रिटिश सत्तेविरुद्ध युद्धाची घोषणा करताना स्वतःस शिवाजीचा पेशवा वगैरे जरी म्हटले असले तरी स्वतंत्र भारतात लोकशाही राज्य स्थापण्याचे ध्येय निःसंदिग्ध शब्दांत घोषीत केले होते. १८८५ पूर्वीच्या वासुदेवबळवंतांचे भावनात्मक बंध शिवशाहीबरोबर आहेत; पण तो राजेशाही ध्येय ठेवत नाही, लोकशाही हे ध्येय ठेवतो. न्या. म. गो. रानडे यांचे महाराष्ट्राच्या थंड गोळ्याला जागे करणे त्यावेळी चालू होते. याच न्या. म. गो. रानडे यांनी कॉंग्रेस स्थापनेत पुढे १८८५ मध्ये सहकार्य केले. त्यानंतर चाफेकर बंधू, सावरकर, भगतसिंह ते नेताजी सुभाषचंद्र बोस व नाविकदलाच्या बंडातील क्रांतीकारक यांनी १८५७ पासून क्रांतीची प्रेरणा घेतली असेल; पण प्रत्येकाने लोकशाहीराज्याचेच ध्येय ठेवले. जर परिणामावरून कार्याचे स्वरूप ठरवायचे तर हे मान्य करावे लागेल की या सर्व सशस्त्र क्रांतीकारकांनी लोकशाहीचा जो ध्येयवाद स्वीकारला तो कॉंग्रेसच्या कार्याचे परिणाम स्वरूप होय. कॉंग्रेसच्या जन्मानंतरचे भारतीय राजकारण मग ते मवाळ, जहाल, सनदशीर, जातीय, धर्मीय किंवा सशस्त्र क्रांतीचे असो, कोणीही १८५७ प्रमाणे बादशहा, राजे, सरदार यांच्या नावाने स्वातंत्र्याची घोषणा करण्याचे स्वप्नांत देखील पाहिले नाही. सशस्त्र क्रांतीकारकच जेथे मवाळांचे लोकशाही ध्येय मानतात तेथे अप्रत्यक्षपणे कॉंग्रेसचे योगदानाचे अवमूल्यन क्रांतीकारकांना पुढे करून करण्याचा प्रयत्न, परिणामाचे निकषावर टिकत नाही.

कॉंग्रेसचा सेफ्टी व्हॉल्व्ह नसता तर इंग्रजी शासनाचे इंजिन लवकर फुटले असते, हा अंदाज उघडच 'जर–तर' स्वरूपाचा असून, त्याचे कार्याचे कारण वा परिणाम यापैकी कशाचेच आधारे स्पष्टीकरण होऊ शकत नाही, म्हणून व्यर्थ आहे.

कॉंग्रेसचे सुरुवातीचे मवाळ पंथाचे नेते इंग्रजधार्जिणे होते, हा एकच छुपा आक्षेप उरतो. १८५७ नंतर इंग्रजांनी कायदेमंडळात सुधारणा केली. स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्या इ. उदाहरणे दिली तर त्यावर एक आक्षेप असा येऊ शकतो की, हे सर्व पुढील संभाव्य असंतोषाला घाबरून किंवा दुसरा आक्षेप असा येऊ शकतो की, या सुधारणांच्या तुकड्यांना बळी पडले म्हणून तर इंग्रजधार्जिणे म्हणायचे. त्यामुळे उत्तम उपाय हा की, १८५७ पूर्वीच्या घटनांचे आधारेच या आक्षेपाचे परीक्षण करणे.

## राजेशाही–लोकशाही

१८८५ च्या कॉंग्रेस स्थापनेचे बीज १८५७ नंतर रुजविले गेले नसून त्याचा प्रारंभ १८१३ पासून झाला आहे. १८१३ ते १८४६ या काळात भारतात जे अशासकीय ब्रिटिश लोक आले ते भारतीय इतिहास, संस्कृती याविषयी प्रायः सर्वस्वी अनभिज्ञ होते. १७८९ च्या उन्हाळ्यात इंग्लंडमध्ये सुतीकापडाच्या गिरणीत पहिले वाफेचे इंजिन बसविण्यात आले. त्यामुळेच साधारणपणे १८१३ नंतर भारतात येणारे अशासकीय इंग्रज अनियंत्रित राजेशाहीपासून संसदीय लोकशाहीकडे वाटचाल करणारे, शतीप्रधान समाजरचनेतून औद्योगिक समाजरचना निर्माण करण्यात गुंतलेले व त्या जीवनाशी एकरूप झाल्याने, त्याच चष्म्यांतून स्वकीय कंपनीच्या भारताच्या राज्यकारभाराकडे पाहणारे व त्या राज्यकारभारावरील भारतीयांच्या प्रतिक्रिया पहात असताना कंपनी शासनाशी संघर्ष करणारे इंग्रज होते. कलकत्ता, मुंबई, मद्रास येथील त्यावेळची सुशिक्षित इंग्रजी शिक्षणाने युक्त पिढी या इंग्रजांच्या कृती पहात होती, बोलणे ऐकत होती.

वसाहती वाढविण्याच्या स्पर्धेत गुंतलेले इंग्लंडमधील समाजजीवन अनेकपदरी आहे. अनियंत्रित राजेशाहीकडून संसदीय लोकशाहीसाठी राजकारणात संघर्ष चालू होता. त्याचवेळी आर्थिक क्षेत्रात औद्योगिकक्रांतीतून उद्योगप्रधान समाज निर्माण होत होता. धार्मिक क्षेत्रांत कॅथॉलिकपंथीय राजांच्या नियंत्रणातून मुक्त झालेली प्रॉटेस्टंट जनता, प्रॉटेस्टंट धर्मगुरूंचे नेतृत्वाखाली जेसुइटपंथाचे पावलावर पाऊल टाकून धर्मप्रसाराचे स्वप्न पहात होती. या तिन्हीचे पडसाद कंपनीच्या व्यवहारातून भारतात उमटत होते. कंपनीने सुरुवातीला धर्मप्रचाराला कटाक्षाने दूरच ठेवले होते; पण मद्रास येथील डच मिशन व बंगालमधील श्रीरामपूर येथील मिशनरींच्या कार्यामुळे काही भारतीय ख्रिश्चन बनले होते; पण ते प्रामुख्याने अशिक्षित–लिहिता वाचता न येणारे व गरीब होते. ख्रिश्चन धर्मानुसार बायबल प्रत्येकाला वाचता येणे आवश्यक मानले जाई. त्यामुळे धर्मांतरीत भारतीयांना शिकविणे व त्यांच्यासाठी भारतीय भाषांतून बायबलचे भाषांतर करून छापणे आवश्यक होते. भारतीय ख्रिश्चनांच्या मुलांसाठी शाळा आवश्यक होत्या. त्यामुळे इ. स. १७१३ मध्येच भारतात पहिला तामिळी प्रेस आला व पाश्चात्य शिक्षणाच्या मिशनरी शाळा देखील.

१७९३ च्या चार्टर अॅक्टच्या मंजुरीच्यावेळी विल्बरफोर्स यांनी असा प्रयत्न केला की, कंपनीने मिशनरी व त्यांच्या धर्मप्रसार व शाळांना मदतीचा हात द्यावा. कंपनीच्या प्रखर विरोधामुळे पार्लमेंटने विल्बरफोर्सची दुरुस्ती नाकारली. मिशनरींनी नंतरच्या वीस वर्षांत जनमत आपल्यामागे उभे करण्याचा प्रयत्न केला. १८१३ च्या चार्टर अॅक्टच्यावेळी मिशनरी जिंकले. १८१३ च्या चार्टर अॅक्टनुसार मिशनरी व अन्य खाजगी ब्रिटिश नागरिकांना भारतात येण्याची, राहण्याची, चर्च स्थापन करण्याची, भारतीयांना "उपयुक्त ज्ञानाचा परिचय करून देण्याची व भारतीयांच्या नैतिक विकासासाठी प्रयत्न करण्याची परवानगी मिळाली. साहजिकच भारताबरोबर व्यापार करण्याचा कंपनीचा एकाधिकार संपुष्टात आला. त्यामुळे मिशनरी, इंग्रजव्यापारी, मळेवाले व त्यांच्या मागोमाग शिक्षक, वकील व वृत्तपत्रकार भारतात आले. हे सर्व ब्रिटिश नागरिक होते. ते जरी भारतात आले तरी त्यांची वागणूक इंग्लंडमध्ये जशी होती तशीच येथे असे. त्यांना वाटे की कंपनीवर पार्लमेंटचे नियंत्रण असल्याने त्यांना येथे कंपनीचे कारभारावर टीका करण्याचा अधिकार आहे. या मळेवाल्यांचे व व्यापाऱ्यांचे हितसंबंधास कंपनीच्या राज्यकारभारामुळे व धोरणामुळे धक्का बसताच ते इंग्लंडमध्ये जशी शासनाचेविरोधी ओरड करीत तशीच येथे करू लागले. शासनाविरोधी ओरड व त्याची पद्धती त्यांनी तेथून

आपल्याबरोबर आणली होती. त्यांनी वृत्तपत्रे काढली. लेख लिहिले. संस्था स्थापन केल्या. त्याद्वारे सभा आयोजित केल्या. प्रार्थनापत्रे पाठविली व प्रतिनिधीमंडळे पाठविली. कंपनीच्या धोरणाचा निषेध करणारे ठराव केले. कलकत्ता येथील कंपनीच्या शासनाने लक्ष दिले नाही तेव्हा पार्लमेंटवर दडपण आणण्यासाठी इंग्लंडमध्ये लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. कंपनी शासनाला हा त्रासदायक घटक होता. हे संख्येने कमी होते; पण त्यांचे वास्तव्य कलकत्ता, मुंबई-सारख्या शहरी होते. कंपनी त्यांचा उल्लेख कुत्सिकतेने लुडबुडे (Interlopers) म्हणून करी. पण त्यांचा प्रभाव कमी नव्हता. १८१७ मध्ये त्यांनी कलकत्ता स्कूल बुक सोसायटी, १८१८ मध्ये कलकत्ता स्कूल सोसायटी आणि १८२० मध्ये अॅग्रीकल्चरल हॉर्टिकल्चरल सोसायटी स्थान केली.

## राजकीय क्षेत्रात पाऊल

या संस्थात काम करणाऱ्या बुद्धिमान श्रीमंत व विद्वान हिंदूंनी १८२७ मध्ये गौडीय सोसायटी स्थापन केली. १८२७ मध्येच हिंदू लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पाश्चात्य गुरू हेन्री लुईस, व्हिव्हियन डेरोझियो यांच्या नेतत्वाखाली अॅकॅडेमिक असोसिएशन या वादविवाद सभेची स्थापना केली. ह्या सभेत ज्या विषयावर चर्चा होई त्यात Free will, fate, faith, the attributes of God, the hollowness of idolatory याप्रमाणेच the nobility of patriotism हा विषयदेखील होता. परिणामत: तरुण बंगाल थॉमस पेन वाचू लागला, क्रांतीकारी फ्रान्सचे गुणगान करू लागला. १८२८ मध्ये राजाराममोहन रोय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली.

लुडबुड्यांच्या पावलावर पाऊल भारतीय यांनी प्रथम १८३० मध्ये राजकीय क्षेत्रात टाकले. कारण होते हिंदुधर्माची अखंडता टिकविणे. लॉर्ड विल्यम बेंटीकने डिसेंबर १८२९ मध्ये सतीची चाल बंद केली. याला विरोध करण्यासाठी धर्मसभा स्थापन झाली. या सभेचे संपूर्ण कामकाज पाश्चात्य संघटनेच्या धर्तीवर चाले. या सभेच्या पहिल्या कमिटीत एकही ब्राह्मण नव्हता हे विशेष. या धर्मसभेचे कौतुक करताना Friend of India हे अँग्लो-इंडियन वृत्तपत्र म्हणते, '...it embraced several Native gentlemen of wealth and intelligenee, but of so low a caste, that according to the strict letter of Hindoo observance, their presence contaminated the meeting. Here was another innovation upon Hindoo customs, an adoption of European notion, that property and intelligence, though accompanied with sacredness of birth, should exercise influence in society.'

१८३० मध्ये कलकत्ता ट्रेड असोशिएशनची स्थापना झाली. १८३३ च्या चार्टर अॅक्टमुळे गव्हर्नर जनरलला संपूर्ण ब्रिटिश भारतासाठी कायदे करण्याचा अधिकार प्राप्त झाला. १८३४ मध्ये बेंगाल चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना झाली. अँग्लो-इंडियन लोकांनी १८३६ मध्ये कलकत्ता येथे ब्लॅक अॅक्टच्या विरोधांत एक सभा घेतली. कायदेमंडळांतील चर्चा उघडपणे व्हावी व कायदेमंडळांत अशासकीय सभासद असावेत या मागण्या या सभेत प्रथमच करण्यात आल्या.

## रॅडिकल चळवळीच्या अवस्था

१९ मार्च १८३८ रोजी कलकत्ता येथे लॅन्ड होल्डर्स सोसायटीची स्थापना झाली. ब्रिटिश बॅरिस्टर व मळेवाला थियोडार डिकन्स, हा या संस्थेचे प्रेरणास्थान होता. या संस्थेच्या स्थापनेचे कारण बंगालच्या जमीनदारांचे हितसंबंध धोक्यात आले, हे होते. कंपनी कायमधारा पद्धती बदलू इच्छित होती; पण दुसरी गोष्ट म्हणजे दिल्लीचा बादशहा किंवा बंगालचे नवाब यांनी अनेकांना बक्षीस म्हणून वंशपरंपरागत जमिनी दिल्या होत्या व ते त्या जमीनींचा करमुक्त-उपभोग घेत होते. कंपनीने त्यांना कळविले की जमीन मालकांनी आपली मुळची बक्षीसपत्रे दाखवून मालकी सिद्ध करावी अन्यथा शासन त्या जमीनी ताब्यात घेईल. दीडशे दोनशे वर्षात जुने बक्षीसपत्र कंपनीचे शासन सुरू होऊन ७० वर्षे झाल्यावर मागणे व शाकुंतल नाटकाचा नाटककार कालीदास याच्या सिद्धतेसाठी त्याच्या हस्ताक्षरातील नाटकाची मूळ प्रत मागण्यासारखेच हास्यास्पद होय. कंपनी शासनाच्या धोरणाला विरोध करणारी ही पहिली भारतीयांची सभा. ज्यांचे हितसंबंध जमीनीच्या मालकीत गुंतले आहेत अशा सर्वांना ही खुली होती. यात जात, वंश, धर्म यांचे बंधन नव्हते; परंतु यातील सर्व सभासद हिंदूच होते. आपल्या सभेला विस्तीर्ण व भक्कम पाया लाभावा म्हणून तिने इतरही अनेक प्रश्न हाताळले. उदा. न्यायालयात बंगाली भाषेचा वापर व्हावा, स्टॅम्प ड्युटी कमी करावी, फौजदारी न्यायालयांतील साक्षीदारांना भत्ता मिळावा, तसेच मॉरिशसला जाणाऱ्या मजूरांचा प्रश्न. खऱ्या अर्थाने ही पहिली राजकीय सभा म्हणावयास हरकत नाही. या सभेसंबंधीची त्यावेळच्या अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांची काही बोलकी मते पुढीलप्रमाणे होत Englishman हे वृत्तपत्र म्हणते '... Government have the choice between association and conspiracy, if they put down the one, they cannot prevent the other.' The Calcultta Courier म्हणते, '...a decided step progressive in the march of native improvement, and...a very noticeable and remarkable sign of the times...' लॅन्ड होल्डर्स सोसायटीच्या स्थापनेचा दोष १८३३ च्या चार्टर अॅक्टच्या माथी मारून हे वृत्तपत्र पुढे म्हणते '...The Hindoos have at last made the discovery that union is power! This association we look up on as a political association... it is a clear carring out of that principle of equality in the charter of freedom, which its single minded and sincere framers doubtless intended should be acted upon! Our native bretherin have now, thanks to the equality faction at home, gotten an association we shall not be much surprised if they shortly get an O'connell...' लॅंड होल्डर्स सोसायटी १८४४ पर्यंत कार्यरत होती.

१८३८ मध्येच Society for the acquisition of general knowledge ची स्थापना झाली व तिने १८४३ पर्यंत कार्य केले. १८३९ मध्ये युनायटेड इंडिया असोशिएशनची स्थापना झाली पण तिला जन्मत:च अपमृत्यु आला.

इंग्लंडमधील रॅडिकल चळवळीच्या तीन अवस्थांपैकी पहिल्या दोन अवस्था १७९०-९४ व १८१५-३२ या काळातील होत. आमुलाग्र सुधारणा राजकीय क्षेत्रांत व्हाव्यात यासाठी ही चळवळ होती. इंग्लंडमधील

टॉटनबरोज व पॉकेटबरोजसारखे मतदार संघ नष्ट झाले. पहिला सुधारणा कायदा मंजूर झाला व उच्च मध्यमवर्गीय पुरुषांना मताधिकार मिळाला त्याचे बरेचसे श्रेय या रॅडिकल चळवळीला आहे. या चळवळीच्या नेत्यांच्या मते भारतातील हमालांचा व्यापार (Coolie Trade) हा गुलामगिरीचाच प्रकार होता. या चळवळीने इंग्लंडमध्ये भारताच्या स्थितीसंबंधी जी संघटना उभारली त्यामागे स्वार्थ नव्हता. हे जितके खरे तितकेच भारतातील इंग्रज व्यापाऱ्यांनी त्यांना जी मदत केली ती निस्वार्थी नव्हती हेही खरे १८३९ मध्ये इंग्लंडमध्ये यांनीच ब्रिटिश इंडिया सोसायटी स्थापन केली. भारतीयांच्यावतीने इंग्लंडमध्ये संघटीत चळवळ करणे हे या संस्थेचे ध्येय होते. १८४० मध्ये मुंबई येथे या संस्थेची शाखा स्थापन झाली. १८४१ मध्ये ही संघटना संपुष्टात आली. इंग्लंडमध्ये चळवळ संघटीत करण्याचे कारण १८३३ च्या चार्टर ॲक्टची मुदत १८५३ मध्ये संपणार होती. पार्लमेंटमध्ये पुन्हा चर्चा होणार व नवीन कायदा येणार तेव्हा त्यासाठी जनमत जागृतीची ही धडपड होती. इंग्लंडमध्ये भारतीयांच्यावतीने प्रयत्न करणाऱ्यांना बळ मिळावे म्हणून जानेवारी १८४३ मध्ये जॉर्ज थॉम्पसन भारतात आला.

## हे बदलणार केव्हा?

जॉर्ज थॉम्पसनच्या मार्गदर्शनाखाली २० एप्रिल १८४३ ला बेंगॉल ब्रिटिश इंडिया सोसायटीची स्थापना झाली. या भारतीयांच्या सभेचे ध्येय होते, ब्रिटिश भारतामधील जनतेची स्थिती, कायदा, संस्था, विविध साधने याविषयी माहिती गोळा करणे, त्या माहितीचा प्रसार करणे, सर्व जनतेचे हित साधण्यासाठी सार्वभौम सत्तेशी एकनिष्ठ राहून, कायद्याचे पालन करून, शांततापूर्ण मार्गाने प्रयत्न करणे. ही संस्थादेखील सर्व भारतीयांसाठी खुली होती. कलकत्ता येथे एका सभेत त्याने भाषण केले.

१८८५ च नव्हे १८५७ ही अजून दूर आहे. हे भाषण करणारा एक इंग्रज आहे व तो भारतीयांसमोर बोलत आहे, या पार्श्वभूमीवर ह्या भाषणांतील विचार निश्चितच चकीत करणारे वाटतील. प्रदीर्घतेचा दोष पत्करून देखील त्यातील काही भाग वाचण्यासारखा आहे.

भारताचे वर्णन करतांना तो म्हणतो की '... येथील राज्यकर्ते, सल्लागार, इतिहासकार सर्वच परकीय. भारतीयांच्या हितसंबंधाविषयी कलकत्त्याच्या सभागृहातील भाषण ही परकीयाचे इंग्लंडमध्ये. भारतीयांची बाजू मांडणारा प्रतिनिधी तो देखील परकीयच असतो.

'हे असेच असणे योग्य आहे का? हे असेच चालणार का? हे बदलणार केव्हा?'

वरील स्वतःच उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी पुढे तो म्हणतो, '... इंग्लंडमध्ये ज्या प्रमाणे चळवळ करणे, प्रार्थनापत्र देणे चालते ते करण्याइतकी तुमची तयारी नाही. इंग्लंडमध्ये ज्या अर्थाने Public असते तशी जनता येथे नाही व प्रातिनिधीक संस्था देखील नाही...घातक कायदे व विघातक राज्यकारभाराला भारतीयच जबाबदार आहेत. कारण भारतीय सल्ला देत नाहीत, विरोध करीत नाहीत किंवा सुधारणा सुचवित नाहीत. भारतीयांनी आपली बुद्धिमत्ता, शिक्षण व प्रभाव देशभक्तीसाठी वापरला पाहिजे. या शक्तीचा उपयोग देशाच्या सामान्य हितासाठी केला पाहिजे. स्वतःच्या प्रश्नाविषयी त्यांनी काळजीपूर्वक माहिती गोळा केली पाहिजे. त्यावर चिंतन केले पाहिजे. ती जनतेसमोर मांडली पाहिजे. सभा भरविणे, स्मरणपत्रे पाठविणे, प्रतिनिधी पाठविणे या नानाविध मार्गांचा उपयोग करून न्यायाचा दरवाजा सतत ठोठावला पाहिजे. एवढे करून जर भारतामधील शासन लक्ष देणार नाही तर ब्रिटिश जनता व पार्लेमेन्ट जे भारताचे खरे राज्यकर्ते आहेत त्यांच्याकडे आपल्या मागण्या सादर केल्या पाहिजेत.

## १८५७ : जिवंत स्फोटक

'एकाकी प्रयत्न, तुरळक प्रयत्न यामुळे विशेष साधले जात नाही. योग्य मार्गाने, एकत्रित येऊन केलेल्या प्रयत्नांनाच फळ येते. मात्र अभ्यास, चिकाटी, दीर्घोद्योग, परस्पर सहकार्य, जनतेचे खरे योग्य प्रतिनिधित्व, टीकेमध्ये प्रतिस्पर्धाविषयी उदार दृष्टिकोन व शांततापूर्ण आणि घटनात्मक मार्गावर विश्वास ठेवण्याचे कर्तव्य मात्र या भारतीय देशभक्तांनी पार पाडले पाहिजे. भारतातील काही ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या वर्तनावरून त्यांनी इंग्लंडविषयी गैरसमज करून घेऊ नयेत, The heart of England has not been turned from the love of justice, nor her arm paralysed in the caure of the poor...'

१८५७ च्या क्रांतीच्या ज्वालामुखीचा तप्तरस सनदी ब्रिटिश नोकरांचे मनात धडकी निर्माण करण्यापूर्वी १४ वर्षे एक ब्रिटिश नागरिक सुशिक्षित भारतीयांना चळवळ करण्यास सांगतो, त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन संस्था निर्माण करण्यास सांगतो, कंपनीच्या विघातक धोरणाला विरोध करणे ही तुमची जबाबदारी आहे हे बजावतो, व त्यासाठी भारतीय लोकसमुहाचे रूपांतर जनतेत (Public) करण्याचे कर्तव्य भारतीय देशभक्तांचे आहे याची स्पष्ट जाणीव देतो.

१८८५ मध्ये स्थापन झालेल्या कॉंग्रेसने पहिल्या अवस्थेत वेगळे काय केले? पण आपण फार पुढे गेलो.

१८५३ मध्ये इंग्लंडमध्ये भारताच्या मित्रांनी इंडिया रिफॉर्म सोसायटी स्थापन केली. १८५३ च्या चार्टर ॲक्टनुसार दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. कंपनी शासनाचे सनदी नोकरीसाठी इंग्लंडमध्ये स्पर्धा परीक्षा सुरू झाल्या. गव्हर्नर जनरलच्या कायदेकारी शाखेला कार्यकारी शाखेपासून अलग करण्यात आले. थोडक्यात कायदे मंडळाची निर्मिती झाली.

भारतात मिशनऱ्यांच्या विरुद्ध प्रक्षोभ उसळला. ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्याला वडिलार्जित संपत्तीचा वाटा मिळावा म्हणून हिंदू कायद्यात बदल करण्यात आला. इलबर्ट-बिलाला अशासकीय ब्रिटिशांनी विरोध केला. त्यामुळे मुंबई, पुणे, मद्रास, कलकत्ता येथील सुशिक्षित भारतीय चिडले. आतापावेतो वृत्तपत्रांची संख्या व खप वाढला होता. त्या वृत्तपत्रांनी या असंतोषाची नोंद घेतली. महत्त्वाच्या शहरातून संघटना स्थापन झाल्या. वृत्तपत्रे या घटनांच्या प्रसाराचे साधन असल्याने भारतातील दूरदूरच्या शहरांतील तरुण सुशिक्षीत पिढीत समविचार व समानहितसंबध यामुळे एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली.

भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासाचे अवगाहन करणाऱ्या म. गो. रानडे, दादाभाई नवरोजी इ. कॉंग्रेसच्या निर्मितीमधील भारतीयांना व १८५७ पूर्वीच्या सुशिक्षीत भारतीयांना चळवळ, सभा यांचे आकर्षण का वाटले हे समजावून घेणे आवश्यक आहे. मध्ययुगीन इतिहासात तरुण होतकरू व्यक्तीला पुढे यावयाचे असेल तर कसेही करून प्रथम राजाच्या दरबारात प्रवेश करून घ्यावा लागे, नंतर युद्धप्रसंगी तलवार गाजवून किंवा राजाच्या कठीण प्रसंगी त्याच्याशी

एकनिष्ठ राहून मगच पुढे येण्याची संधी मिळे; पण १८१३ नंतर सनदशीर मार्गाचे इंग्रज पुरस्कर्ते त्यांना सार्वभौम राष्ट्र वेगळे व त्याचे शासनकर्ते वेगळे असे सांगत होते. सार्वभौमाशी एकनिष्ठ राहून शासनाच्या विघातक धोरणाला व कारभाराला विरोध करता येतो, हा नवीन मंत्र सांगत होते. त्यासाठी निकष राज किंवा राज्यहित नसून सामान्यांचे हित हा आहे हे पटवीत होते. लोकांमध्ये जा, लोकांचे प्रश्न समजावून घ्या, लोकसमुहातून जनता निर्माण करा व त्यांचे प्रतिनिधित्व करा हा नवीन मार्ग सांगत होते. उच्चमध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय, व्यापारी, श्रीमंत घरातून आलेल्या तरुणांना हा मार्ग समजू शकतो कारण तो त्यांच्या उद्याचा मार्ग आहे. या तरुणांच्या पूर्वजांपैकी कोणी तरी राजाचा सरदार, सुभेदार होता वा असेल. तेव्हा विकलांग बादशहाच्या नावे किंवा सेवानिवृत्ती वेतनावर जगणाऱ्या नाममात्र पेशव्यांच्या नावे स्वातंत्र्याची घोषणा त्यांच्या मते कालचा मार्ग झाला. आपल्या भव्य भूतकाळाविषयी आदर म्हणजे त्याच्या भग्न वर्तमानाला प्रमाण मानणे नव्हे.

संपूर्ण भारताची एक संघटना असावी, हा विचार १८५१ मध्ये प्रथम समोर आला. कंपनीच्या चार्टरचा पुनर्विचार १८५३ मध्ये इंग्लंडचे पार्लमेंट करणार हे निमित्त होते. १८५१ मध्ये कलकत्ता येथे ब्रिटिश इंडियन असोसिएशनची स्थापना झाली. याच्याच शाखा सर्वत्र स्थापन व्हाव्यात व सर्व प्रांतांनी मिळून एकच प्रार्थनापत्र पाठवावे हा त्यामागे हेतू होता. ते त्यावेळी शक्य झाले नाही; पण १८५२ मध्ये पुण्याला डेक्कन असोसिएशन, मद्रास येथे नेटिव्ह असोसिएशन व मुंबई येथे बॉम्बे असोसिएशन स्थापन झाल्या.

१८५७ मध्ये स्वातंत्र्ययुद्ध झाले. सर्वच युद्धाप्रमाणे यात दोन्ही बाजूंनी अनेक निरपराध ठार मारले. युद्धानंतर इंग्रजांनी इतर अनेक निरपराध्यांना ठार मारून, पुढील भारतीय क्रांतीकारकासाठी जिवंत स्फोटक निर्माण करून ठेवले.

१८५८ च्या जाहीरनाम्याने पार्लमेंटने ब्रिटिश भारताची सत्ता स्वतःकडे घेतली. पुन्हा सनदशीर मार्गाच्या पुरस्कर्त्यांनी कार्याला सुरुवात केली.

इंडियन असोसिएशन, प्रेसिडेन्सी असोसिएशन, सार्वजनिक सभा, महाजनसभा इत्यादी प्रांतीय सभा पुन्हा उदयाला आल्या व कार्य करू लागल्या.

लुडबुडघा इंग्रज व्यापाऱ्यांचे व अँग्लो-इंडियनांचे भारतीय देशभक्तांशी असलेले सहकार्य संपले. १८५७ नंतरच्या भारतीय देशभक्तांनी हंसक्षीर न्यायाने व विवेकबुद्धीने सनदशीर चळवळीचा मार्ग स्वीकारला; पण ज्या स्वार्थी बुद्धीने हा मार्ग लुडबुडघा इंग्रजांनी शिकविला होता त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले.

## नेतृत्वाच्या गरजेतून

सनदशीर मार्गाच्या स्वीकारामागे अगतिकता नव्हती, भीरुता नव्हती. स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य हे महान तर खरेच; पण स्वातंत्र्यासाठी जन्मभर तिळातिळाने झिजत झिजत, अजून योग्य वेळ का येत नाही, अजून जनता निर्माण का होत नाही याची निराशा व आपण कमी पडतो याची खंत बाळगीत, तरी कार्य करीत जगणारे व मरणारे कमी महान नाहीत. कारण हा मार्ग स्वीकारण्यामागे निश्चित अशी विधायक दृष्टी निर्माण करणारी होकारात्मक कारणे होती.

रेल्वे, तारयंत्र, पोस्ट या सुधारणांमुळे इंग्रज सैन्यांच्या हालचाली अधिक सुसूत्र, सुलभ, त्वरीत व आवश्यक अशा होत होत्या. सशस्त्र क्रांतीमधील विजयासाठी हे आवश्यकच होते; पण त्याबरोबर चांगली शस्त्रे आवश्यक होती. क्रांतीसेनेजवळ होत्या जुन्या बंदुका. इंग्रजी सैन्यांजवळ क्रांतीकारकांनी नाकारलेल्या नवीन, लांब पल्ल्याच्या बंदुका. क्रांतीकारकांचे, सैनिकांचे प्रशिक्षण केले होते इंग्रज अधिकाऱ्यांनी. आता त्यांचे नेतृत्व करीत होते माजी बादशहा व राजे ज्यांना जन्मात कधी युद्धभूमीचा परिचय नव्हता. क्रांतीचा योजनापूर्वक उठाव केला हिंदी सैनिकांनी व उठाव केल्यावर यांनी नेते शोधले. इसापाच्या कथेतच वाचले होते देवाकडे राजा मागणारे. पाय चालतात' हात पराक्रम गाजवितात हे खरे; पण त्यांचे नेतृत्व करण्यास सांगितल्याचे येथे दिसते. हे ओळखले त्या पिढीने. त्यांनी जाणले आपल्या राष्ट्राजवळ नेतृत्व नाही, श्रेष्ठ वा बरोबरीची साधने नाहीत.

दुसरे कारण म्हणजे स्वतंत्र झाल्यावर राज्य कोणी करायचे ? १८५७ नंतर लादलेले नेतृत्व स्वीकारण्यासाठी देखील कोणी उरले होते का ? तेव्हा नवी नेतृत्व निर्मिती ही पहिली गरज होती. हे नेतृत्व लोकशाहीधिष्ठीतच असणार; पण त्यासाठी जागृत जनता नाही.

आरामखुर्चीचे राजकारण करणाऱ्या नेत्यांनी एवढेच पाहिले नव्हते. त्यांच्या अभ्यासाने, चिंतनाने त्यांना भविष्यकाळाचा वेध घेणारी प्रतिभा लाभली होती. त्यांना दिसत होते की केवळ भारतच नाही तर संपूर्ण आशियाच पराधीन बनला आहे. यावरून त्यांनी निष्कर्ष काढला की पराधीनता केवळ राजकीय नसून संपूर्ण समाजजीवनाला समकक्ष असणारी अशी ती सांस्कृतिक पराधीनता आहे. न्या. म. गो. रानडे 'मध्य आशियांतील प्रश्न' या लेखांत लिहितात, 'भविष्यकालीन उज्वल कालखंडात परिपूर्णतेने आशियाई राष्ट्रांना अवतीर्ण व्हावयाचे असेल तर आजच्या तात्पुरत्या पण संपूर्ण शरणागतीच्या अवस्थेतून त्यांना जावेच लागेल. कोणतीही थोर संस्कृती केवळ स्वदेशाच्या आधारे चिरकाल टिकलेली नाही. श्रेष्ठ आणि बलवान संस्कृतीच संघर्षात टिकते. रशिया इंग्लंड आणि दुर्दैवाने फ्रान्स व अमेरिका या आज जगातील प्रबल सत्ता आहेत. यांची प्रादेशिक जवळीक जितक्या लवकर येईल तितक्या लवकर हे देश राष्ट्रीय चढाओढीच्या व स्पर्धेच्या संघर्षात, शांततेच्या व युद्धाच्या, काळात गोवले जातील व तितक्या लवकरच आशियाई राष्ट्रांच्या मुक्ततेचा काळ जवळ येईल.'

१८५७ नंतर सुशिक्षीत जनतेने व तरुणपिढीने कॉंग्रेसची उभारणी केली याचे कारण म्हणूनच ह्यूम नाही. ह्यूम, वेडरबर्न इ. इंग्रजांचे कॉंग्रेस स्थापनेमागचे हेतू कसेही असले तरी त्या संघटनेची सूत्रे पितामह दादाभाई नवरोजी, न्या. म. गो. रानडे सारख्यांच्या हाती होती. १८९२ मध्ये ह्यूम साहेब पुण्याला आले. हिराबागेत त्यांच्या सन्मानार्थ सभा होती. इमारतीजवळ येताच ह्यूमने स्वयंसेवकास पृच्छा केली, 'Where is our god Mahadeo ?' यावरून ह्यूमचे हेतू व म. गो. रानड्यांचे हेतू यापैकी कोणी कोणावर मात केली हे स्पष्ट होते.

□

टीप : या लेखांत प्रामुख्याने The Emergence of the Indian National Congress या Shri S. R. Mehrotra यांच्या ग्रंथामधील अनेक आधार जागोजागी घेतले आहेत.

# शर्यत



मूळ लेखक : जेफ्री आर्चर

रूपांतर : विष्णू जयदेव

( ३ )

फर्स्ट अमंग इक्वल्स् ही ब्रिटिश संसदीय राजकारणाचं आणि त्यातील सत्ताशर्यतीचं प्रतिबिंब दाखवणारी नवी कादंबरी . . . .

या कादंबरीत प्रमुख पात्रे चार.

चार्ल्स सेमूर आणि सायमन कस्लेक कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे तर अँड्र्यू फ्रासर आणि रेमंड गोल्ड लेबर पार्टीचे सभासद.

चार्ल्स आणि रुपर्ट हे जुळे भाऊ. चार्ल्स रुपर्टपेक्षा नऊ! मिनिटांनी लहान, पण त्यामुळे घराण्याचा वारसदार मात्र रुपर्ट. चार्ल्सची बायको फिओना.

सायमनचे वडील लहान असतानाच वारले, त्यामुळे स्वतःच्या हिंमतीवर त्याने आयुष्य घडवले. सायमनची बायको इलिझाबेथ डॉक्टर आहे.

रेमंड गोल्ड लीडस्‌मध्ये एका खाटकाच्या कुटुंबात जन्माला आला. आयुष्यातलं सारं यश त्यानं स्वतःच्या हिमतीवर मिळवलं

रेमंडची बायको जॉईस त्याच्या मतदारसंघात खूप काम करते. रेमंडच्या राजकीय जीवनात तिचा निम्मा वाटा आहे.

अँड्र्यूला राजकीय पार्श्वभूमी आहे. त्याचे वडील सर डंकन फ्रासर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे; पण अँड्र्यू मात्र लेबर पार्टीत. ॲलिसनशी जुळत आलेला विवाह मोडून त्यानं लुईसशी लग्न केलं आहे.

चौघांची पार्श्वभूमी भिन्न, पण महत्त्वाकांक्षा एकच . . . पंतप्रधानपद . . . . दहा, डाऊनिंग स्ट्रीट.

या पदापर्यंत पोचण्याचे प्रत्येकाचे मार्ग वेगळे होते.

या सत्ता शर्यतीची सुरवात झाली चौघेही बॅक बेंचर म्हणून सभागृहात दाखल झाले तेव्हा. याचा दुसरा टप्पा होता — चौघेही निवडणुका जिंकून ज्युनिअर ऑफीसमध्ये आले.

त्यानंतर ???

□

**सा**यमन आणि चार्ल्स दोघेही कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे सभासद; पण पक्षाध्यक्षाच्या निवडणुकीच्या प्रसंगी दोघांमध्ये जी स्पर्धा सुरू झाली तेव्हापासून ते एकमेकांना पाण्यात पाहत असत. समोरासमोर आले तरी ते बोलण्याचे टाळीत. पक्ष नेत्याच्या निवडणुकीच्या वेळेस चार्ल्सने एडवर्ड हीथला पाठिंबा दिला होता तर सायमनने रेगिनाल्ड माऊडलिंगला. हीथ निवडणुक जिंकल्याने चार्ल्सला इन्व्हॉइर्नमेंट टीममध्ये जागा मिळाली आणि सायमनची रवानगी ‘ बॅक बेंचर ’ म्हणून करण्यात आली.

सायमनला जरी ‘ शॅडो कॅबिनेट ’मध्ये घेण्यात आले नाही तरी प्रश्नोत्तराचे वेळी तो जे अभ्यासपूर्वक प्रश्न विचारीत असे. त्यामुळे त्याच्या बुद्धिमत्तेचा पार्टीसाठी जास्तीत जास्त उपयोग करून घ्यायला हवा असे हीथचे मत झाले.

या उलट दारू पिऊन गाडी चालविल्याने वृत्तपत्रांत जी प्रसिद्धी मिळाली त्यामुळे चार्ल्सबद्दल हीथचे मत वाईट झाले. निवडणुका जवळ आलेल्या असताना पक्ष सदस्यांबद्दल जनमत खराब होणे त्याला परवडले नसते. त्यातच चार्ल्सने हाऊस मध्ये आर्थिक बाबींवरील एका डिबेटमध्ये, कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्यावतीने समारोप करताना गोंधळ केला.

सर्वसाधारणत: प्रश्नोत्तराची वेळ संपली की साडेतीनच्या सुमारास पार्लमेंटरी डिबेट सुरू होते. ज्या खात्याच्या विषयावर हे डिबेट असते त्या खात्याचा मंत्री सरकारची बाजू प्रथम मांडतो. हे भाषण जास्तीत जास्त तीन मिनिटांचे असते. यानंतर विरोधी पक्षाचा नेता किंवा त्या खात्याचा ' शॅडो कॅबिनेट ' मिनिस्टर जवळ जवळ तेवढाच वेळ विरोधी पक्षाची बाजू मांडतो. या नंतर साडेचार ते रात्री नऊपर्यंत सरकार व विरोधी पक्षाच्या सदस्यांना त्यांचे विचार मांडता येतात. प्रत्येक सदस्य सर्वसाधारणत: आठ ते नऊ मिनिटे बोलतो. या वेळात ' बॅक बेंचर्स 'ना बोलण्याची संधी मिळते. नऊ वाजता विरोधी पक्षाच्या प्रवक्त्याला पक्षाच्या वतीने समारोपाचे भाषण करावे लागते साडेनऊला सरकारच्यावतीने मंत्र्याचे समारोपाचे भाषण होते आणि रात्री दहाला ठराव मतदानासाठी सभागृहापुढे ठेवला जातो.

चार्ल्सकडे समारोपाचे भाषण करण्याची जबाबदारी होती. त्याने भाषणाची तयारी चांगली केली होती. लेबर गव्हर्नमेंटने पौंडाचे अवमूल्यन केल्याने देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाबद्दल तो बोलणार होता.

चार्ल्सने भाषणाला सुरुवात केली ' सभापती महोदय, मला विचारच करवत नाही की... '.

' मग विचारच करू नका ' लेबर सदस्यांपैकी कुणी तरी मागल्या रांगेतून ओरडले.' सभागृहात हशा पिकला.

चार्ल्सने थांबून पुन्हा सुरुवात केली. ' सभापती महोदय, मला कल्पनाच करवत नाही की, '

'ह्यांना कल्पना शक्तीही नाही'परत तोच सदस्य ओरडून म्हणाला.

आता मात्र कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांनाही हसू आवरले नाही. चार्ल्स इतका गडबडला की आपल्याला काय मुद्दे मांडायचे आहेत याचाच त्याला विसर पडला. तीस मिनिटांचे भाषण त्याने अडखळत वीस मिनिटे रेटले आणि मग घामाघूम होऊन तो खाली बसला.

हीथने ठरविले की चार्ल्सचा उपयोग पक्षाच्या व्हिपच्या कार्यालयात अधिक चांगल्या प्रकारे करून घेता येईल. पार्लमेंटमधील पक्षाच्या कामात सुसूत्रता यावी म्हणून प्रत्येक पक्ष कार्यकारी सचिव नेमतो त्याला ' व्हिप ' असे म्हणतात. कार्यालयातून पक्षाच्या सभासदांसाठी आदेश ( व्हिप्स ) काढले जातात. व्हिपच्या कार्यालयात काम करणाऱ्या सदस्यांना संपूर्ण वेळ काम करणे भाग पडते. इतर सदस्यांप्रमाणे ' पेअरिंगचा ' फायदा घेऊन घरी लवकर परतणे शक्य होत नाही. स्वत: हीथने सुद्धा पक्षाचा नेता बनवण्यापूर्वी व्हिप म्हणून काम केले होते. चार्ल्सला मात्र ही नेमणूक म्हणजे अपमान वाटला पण; त्याला तसे बोलून दाखविणे शक्य नव्हते. आता आपण इनव्हॉइर्नमेंट टीम मधील जागा सोडून द्यायला नकार दिला आणि पुढच्या निवडणुकीत जर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा जय झाला तर आपल्याला मंत्रीपद मिळणे जड जाईल हे तो ओळखून होता.

चार्ल्सची आणखीन एक अडचण होती. तो सेमुर बँकेत संचालक म्हणून काम पाहत होता. आता व्हिपच्या कार्यालयातील जबाबदारी स्वीकारली की बँकेच्या कामाकडे लक्ष पुरविणे त्याला शक्य होणार नव्हते. आधीच बँकेचा चेअरमन स्पेन्सर चार्ल्सच्या विरूद्ध होता. चार्ल्सचा जुळा भाऊ रूपर्ट ह्याने डायरेक्टर व्हावे अशी स्पेन्सरची इच्छा होती; पण चार्ल्स, स्पेन्सर इतकाच धूर्त आणि कावेबाज असल्याने त्याने स्पेन्सरचे सर्व डाव उधळून लावले. आपल्या पत्नीशी–फिओनाशी चर्चा केल्यानंतर चार्ल्सने व्हिपच्या ऑफिसची जबाबदारी स्वीकारायचे ठरविले. बँकेत जाऊन त्याने स्पेन्सरची भेट घेतली. चार्ल्स संचालक पदाचा राजीनामा देणार याचा स्पेन्सरला मनातून आनंद झाला पण त्याने तसे दिसू दिले नाही. चार्ल्सने स्पेन्सरकडून कबूल करून घेतले की जर पुढच्या निवडणुकीत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा पराभव झाला किंवा जय मिळूनही चार्ल्सला मंत्रिपद मिळाले नाही तर त्याची पुन्हा बँकेचा संचालक म्हणून नेमणूक केली जाईल. स्पेन्सरने ताबडतोब होकार दिला.

चार्ल्स सुरुवातीस नाराज असला तरी व्हिपच्या कार्यालयातील काम त्याला मानवले. आता सभागृहात पक्षाच्या वतीने समारोपाची भाषणे बिषणे करायच्या जबाबदारीतून तो मोकळा झाला होता. व्हिपची जबाबदारी ही बरीचशी मेंढरे हाकणाऱ्या गुराख्यासारखी असते. चार्ल्सला हे काम पसंत पडले. शिवाय फिओनानेही त्याला सांगितले की ' शॅडो फायनान्स मिनिस्टर ' बनण्यापूर्वी हीथनेही ' व्हीप ' म्हणून पक्षाचे काम पाहिले होते, फक्त ह्या कामामुळे रात्री घरी परत येईपर्यंत दीड–दोन वाजत. त्यामुळे चार्ल्सला कौटुंबिक जीवन असे काही उरले नव्हते.

चार्ल्सची इनव्हॉइर्नमेंट टीममधील जागा हीथने सायमनला द्यायचे ठरविले. सायमनच्या दृष्टीने हा फारच सुखद धक्का होता. हीथने फार काळ काही त्याच्याविषयी राग धरला नव्हता. मात्र हीथने त्याला बजावून सांगितले की रेमंड गोल्डच्या राजीनाम्याचे वेळी झाला तसा मूर्खपणा पुन्हा होता कामा नये.

या नव्या नेमणुकीचा सायमनला इतका आनंद झाला की त्याने तत्काळ त्याच्या बायकोला इलिझाबेथला ही बातमी कळवायचे ठरविले. हीथच्या ऑफिसमधून बाहेर आल्या आल्याच त्याने 'सेंट मेरीज' हॉस्पिटलला फोन लावला.

' इज दॅट यू, डार्लिंग,'

' नोऽऽ, इटस् द टेलिफोऽन ऑपरेऽटऽ, डॉक्टऽर इलिझाबेथ ऑपरेशन थिएटरमध्ये आहेत. '

' मग पाच मिनिटे बाहेर नाही का येता येणार तिला ?'

' नॉट–अन्लेस यु आर इक्स्पेक्टिंग अ बेबी, सऽ ' बापरे, ह्या सगळ्या गडबडीत इलिझाबेथ प्रसूत झाली असल्याचे आपण चक्क विसरलो होतो हे लक्षात आल्यावर सायमनला हसू आवरले नाही.

रॉनी नेदरकोटच्या कंपनीत सायमन संचालक म्हणून काम करीत होता. ह्या नवीन नेमणुकीचा आपल्या कंपनीतील कामावर काही एक परिणाम होणार नाही असे सायमनने रॉनीला सांगितले. फक्त पुढच्या निवडणुकीत जर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा जय झाला आणि आपल्याला मंत्रिपद मिळाले तरच रॉनीच्या कंपनीतील काम सोडावे लागेल असे सायमनने रॉनीला सांगितले. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी सत्तेवर येईपर्यंत रॉनीने त्याची कंपनी पब्लिक लिमिटेड करू नये असे सायमनचे मत होते.

एकोणिसशे एकूणसत्तरच्या डिसेंबरमध्ये 'लाऊथ' मतदारसंघात झालेल्या 'बाय इलेक्शन' मध्ये जरी कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा जय झाला तरी त्यानंतर चार महिन्यातच इंग्लंड आणि वेल्समध्ये झालेल्या स्थानिक निवडणुकांत लेबर पार्टीला प्रचंड प्रमाणात बहुमत मिळाले. वृत्तपत्रांनी घेतलेल्या 'ओपिनिअन पोल' मध्येही जनमत आपल्या पक्षाला अनुकूल आहे हे पाहिल्यावर, हॅरॉल्ड विल्सननी 'बकिंगहॅम पॅलेस' मध्ये राणीची भेट घेऊन निवडणुका घेण्याविषयी सल्ला दिला. सार्वत्रिक निवडणुकांची तारीख ठरली १८ जून १९७०.

(निवडणुकांचे गणित अचूक कुणालाच मांडता येत नाही. नाहीतर ७७ साली जनता पार्टी सत्तेवर येईल आणि ८० साली इंदिरा गांधी प्रचंड बहुमताने सत्तारूढ होतील याची तरी कुणाला कल्पना होती!)

हॅरॉल्ड विल्सन यांचे गणित चुकले. सार्वत्रिक निवडणुकीत लेबर पार्टीचा पराभव झाला आणि एडवर्ड हीथच्या नेतृत्वाखाली कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये तीस सभासदांचे बहुमत मिळाले.

एडिंबरो कार्लटनमधून अँड्र्यू फ्रासर लेबर पार्टीच्या तिकिटावर ४००९ मतांनी निवडून आला. गेल्या निवडणुकीपेक्षा या वेळी एक टक्का मते त्याला कमी पडली. अँड्र्यूबरोबर त्याच्या पत्नीने—लुईसनेही प्रचारसभांत हिरीरीने भाग घेतला.

कोव्हेंट्री सेंट्रल मतदार संघातून प्रथमच सायमन कॉन्झर्व्हेटिव्ह तिकिटावर २,११८ इतक्या चार आकडी मताधिक्याने निवडून आला. चार्ल्स सेमूरला तर ससेक्स डाऊन मतदार संघातून लेबर पार्टीच्या उमेदवाराच्या दुप्पट मते मिळाली आणि त्याच मतदार संघात लिबरल पार्टीच्या उमेदवाराची अनामत रक्कमही जप्त झाली. लीडस् मतदार संघातून रेमंड १०,४१६ मतांनी निवडून आला. तरी आधीच्या निवडणुकीपेक्षा त्याला दोन टक्के मते कमीच पडली होती. जॉईसच्या मतदार संघातील कामामुळे लीडस् हा लेबर पार्टीचा बालेकिल्ला बनला होता.

राणीने एडवर्ड हीथला कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे सरकार बनविण्यास बकिंगहॅम पॅलेसमध्ये पाचारण केले.

नव्या कॉन्झर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळात आपला इनव्हॉइर्नमेंट डिपार्टमेंटमध्ये समावेश करून घेतला जाईल अशी सायमनची अपेक्षा होती. म्हणून तो दिवसभर फोनशी बसून होता; पण हीथने काही फोन केला नाही. एखाद्याला पंतप्रधान करण्यात कितीतरी व्यक्तींचा हातभार असतो आणि त्यातल्या प्रत्येकाचे समाधान करण्याची जबाबदारी पंतप्रधानांवर असते याची सायमनला कल्पना होती.

दुसऱ्या दिवशी दुपारी सायमन घरी टीव्ही पाहात बसलेला असताना रेगिनाल्ड माऊडलिंगचा फोन आला. मागे पक्षाच्या नेतेपदाच्या निवडणुकीत सायमनने माऊडलिंगला नवीन सदस्यांकडून पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला होता. हीथच्या नव्या मंत्रिमंडळात माऊडलिंगची 'होम सेक्रेटरी' म्हणून कॅबिनेटमध्ये वर्दी लागली होती.

'कॅन्ग्रॅच्युलेशन्स् रेगी' सायमन म्हणाला, 'थँक् यू, मी तुला फोन अशासाठी केला की तू होम डिपार्टमेंटमध्ये अंडर सेक्रेटरी म्हणून यायला तयार आहेस का?'

माऊडलिंगला आपल्या उपकारांचे विस्मरण झाले नाही तर! सायमनने तात्काळ होकार दिला.

माऊडलिंगने त्याला सांगितले की एडवर्ड हीथची इच्छा सायमनने इनव्हॉइर्नमेंट टीममध्येच काम करावे अशी होती; पण माऊडलिंगने हीथची चार तास वाद घालून सायमनसाठी अंडर सेक्रेटरीचे पद मागून घेतले होते.

दुसऱ्या दिवशी सायमनने रॉनी नेदरकोटला त्याच्या कंपनीच्या संचालक पदाचा राजीनामा पाठवून दिला. रॉनीच्या कंपनीचे शेअर्स विकत घेताना सायमनने घेतलेल्या कर्जाचा ओव्हरड्राफ्ट ७२,००० पौंड झाला होता; पण आता एकदा रॉनीची कंपनी पब्लिक लिमिटेड कंपनी झाली की ह्याच्या दुप्पट पैसे आपल्याला मिळतील ह्याची सायमनला खात्री होती.

चार्ल्सची मात्र हीथने निराशा केली. निवडणुकीचा निकाल लागल्याच्या दुसऱ्या दिवशी चार्ल्स फिओनाला घेऊन ससेक्स डाऊन मधल्या त्यांचा फार्म हाऊसवर गेला. चार्ल्सही दिवसभर टेलिफोनची वाट पाहात बसला; पण फोन काही वाजला नाही. दुसऱ्या दिवशी टीव्हीवर चार्ल्सने माऊडलिंग, मॅक्लिओड, मार्गारेट थॅचर, कॅरिंग्टन वगैरेना पंतप्रधानांच्या निवासस्थानातून बाहेर पडताना पाहिले. म्हणजे आता महत्त्वाच्या कॅबिनेट अपॉइंटमेंटस् झालेल्या होत्या. हीथ जर त्याला नव्या मंत्रिमंडळात घेणार असेल तर संध्याकाळपर्यंत फोन यायला हवा.

संध्याकाळी व्हीपच्या ऑफिसमधून फोन आला. चार्ल्सची नेमणूक कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा 'ज्युनिअर व्हीप' म्हणून झाली होती. 'पक्ष सत्तेवर आहे तेव्हाच व्हीप म्हणून काम करण्यात फायदा आहे. शिवाय सत्ताधारी पक्षाचा व्हीप हा मंत्रिमंडळाचाच सदस्य मानला जातो.' अशी फिओनाने चार्ल्सची समजूत काढली.

लेबर पार्टीचा निवडणुकीत पराभव झाल्याने रेमंडची फार निराशा झाली. पौंडाच्या अवमूल्यनाच्या प्रश्नावरून त्याने हॅरॉल्ड विल्सनच्या मंत्रिमंडळातून राजिनामा दिला होता. आता लेबर पार्टीचा विजय झाला तर आपल्याला मंत्रिमंडळात परत बोलाविले जाईल याची त्याला खात्री होती; पण आता कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे सरकार स्थापन झाल्याने लेबर पार्टीच्या 'शॅडो कॅबिनेट'मध्ये आपल्याला जागा मिळेल असे रेमंडला वाटत नव्हते. आपण उत्कृष्ट वक्ता नसल्याने अँड्र्यू फ्रासरसारख्या भाषणपटूलाच शॅडो कॅबिनेटमध्ये घेतले जाईल असे रेमंडला वाटत होते.

रेमंड आता चाळिशीला आला होता. आणखी किती वर्षे लेबर पार्टीला विरोधात राहावे लागेल याची निश्चिती नव्हती. त्याने वकिली पुन्हा सुरू करायचा विचार केला. 'लिंकन इन' ह्या लॉफर्ममध्ये रेमंडने आपले नाव नोंदवले. राजकारणात शिरण्याआधीही वकील म्हणून रेमंडचा नावलौकिक चांगला होता.

रेमंडने जॉईसला सांगितले की लीडस्मध्ये त्यांना आता घर घ्यायची आवश्यकता होती. लंडनमध्ये रेमंड आणि जॉईस एकत्रच राहात होती. रेमंड जेव्हा त्याच्या लीडस्च्या मतदारसंघात जात असे तेव्हा तो आईवडिलांच्या घरीच उतरत असे; पण आता मतदारसंघात स्वतःचे वेगळे घर झाले, म्हणजे जॉईसला तेथे कायम राहाता येईल आणि आपणही विरोधी पक्षात असल्याने फावल्या वेळात

मतदारसंघातील राहिलेली बरीच कामे उरकता येतील असा त्याने विचार केला. जॉईसला त्याने लीडस्‌मध्ये घर पहाण्यास सांगितले. जॉईसच्या लीडसमध्ये इतक्या ओळखी होत्या की, त्यांना परवडेल असे घर शोधणे तिला फारसे त्रासाचे गेले नाही. तिला एवढेच वाटले की आपण वेगळे राहायला लागल्याने रेमंडच्या आईवडिलांना वाईट वाटेल.

लंडनला रेमंड एकटाच राहायला लागला. वकिलीत त्याचा दोन-चार महिन्यात चांगलाच जम बसला. याच वेळी त्याचा फर्ममध्ये नव्याने आलेल्या स्टेफनी आरनॉल्ड नावाच्या एका स्त्री वकिलाशी त्याची मैत्री जुळली. स्टेफनीचे दोन वर्षापूर्वी लग्न झालेले होते आणि तिने घटस्फोटही घेतलेला होता. एका बलात्काराच्या केस-मध्ये रेमंडबरोबर ज्युनिअर वकील म्हणून स्टेफनी हजर राहिली होती. तेव्हा त्यांची प्रथम ओळख झाली. मंडीच्या अनुभवानंतर आता रेमंड बराच सावरला होता. आता तो पूर्वी इतका लाजरा–बुजरा राहिला नव्हता. स्टेफनी बरोबरची त्याची मैत्री चार–सहा महिन्यात इतकी वाढली की अधूनमधून ती रेमंडच्या फ्लॅटवरही येऊन राहू लागली.

रेमंडचा अंदाज बरोबर ठरला. अँड्र्यू फ्रासरला 'शॅडो होम डिपार्टमेंटमध्ये' ज्युनिअर स्पोकस्‌मन म्हणून बोलावण्यात आले. अँड्र्यूलाही या पदाची अपेक्षा होतीच; पण आपल्या पार्टीचा पराभव झाला ह्यापेक्षा लुईसच्या प्रकृतीची त्याला जास्त काळजी होती.

लुईस आता तिसऱ्यांदा प्रेग्नंट होती. मागच्या दोन्ही खेपेस लुईस अपुऱ्या दिवसांची प्रसूत झाली होती. ज्या दिवशी अँड्र्यूला 'शॅडो कॅबिनेट' मध्ये जागा मिळाली त्या दिवशीसुद्धा हाऊस ऑफ कॉमन्समध्ये जाण्याआधी त्याने 'सेंट मेरीज' हॉस्पिटलमध्ये डॉक्टर एलिझाबेथ कसलेकची भेट घेतली. एलिझाबेथने त्याला सांगितले की तिने लुईसची व्यवस्थित तपासणी केलेली आहे आणि ह्या खेपेस तिला कसलाच त्रास होण्याची शक्यता नव्हती; पण तेवढ्याने अँड्र्यूची चिंता कमी होण्यासारखी नव्हती. एलिझाबेथ त्याला म्हणाली की वाईटात वाईट घडून जर तिसरे मूलही दगावलेच तर मात्र त्या दोघांनी परत मुलासाठी प्रयत्न करू नये. कारण लुईसच्या मनःस्थितीवर त्याचा फार ताण पडेल.

सायमन 'होम डिपार्टमेंट' मध्ये अंडर सेक्रेटरी होता तर अँड्र्यू लेबर पार्टीच्या शॅडो होम डिपार्टमेंटमध्ये प्रवक्ता होता. दोघेही उत्तम वक्ते असल्याने सभागृहामध्ये त्यांची चांगलीच खडाजंगी उडत असे. ह्या दोघांची प्रश्नोत्तरे चालत, त्यावेळी ती ऐकण्यासाठी सभासद आवर्जून सभागृहात उपस्थित राहात. सभागृहाबाहेर मात्र दोघांची चांगलीच मैत्री होती.

सायमनची बायको एलिझाबेथ अँड्र्यूची पत्नी लुईसची डॉक्टर असल्याने एरवी विरोधी पक्षात असले तरी त्यांचे एकमेकाकडे जाणे येणे असे. एकदा तर फारच गंमत घडली.

हाऊस ऑफ कॉमन्समध्ये आयर्लंडच्या प्रश्नावरून डिबेट सुरू होते. दक्षिण आयर्लंड स्वतंत्र असले तरी उत्तर आयर्लंड ज्याला 'अल्स्टर प्रांत' म्हणतात– हा प्रॉटेस्टंट लोकांची वस्ती असलेला भाग अजूनही इंग्लंडमध्येच आहे. दक्षिण आयर्लंडमधील अधिकांश वस्ती कॅथालिक लोकांची आहे. संपूर्ण आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी गेली दीडशे वर्षे



अंडर सेक्रेटरी सायमन कसलेक

¤

आयरिश लोक ब्रिटिश सरकारशी झगडत आलेले आहेत. यातूनच आयरिश रिपब्लिकन आर्मी (आय्. आर्. ए.) ही दहशतवादी संघटना निर्माण झाली. गेली कित्येक वर्षे आतंकवादाचा अवलंब करून ही संघटना अल्स्टर प्रांताचे आयर्लंडमध्ये विलीनीकरण करण्याची मागणी करीत आहे.

(दोनच महिन्यापूर्वी लंडनच्या ग्रँड हॉटेलमध्ये बाँब स्फोट करून ब्रिटिश प्राईममिनिस्टर मार्गारेट थॅचर यांना मारण्याचा प्रयत्न आय्-आरएने केला त्यावरून हा प्रश्न आपल्याकडच्या खलिस्तानच्या प्रश्नाइतकाच कसा बिकट बनला आहे याची कल्पना येईल. फरक इतकाच की, खलिस्तानची चळवळ ही विघटनवादी चळवळ आहे तर आयरिश लोकांचा लढा हा अल्स्टर प्रांताला स्वतंत्र आयर्लंडमध्ये सामील करून घेण्यासाठी लढा आहे.)

आजपर्यंत आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा प्रश्न ब्रिटिश लेबर वा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला समाधानकारकरीत्या सोडविता आलेला नाही. त्यामुळे जेव्हा जेव्हा हाऊस ऑफ कॉमन्समध्ये हा विषय चर्चेला येतो त्यावेळी दोन्ही पक्षांची चांगलीच खडाजंगी उडते आणि वातावरण तापलेले राहाते.

लेबर पार्टीच्यावतीने अँड्र्यू फ्रासरने आयर्लंडच्या प्रश्नाबाबत पक्षाची भूमिका मांडली. कोणत्याही तऱ्हेच्या दहशतवादी कारवायांना आपला पक्ष कधीही पाठिंबा देणार नाही हे त्याने स्पष्ट केले. गेल्या शंभर वर्षांत आयर्लंडचा प्रश्न कसा बिकट बनला आहे हे विषद करून त्याने ग्लॅडस्टनच्या शब्दात भाषणाचा शेवट केला–

'एव्हरी टाईम आय फाईंड द सोलुशन टू द आयरिश क्वेश्चन, दे चेंज द क्वेश्चन.'

भाषण संपल्याबरोबर अँड्र्यू ताबडतोब सभागृहाबाहेर पडला. तासाभरातच तो परत आला आणि पुन्हा पाच मिनिटात बाहेर गेला

तो अर्ध्या तासाने परतला.

सरकारच्या वतीने 'होम डिपार्टमेंट' चा अंडर सेक्रेटरी सायमन समारोपाचे भाषण करणार होता. रात्रीचे नऊ वाजत आले होते. आरोप-प्रत्यारोपांनी आधीच वातावरण तापलेले होते. अँड्र्यूच्या ह्या सतत आत-बाहेर जाण्याला एका कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्याने हरकत घेतली. सरकारच्या वतीने अंडर सेक्रेटरी सायमन कसलेक भाषण करीत असताना विरोधी पक्षाच्या प्रमुख वक्त्याने सभागृह सोडून जाणे हे सभागृहाच्या प्रथेला धरून नाही असे त्याने सभापतींच्या निदर्शनास आणले.

अँड्र्यूने घाईघाईने कागदावर दोन ओळी खरडून चिठ्ठी सायमन-कडे पाठवून दिली. सायमनने भाषण करता करता चिठ्ठीकडे नजर टाकली. मग सभासदांना उद्देशून तो म्हणाला, 'एरवी विरोधीपक्षाचे माननीय सभासद जर माझे भाषण चालू असताना सभागृह सोडून गेले असते तर मीही हरकत घेतली असती; पण ह्या वेळेस त्यांना कोणत्या कारणासाठी बाहेर जाणे भाग पडले ह्याची मला कल्पना आहे. अँड्र्यू फ्रासर सर्वकाळ 'सेंट मेरीज' हॉस्पिटलमध्ये होते.'

मग थोडा वेळ थांबून सायमन म्हणाला, 'हिज वाईफ वॉज इन लेबर' आणि मग क्षणभर थांबून तो पुढे म्हणाला, 'अँड इट वॉज माय वाइफ हू डिलिव्हर्ड द बेबी.'

वातावरणातला ताण एकदम गेला आणि दोन्ही बाजूचे सभासद अँड्र्यूकडे पाहात हसायला लागले. त्यांचे हसणे थांबते आहे तोच सायमन पुढे म्हणाला, 'फॉर दोज मेंबर्स ऑफ द हाऊस हू थ्राईव्ह ऑन स्टॅटिसस्टीक्स, इट इज अ बॉय अँड ही वेज् फोर पौंडस्, थ्री औंसेस.' सभागृहातला हशा कमी होण्यापूर्वीच अँड्र्यू पुन्हा सभागृहा-बाहेर पडला.

मुलगी झाली तर तिचे नाव क्लेअर ठेवावे अशी लुईसची इच्छा होती; पण आता मुलगा झाला. अँड्र्यूने त्याचे 'रॉबर्ट' हे नाव निश्चित केले. मुलगा वजनाने कमी होता म्हणून डॉक्टर एलिझाबेथने त्याला रात्रभर 'इनक्युबेटर' मध्ये ठेवले होते. अँड्र्यूबरोबर तिनेही रात्रभर जागरण केले.

रॉबर्ट फ्रासर दिसायला बराचसा अँड्र्यूसारखाच होता. त्याचे नाक मात्र लुईसच्या वळणावर गेले होते. तीन आठवड्यांनी रॉबर्टला घेऊन लुईस आणि अँड्र्यू हॉस्पिटलमधून निघाले तेव्हा एलिझाबेथने अँड्र्यूला सांगितले की, ह्यापुढे मात्र लुईसला मूल होणे शक्य नव्हते.

## पाठिंबा मिळालाच पाहिजे

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमधील देशात दळणवळण आणि व्यापारात सुसूत्रीकरण करण्यासाठी 'युरोपिअन इकॉनॉमिक कम्यु-निटी' (इइसी) च्या संकल्पनेचा उदय झाला. फ्रान्स, जर्मनी, इटली, बेल्जियम, नेदरलँड या देशांनी मिळून १९५७ ला इइसीची स्थापना केली. इग्लंड बरेच वर्षे इइसीचा सदस्य झाले नाही. सुरुवातीस खाण व्यवसाय आणि पोलाद ह्या दोन उद्योगधंद्यांच्या बाबतीत ह्या देशांनी सहकार्य करायचे ठरविले व पुढे हे सहकार्य आयात निर्यातीच्या सर्वच क्षेत्रात वाढविण्याची योजना पुढे आली. ह्यासाठी आयात निर्यातीचे नियम, कर सवलती, वाहातूक व्यवस्था यामध्ये सहाही देशांत समान कायदे करण्याची आवश्यकता होती.

'युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटी' मध्ये ब्रिटनने प्रवेश करावा की नाही ह्याबाबत हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्यांचे एकमत नव्हते. पंतप्रधान एडवर्ड हीथ स्वतः ब्रिटनने 'इइसी' मध्ये प्रवेश करावा ह्या मताचे होते; पण खुद्द कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीतच पंतप्रधान हीथना याबाबतीत विरोध होता. 'इइसी' चा विषय सभागृहापुढे चर्चेला येण्यापूर्वी पार्टीच्या सर्व सभासदांचा पाठिंबा मंत्रिमंडळाच्या निर्णयाला घेणे आवश्यक होते. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या प्रमुख व्हिपने ही जबाब-दारी चार्ल्सवर सोपवली.

'काय वाट्टेल ते झाले तरी पार्टीच्या सर्व सभासदांचा पाठिंबा सभागृहात मतदानाचे वेळी मंत्रिमंडळाच्या निर्णयाला मिळाला पाहिजे' त्याने चार्ल्सला बजावून सांगितले.

लेबर पार्टीचेही काही सदस्य ब्रिटनने इइसीचे मेंबर व्हावे ह्या मताचे होते. त्यांची सरकारला 'इइसी' बाबत पाठिंबा द्यायची तयारी होती; पण कॉन्झर्व्हेटिव्ह सरकार कामगार संघटनांच्या रचने-बाबत एक नवीन विधेयक मांडणार होते. त्यात त्यांना काही बदल करून हवे होते. हीथ याच्या मंत्रिमंडळाने ह्या बदलांना मान्यता दिली तर पक्षाचा आदेश मोडूनही जवळपास पन्नास तरी लेबर पार्टीचे सदस्य इंग्लंडने 'इईसी' चे मेंबर होण्याबाबतच्या हीथ-मंत्रिमंड-ळाच्या निर्णयाला पाठिंबा द्यायला तयार होते; पण हीथ कामगार विषयक विधेयकात कोणताही बदल करायला राजी नव्हते. त्यामुळे चार्ल्सचे काम अधिकच बिकट बनले.

नऊ वर्षांच्या हाऊस ऑफ कॉमन्समधील अनुभवानंतर चार्ल्स राजकारणातील कुटिलनीतीत चांगलाच पारंगत झाला होता. एखादी गोष्ट साध्य करायची म्हटली म्हणजे साधनशुचितेचा विचार त्याच्या मनाला शिवत नसे. पैसे चारून काम झाले तर ठीक, नाहीतर धाक-दपटशानेही आपले इप्सित साध्य झाले पाहिजे अशी त्याची प्रवृत्ती होती. कोणत्याही विशिष्ट तत्त्वप्रणालीसाठी जगण्यापेक्षाही यश आणि सत्ता हेच त्याचे अंतिम उद्दिष्ट होते. सायमन कसलेकही त्याच्यासारखा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा सभासद. सायमननेही पंतप्रधान व्हायची स्वप्ने पाहिली; पण यशासाठी त्याने कधी विधिनिषेधशून्य मार्ग चोखाळले नाही.

'इइसी' बाबतचे विधेयक आपण सभागृहात पास करून घेऊ शकलो तर हीथला आपल्याला मंत्रिमंडळात स्थान द्यावेच लागेल याची चार्ल्सला खात्री होती. यासाठी रात्रंदिवस परिश्रम करायची त्याची तयारी होती. त्याने ३३० कॉन्झर्व्हेटिव्ह सभासदांचा चार्टच तयार केला. पक्षाचे एकूण २१७ सभासद सभागृहात विधेयकाला पाठिंबा देतील अशी त्याची अपेक्षा होती. उरलेल्या ११३ पैकी ५४ सदस्यांचा कल त्याला निश्चित ठाऊक नव्हता आणि उरलेले ५९ सभासद पक्षाचा आदेश मोडूनही विधेयकाच्या विरुद्ध मतदान करतील अशी पक्षाला भीती वाटत होती.

लेबर पार्टीमधल्या साधारणतः ५० सदस्यांचे तरी आपण मन वळवू शकू असा चार्ल्सला आत्मविश्वास वाटत होता.

ह्या अशा प्रकारच्या कामाचा चार्ल्सला हीथच्या निवडणुकीपासून अनुभव होता. चार्ल्सने महिनाभरात पक्षाच्या ५४ सदस्यांच्या गाठी-भेटी घ्यायचे ठरविले.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे जे ५९ सदस्य विधेयकाच्या विरुद्ध होते त्यात सर अलेक् पिमकीनचाही समावेश होता. अलेक् पिमकीन

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे जुने सदस्य. गेली ३५ वर्षे ते कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या तिकिटावर निवडून येत होते. पिमकीन आणि चार्लसचा स्वभाव सारखाच. फरक एवढाच की पिमकीनने राजकारणात चार्ल्स-पेक्षा जास्त पावसाळे पाहिले होते.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीमध्ये पिमकीनचा बारा सदस्यांचा वेगळा गट होता. पिमकीनच्याच आशीर्वादाने हे सदस्य राजकारणात आले होते. त्यामुळे ते नेहमीच पिमकीनच्या आज्ञेत असत. आपल्या-कडे जसा सत्ताधारी पक्षातही अंतुले गट, भोसले गट, पवार गट असे प्रेशर ग्रुप्स असतात तसेच पिमकीनने हे चेले हाताशी बाळगले होते.

पिमकीनचे मन वळविण्यात जर आपण यशस्वी झालो तर एकूण तेराजणांचा विधेयकासाठी पाठिंबा मिळवता येईल असा चार्लसने विचार केला. अगदी संपूर्णपणे कोलांटीउडी मारणे पिमकीनला शक्य झाले नाही तरी कमीत कमी त्याच्या पाठीराख्यांना त्याने तटस्थ राहाण्यास भाग पाडले तरी आपले काम होईल, असे चार्लसला वाटले; पण पिमकीन चार्लसइतकाच धूर्त आणि कावेबाज होता. चार्लसने पिमकीनला वश करण्यासाठी मार्ग शोधायला सुरुवात केली आणि त्याला मार्ग सापडला.

ब्रिटनमध्ये दर दहा वर्षांनी मतदारसंघांची पुनर्रचना करण्यात येते. नोकरी निमित्त वा इतर अनेक कारणांनी नेहमीच लोकांचे खेड्यातून शहराकडे किंवा काही वेळा शहरातून खेड्याकडे स्थलांतर होत राहाते. ह्यामुळे मतदारसंघातील मतदारांच्या संख्येवर परिणाम होतो. ब्रिटनमध्ये साठ ते सत्तर हजार मतदारांचा एक मतदार-संघ बनविला जातो. मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड ह्या भागांसाठी चार कायम स्वरूपाची 'बाऊंडरी कमिशन्स' (मतदारसंघाच्या सीमा निश्चित करण्यासाठी नेमलेली मंडळे) नेमलेली आहेत. हाऊस ऑफ कॉमन्सचा सभापती ह्या मंडळाचा चेअरमन असतो आणि कोर्टाचा रिटायर्ड जज्ज व्हाईस चेअरमन म्हणून नेमला जातो.

पक्षाच्या प्रमुख व्हीपकडून चार्लसला कळले होते की, ह्या पुनर्रचनेमध्ये पिमकीनचा इतक्या वर्षांचा मतदारसंघ नष्ट होत होता. त्यामुळे त्यांना आता नवा सुरक्षित मतदारसंघ शोधणे भाग होते.

केवळ पिमकीनच्याच बाबतीत असे घडले होते असे नव्हे. अंडर सेक्रेटरी सायमनलाही पुनर्रचनेचे परिणाम भोगावे लागणार होते. शहरातल्या घटत चाललेल्या लोकसंख्येमुळे 'कोव्हेंट्री' भागातील चार मतदारसंघांचे बाऊंडरी कमिशनने तीन मतदारसंघ बनविले होते. त्यात सायमनचा कोव्हेंट्री सेंट्रल मतदारसंघ इतर तीन मतदार-संघात वाटून दिलेला होता.

चार्ल्स, अँड्रयू किंवा रेमंड ह्यांच्या मतदारसंघांना मात्र पुनर्रचने-मुळे धक्का पोहोचलेला नव्हता. पुनर्रचनेत एकदा मतदारसंघ गेला की नवीन मतदारसंघ धुंडाळणे फार जिकिरीचे काम असते.

इंग्लंडमध्ये प्रत्येक पक्षाची मतदारसंघात 'निवडसमिती' असते. आपल्याकडे फक्त 'हायकमांड' उमेदवारांची निवड करते. प्रदेश आणि जिल्हा कमिटया ह्या नाममात्र असतात. ब्रिटनमध्ये मतदार-संघांतील पक्षाची 'निवडसमिती'. पक्षाचे तिकीट हवे असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवडणुकीसाठी उमेदवाराचे नाव निश्चित करते. सर्वसाधारणतः मतदासंघाबाहेरील व्यक्तीला तिकीट देण्याकडे ह्या समित्यांचा कल नसतो. पक्षाने राजकीय कारणांसाठी बाहेरून उमेदवार लादलेला त्यांना आवडत नाही. याच कारणासाठी सायमनला आणि पिमकीनला नवीन मतदारसंघ शोधणे जड जात होते. पक्षाच्या सभासदाच्या मृत्यूमुळे किंवा निवृत्तीमुळे काही जागा रिकाम्या झालेल्या असतात. अशा मतदारसंघांसाठी पुनर्रचनेत मत-दारसंघ गेलेल्या सदस्यांना प्रयत्न करावे लागतात.

लोकसंख्येच्या वाढीमुळे चार्ल्सच्या ससेक्स डाऊन मतदारसंघाला लागूनच 'लिटलहॅम्प्टन' येथे नवीन मतदारसंघ निर्माण करण्यात आला होता. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या व्हीपने सायमनला ह्या मतदार-संघासाठी प्रयत्न करायला सांगितले.

'लिटलहॅम्प्टनच्या आपल्या निवडसमितीचा चेअरमन अलेक्झांडर डग्लस चार्ल्सचा जवळचा मित्र आहे. चार्ल्सला तुझ्यासाठी शब्द टाकायला सांग' व्हीपने सायमनला सल्ला दिला.

## सायमनला तिकिट मिळता कामा नये

पण चार्लसला 'लिटलहॅम्प्टनची' जागा सायमनला द्यायची इच्छा नव्हती. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये पिमकीनला लॉबीमध्ये गाठून त्याने बाजूला बोलावले आणि त्याच्यापुढे प्रस्ताव मांडला. सौदा सरळ होता. पिमकीन जर त्याच्या बारा पाठीराख्यांना इडसीच्या विधे-यकाच्या चर्चेच्या दिवशी मतदानापासून परावृत्त करू शकले तर चार्ल्स 'लिटलहॅम्प्टन'मधून त्यांना पुढच्या निवडणुकीसाठी पक्षाचे तिकीट मिळवून देण्याची व्यवस्था करील. पिमकीनला हे आमिष टाळणे कठीण होते.

इडसीवर मांडलेल्या विधेयकाला उघड पाठिंबा देणे त्यांना शक्य नव्हते. अशी कोलांटीउडी खाल्ली तर सर्वांनाच आपला संशय येईल, त्यापेक्षा मी आणि माझे पाठीराखे मतदानात भाग घेणार नाही म्हणजे तुमच्या विरोधातील तेरा मते कमी होतील, असे त्यांनी चार्लसला सांगितले. चार्लसला एवढेच हवे होते.

दोन दिवसातच टेन डाऊनिंग स्ट्रीटच्या पंतप्रधानांच्या निवास-स्थानावर पिमकीनचे पत्र गेले. त्यांनी हीथना लिहून कळविले की, इडसी विधेयकाच्या चर्चेनंतर मतदानाचे वेळी ते व त्यांचे बारा पाठीराखे तटस्थ राहतील.

पिमकीनने पत्र पाठविले त्याच दिवशी चार्लसने 'लिटलहॅम्प्टन'च्या कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या निवडसमितीचा चेअरमन अलेक्झांडर डग्लस ह्याला फोन केला. डग्लसशी चार्ल्सची इटनच्या शाळेत असल्या-पासूनची दोस्ती होती. चार्लसने रात्री त्याला घरी जेवायला बोला-वले आणि येताना आठवणीने पार्टीच्या उमेदवारांची फाईल आणा-यला सांगितले.

चार्ल्सच्या मनात कोणता उमेदवार आहे याची डग्लसला कल्पना नव्हती. त्याने चार्लसला सांगितले की, सगळ्या इच्छुक उमेदवारांचा 'बायो-डेटा' त्याने तपासून पाहिला होता. डग्लसचा आणि निवड-समितीच्या सभासदांचा फक्त सायमन कस्लेकला तिकीट द्यावे असा सल्ला होता.

चार्ल्सचा चेहरा पडला. त्याने डग्लसला सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत सायमनला हे तिकीट मिळता कामा नये. अलेक् पिम-

कीनला ही जागा मिळावी असा चार्ल्सचा आग्रह होता आणि मग थोडा वेळ थांबून तो म्हणाला, 'यासाठी वाटेल तेवढा पैसा खर्च करायची तयारी आहे.' डग्लसला चार्ल्सचे म्हणणे समजले.

दोन दिवसांनी डग्लसने चार्ल्सला फोन करून कळविले की, निवड समितीने मुलाखतीसाठी तयार केलेल्या शॉर्ट लिस्टमधून सायमनचे नाव वगळण्यात आले होते. आता मुलाखतीसाठी पिमकीन आणि इतर दोन स्थानिक लोकांना बोलावण्यात येईल. त्यापैकी एक नुकताच ऑक्सफर्डमधून बाहेर पडलेला 'कोवळा' उमेदवार आहे आणि दुसरा उमेदवार लिटल्‌हेम्टनच्या नगरपालिकेची पक्षाची नगरसेविका आहे. 'निवडसमिती पिम्‌कीनच्या बाजूने मदतान करील याची मी व्यवस्था करतो.' डग्लसने चार्ल्सला सांगितले.

## बढती आणि फिओनाने दिलेला धक्का

चार्ल्सने दुसऱ्या दिवशी सकाळीच सायमनला फोन लावला आणि सांगितले की, 'लिटलहॅम्टनची' सीट अखेरीस अलेक् पिमकीनला देण्यात आली. चार्ल्स म्हणाला की, त्याने अलेक्झांडर डग्लसकडे सायमनला तिकीट देण्यासाठी आग्रह धरला; पण समितीचा कल पिमकीनकडेच होता. दुसरा कोणताही मतदारसंघ सायमनच्या मनात असेल तर त्याच्यासाठी स्वतःचे वजन खर्च करायची चार्ल्सची तयारी होती.

व्हीपने सुचविले तेव्हा चार्ल्सची मदत मागायला सायमन संकोचला होता. पण नंतर त्याने चार्ल्सला आपल्यासाठी डग्लसकडे शब्द टाकायला विनंती केली होती. चार्ल्सने आपल्यासाठी इतकी धडपड केली. आपल्याला उगाचच त्याच्याबद्दल पूर्वग्रह होता, सायमनला वाटले.

चार्ल्सने मात्र एका दगडात दोन पक्षी मारले. 'लिटल्‌हेम्टनची' सीट पिमकीनला मिळाल्याने सभागृहात 'इईसी'वरचे विधेयक मांडल्यावर पिमकीन आणि त्याचे बारा सदस्य मतदानाचे वेळी तटस्थ राहाणार होते आणि सायमनला जर सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत मतदारसंघ मिळाला नाही तर त्याला निवडणूक लढता येणार नव्हती. म्हणजे आपोआपच हाऊस ऑफ कॉमन्समधून त्याचा महत्त्वाचा प्रतिस्पर्धी नष्ट होणार होता. हीथने आपली एनव्हॉयर्नमेंटची जागा काढून सायमनला दिली ह्याचा अजून चार्ल्सला विसर पडला नव्हता.

चार्ल्सच्या तीन महिन्यांच्या परिश्रमांना फळ आले. एकोणिसशे बहात्तरच्या सप्टेंबर महिन्यात सभागृहाकडे 'युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटी' वरील विधेयक चर्चेला आले सतत सहा दिवस सभागृहात वादविवाद झाला. कित्येकदा चर्चा आटोपून मतदान सुरू होईपर्यंत सकाळचे दोन वाजलेले असत विधेयकातील प्रत्येक तरतुदीवर मतदान घेण्यात आले. कधी कधी तर फक्त सहा मतांनी तरतुदी पास झाल्या.

शेवटच्या दिवशी पंतप्रधान एडवर्ड हीथनी कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या वतीने विधेयकावरील समारोपाचे भाषण केले. रात्री साडेनऊला पंतप्रधानांचे भाषण संपले आणि दहा वाजता विधेयक अंतिम स्वरूपात मतदानाला मांडण्यात आले.

११२ मतांनी विधेयक पास झाले. रॉय जेनकीन्स ह्या लेबर-पार्टीच्या सभासदांच्या नेतृत्वाखाली लेबरपार्टीच्या ६९ सभासदांनी पक्षाचा आदेश मोडून विधेयकाच्या बाजूने कौल दिला. ह्या पूर्वी लेबरपार्टीचे सरकार असतानाही अँड्र्यू फ्रासर ब्रिटनने ईईसीचे मेंबर असावे ह्या मताचा होता. त्यामुळे ह्या वेळीही त्याने विधेयकाच्या बाजूने मतदान केले.

रेमंड गोल्डने मात्र विधेयकाला कडाडून विरोध केला. सहा दिवसांतली सभागृहातली रेमंडची भाषणे इतकी मुद्देसूद आणि प्रभावी होती की, एक दोन तरतुदी पास होतील की नाही अशी चार्ल्सला भीती वाटत होती. पण विधेयक हाऊस ऑफ कॉमन्समधून सुखरूप बाहेर पडले. आता हाऊस ऑफ लॉर्डसमधून मान्यता मिळून राणीचा शिक्का बसणे हा फक्त वेळेचा प्रश्न होता. सायमन कस्लेकनेही पक्षाच्या आदेशानुसार विधेयकाच्या बाजूने मतदान केले.'

एकोणिसशे चौसष्ठमध्ये एम्‌पी म्हणून निवडून आल्यानंतर नऊ वर्षात चार्ल्सला मिळालेला हा सर्वात मोठा विजय. चार्ल्स नसता तर एडवर्ड हीथना विधेयक पास करून घेणे मुश्कील झाले असते.

राणीची मान्यता मिळून विधेयक जेव्हा कायदा झाले, त्या दिवशी कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या व्हीपने पक्षाच्या सभासदांना मोठी पार्टी दिली. चार्ल्सच्या प्रयत्नांची त्यांनी तोंड भरून स्तुती केली आणि मग पार्टी संपल्यावर रात्री अकरा वाजता घरी निघताना चार्ल्सला बाजूला घेऊन व्हीपने त्याला सांगितले की, हीथने त्याला दुसऱ्या दिवशी सकाळी टेन डाऊनिंग स्ट्रीटवर भेटायला बोलावले आहे.

चार्ल्स पंतप्रधान एडवर्ड हीथना भेटायला गेला तेव्हा त्यांनी चार्ल्सने केलेल्या प्रयत्नांबद्दल त्याचे आभार मानले. निघताना चार्ल्सच्या पाठीवर थाप मारून पंतप्रधान म्हणाले, 'आय वॉट यू टू टेक ओव्हर अँज वन ऑफ द मिनिस्टर्स ऑफ स्टेट अॅट द डिपार्टमेंट ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीज्.'

आनंदाने चार्ल्सच्या तोंडून शब्दच फुटेना.

पण चार्ल्सचा हा आनंद फार काळ टिकणार नव्हता. पंतप्रधानांच्या घरून सरळ हाऊस ऑफ कॉमन्सकडे गाडी घेण्याऐवजी फिओनाला ही बातमी देण्यासाठी चार्ल्सने ड्रायव्हरला गाडी इटॉन स्क्वेअरच्या त्याच्या घराकडे नेण्यास सांगितले. चार्ल्स घाईघाईने पायऱ्या चढून वर गेला. फिओना बेडरूममध्ये होती. चार्ल्सने बेडरूमचा दरवाजा उघडला. फिओना अजून पलंगावरच होती. मात्र अलेक्झांडर डग्लस आरशात पाहून कोटाची बटणे लावीत होता. चार्ल्सला क्षणभर अंगातले त्राणच गेल्याचा भास झाला. त्याला वाटले तेवढा डग्लस मूर्ख नव्हता तर.

इइसीचे विधेयक पास करून घेण्याची जबाबदारी चार्ल्सने स्वीकारली तेव्हापासून फिओनाशी त्याचा संबंध तुटलेलाच होता. सकाळी दोन अडीच वाजता तो घरी परतायचा आणि सकाळी साडे नऊ दहा वाजता पक्षाच्या कार्यालयात हजर व्हायचा. ह्या मधल्या काळात डग्लसने फिओनाशी चांगलेच संधान बांधले. आज अचानक चार्ल्स अवेळी घरी आला म्हणून त्याची डग्लसशी भेट झाली.

ह्या धक्क्यातून सावरायला चार्ल्सला वेळ लागला. हाऊस ऑफ कॉमन्सच्या राजकारणात तो इतका गुंतला होता की, फिओनाचा विचार करायची त्याला कधी फुरसदच मिळाली नाही. तिचा विश्वास आणि प्रेम तो गृहितच धरून चाललेला होता. फिओनाने

नंतर खूप रडारड केली. आपण परत डग्लसचे तोंडही पाहाणार नाही असे वचनही दिले. पण चार्लस्चे समाधान होणार नव्हते. ' तुला कधीच माफ करणे शक्य नाही. ' त्याने तिला सांगून टाकले. कित्येक दिवस त्याने तिच्याशी बोलणेही सोडले.

आणि तरीही फिओनाला घटस्फोट देणे चार्लसला शक्य नव्हते. तसे पहायला गेले तर पतीपत्नी ह्या अर्थाने त्यांचा विवाह केव्हाच संपुष्टात आला होता. फक्त चार्लसला आता त्याची प्रकर्षाने जाणीव झाली होती. फिओनाला घटस्फोट दिला तर वृत्तपत्रांतून त्याचा गाजावाजा होईल आणि पक्षातली आपली प्रतिमा डागाळेल ह्या भीतीने चार्लसने घटस्फोटाचा विचार सोडला.

मधल्या काळात इंग्लंडमधील बेकारीचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला होता. एकोणिसशे सत्तरच्या मध्याशी देशातील सुशिक्षित बेकारांची संख्या दहा लाखावर जाऊन ठेपली. आणि नाईलाजाने पंतप्रधान एडवर्ड हीथना जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती आणि कामगारांचे पगार गोठवावे लागले. याचा परिणाम म्हणून देशभर संपाचे लोण पसरले. ऑक्टोबर ७३ मध्ये जेव्हा राणीने पार्लमेंटचे उद्घाटन केले, तेव्हां हाऊस ऑफ कॉमन्समध्ये निवडणुकीचेच वारे वहायला लागले होते. स्वतः एडवर्ड हीथनी टीव्हीवरील मुलाखतीत बेकारांची संख्या २२,९४,४४८ असल्याचे मान्य केले होते. वहातूक आणि खाण कामगारांचे संप मिटविण्यात कॉन्झर्व्हेटिव्ह सरकारला अपयश आले होते.

अशा परिस्थितीत २८ फेब्रुवारी १९७४ ला सार्वत्रिक निवडणुका घ्यायचे हीथच्या मंत्रिमंडळाने ठरविले. ह्या निवडणुकीतली कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीची घोषणा होती. ' हू रनस् द कंट्री ?' पण ह्या घोषणेमुळे कामगार संघटनांचा कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला असलेला विरोध अधिकच तीव्र झाला.

ह्या सगळ्या काळात अँड्र्यू फ्रासरच्या आयुष्यात सांगण्यासारखे विशेष घडले नाही. त्याचा मुलगा रॉबर्ट आता वडिलांचे बोट धरून चालायला शिकला होता. रॉबर्टमध्ये अँड्र्यू इतका रमला होता की, ' शॅडो कॅबिनेट ' मधल्या त्याच्या ' होम डिपार्टमेंट ' मधल्या कामाकडेही त्याचे दुर्लक्ष होत असे. रॉबर्टची सतत बडबड ऐकून लुईसची खात्री पटली की, वडिलांसारखाच तोही एक दिवस राजकारणात शिरणार. अँड्र्यूने मात्र ठरविले होते की, मुलाला आपण स्कॉटलंडमधील सर्वोत्तम फुटबॉलपटू करायचे.

निवडणुकीच्या काळात महिनाभर चार्लस आणि फिओना एकत्र प्रचारासाठी फिरली. मतदार संघातल्या एकदोन प्रदर्शनांचे उद्घाटनही त्यांनी एकत्र केले. ससेक्स डाऊनच्या वृत्तपत्रात पहिल्या पानावर त्यांच्या दोघांचा एकत्र फोटो छापून आला. वरवर पाहणाराला त्या दोघांमध्ये काही बिनसले आहे याची शंकाही आली नसती.

निवडणुकीत नेहमीच शहरातल्या मतदार संघातली मतमोजणी आधी आटोपली जाते आणि मग दुसरे दिवशी सकाळपर्यंत खेड्यातील मतदार संघातील निर्णय यायला सुरुवात होते. एकोणिसशे चौऱ्याहत्तरच्या ह्या निवडणुकीत अगदी उत्तर आयर्लंडकडील मतदार संघातला शेवटचा निर्णय बीबीसीवरून जाहीर होईपर्यंत कोणत्या पक्षाचे सरकार सत्तेवर येईल ह्याची खात्री देता येत नव्हती. दुसऱ्या दिवशी दुपारी चार वाजता बीबीसीवरून अंतिम निकाल जाहीर करण्यात आला.

- लेबर पार्टी – ३०१
- कॉन्झर्व्हेटिव्ह – २९६
- लिबरल – १४
- (उत्तर आयर्लंड) अल्स्टर युनियनिस्ट – ११
- स्कॉटिश नॅशनॅलिस्ट – ७
- वेल्श नॅशनॅलिस्ट – २
- इतर – ४

## विल्सनला बकिंगहॅमपॅलेसमधून बोलावणे

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या एडवर्ड हीथना लिबरल पार्टीच्या अटी मंजूर नव्हत्या. लिबरल पार्टीचा, मंत्रिमंडळात त्यांचे सदस्य घेतले जावे असा आग्रह होता. हीथचे म्हणणे होते की, लिबरल पार्टीने बाहेरून कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या सरकारला पाठिंबा द्यावा.

लेबर पार्टीचे नेते हॅरॉल्ड विल्सन यांनी लिबरल पार्टीच्या मदतीने संयुक्त सरकार बनविण्याची तयारी दर्शविली आणि विल्सनना बकिंगहॅम पॅलेसमधून बोलावणे आले.

चार्लस ससेक्स डाऊन मतदारसंघातून प्रचंड बहुमताने निवडून आला. अलेक् पिमकीनचा लिटलहेम्प्टन हा मतदारसघ कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा सुरक्षित मतदार संघ होता. त्यामुळे पिमकीनला निवडून यायला फारसे कष्ट पडले नाहीत.

सायमन कसुलेकला मात्र शेवटपर्यंत मतदारसंघ मिळाला नाही. सायमन हीथच्या मंत्रिमंडळात ' होम डिपार्टमेंट ' मध्ये अंडर सेक्रेटरी होता. त्यामुळे कामाच्या ओझ्याखाली त्याला मतदारसंघ मिळविण्यासाठी लोकांच्या गाठीभेटी घ्यायला वेळ मिळायचा नाही.

लंडनपासून तिनशे–साडेतीनशे मैल दूर असलेल्या ' रेडकॉर्न ' ह्या खेड्यातल्या मतदार संघासाठी सायमनने प्रयत्न केले होते. एलिझाबेथ आणि तो दोघही मतदार संघातील कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या कार्यालयात मुलाखतीसाठी गेले होते. मंत्री म्हणून सायमनचे ' रेडकॉर्नला ' स्वागत चांगले झाले; पण दिवसभराच्या मुलाखतीनंतर निवड समितीने पार्टीच्या रेडकॉर्नच्याच उमेदवाराला तिकीट द्यायचे ठरविले.

लेबर पार्टीचे नवे सरकार स्थापन होईपर्यंत म्हणजे १ मार्च १९७४ पर्यंत सायमनने अंडर सेक्रेटरी म्हणून होम डिपार्टमेंटचे काम पाहिले. पक्षाच्या व्हीपने त्याला सांगितले की, संधी मिळेल तेव्हा प्रथम बाय इलेक्शनमध्ये त्याला निवडून आणले जाईल.

नऊ वर्षे हाऊस ऑफ कॉमन्समध्ये काढल्यानंतर प्रथमच सायमनला पाच वर्षे सभागृहाबाहेर काढावी लागणार होती. रॉनी नेदरकोरच्या कंपनीचे शेअर्स विकत घेण्यासाठी त्याने काढलेला बँकेचा ओव्हर ड्राफ्ट आता ९०,००० पौंडापर्यंत जाऊन पोहोचला होता. अजून एलिझाबेथला त्याने ह्या कर्जाची बातमी दिलेली नव्हती. सायमन सध्या मोकळा आहे म्हटल्यावर रॉनीने त्याला पत्र लिहून वर्षाला ५,००० पौंड पगारावर कंपनीचा एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर म्हणून येण्याची ऑफर दिली. सायमनला आता पैशाची गरज होतीच. त्याने तात्काळ ऑफर स्वीकारली.

अँड्र्यू फ्रासर त्याच्या एडिंबरो कार्लटन मतदार संघातून लेबर पार्टीच्या तिकिटावर २,२२९ मतांनी निवडून आला. त्यावेळी त्याच या

विरुद्ध कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीबरोबरच स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीने ज्यो मॅकपर्सन ह्या उमेदवार उभा केला होता.

लीड्समध्ये रेमंडने आणि जॉईसने वेगळे घर घेतले होते. लीड्स-मधून निवडणूक जिंकणे रेमंडला फारसे त्रासाचे पडले नाही. ह्या मधल्या काळात फक्त एकच महत्त्वाचा बदल घडलेला होता. तो म्हणजे स्टेफनी आरनॉल्ड ह्या घटस्फोटित स्त्री वकिलाशी त्याचा जो 'लिंकन इन' ह्या फर्ममध्ये काम करताना संबंध आला होता तो एव्हांना संपुष्टात आला होता. खरं म्हणजे रेमंडही तिला कंटाळला होता. नशिबाने स्टेफनीची 'लिंकन इन'मध्ये नव्याने नोकरीला लागलेल्या एका तरुण वकिलाशी मैत्री जुळली आणि रेमंडमधला तिचा इंटरेस्ट कमी झाला. रेमंडचीही आता चाळीशी उलटलेली होती. जॉईसला रेमंडच्या या प्रकरणाची सुरुवातीपासून माहिती होती; पण तिने कधीच ह्या विषय रेमंडकडे काढला नाही.

लेबरपार्टी आता पुन्हा सत्तेवर आली. आता आपल्याला मंत्रिमंडळात स्थान मिळेल ह्याची रेमंडला खात्री होती. आता दोन दिवस टेन डाऊनिंग स्ट्रीटवरून फोन यायची वाट पहात बसायला हवे.

# मिनिस्टर्स ऑफ स्टेटस्

हीथच्या मंत्रिमंडळात मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर ट्रेड अँड इंडस्ट्री म्हणून चार्ल्सने फक्त चार महिने काम केले आणि २८ फेब्रुवारीला सार्वत्रिक निवडणुकीत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा पराभव झाला. आता विरोधी पक्षात बसावे लागत असल्याने चार्ल्सला फारसे काम उरले नव्हते. मागच्या वेळेसारखी आता व्हिपच्या ऑफिसची जबाबदारीही नव्हती. चार्ल्सने 'सेमूर बँकेत' परतायचे ठरविले. सेमूर बँकेतील संचालकाची नोकरी सोडल्याला आता जवळजवळ तीन वर्षे होत आली होती. त्याने बँकेच्या चेअरमन स्पेन्सरची अपॉइंटमेंट मागून घेतली.

चार्ल्सच्या अनुपस्थितीत सेमूर बँकेने चांगलीच प्रगती केली होती. स्पेन्सरने बँकेच्या संचालक मंडळावर पुरता ताबा मिळविला होता. चार्ल्सच्या जागी त्याने चार्ल्सचा जुळा भाऊ रूपर्ट ह्याची नॉन-एक्झेक्युटिव्ह डायरेक्टर म्हणून स्थापना केली होती. रूपर्टला बँकेच्या व्यवहारात काडीचाही इंटरेस्ट नव्हता हे स्पेन्सरच्या पथ्यावर पडले.

सुरुवातीला चार्ल्सला भेटायचीही स्पेन्सरने टाळाटाळ केली. नंतर जेव्हा त्यांची भेट झाली तेव्हा स्पेन्सरने चार्ल्सला स्पष्टपणे सांगितले की, चार्ल्सची पुन्हा बँकेच्या संचालक पदावर नेमणूक होणार नाही. चार्ल्सने स्पेन्सरला त्याच्या शब्दांची आठवण करून दिली. चार्ल्सने व्हिपच्या कार्यालयातली जबाबदारी स्वीकारली तेव्हा स्पेन्सरने त्याला कबूल केले होते की, निवडणुकीत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा पराभव झाला किंवा जय मिळूनही मंत्रिमंडळात चार्ल्सची वर्दी लागली नाही तर 'सेमूर बँकेतल्या' संचालकपदाच्या जागेवर त्याला परत घेतले जाईल.

स्पेन्सर आता त्याचा शब्द पाळायला तयार नव्हता. चार्ल्स शिवी-गाळ करायच्या बेतात आहे असे पाहिल्यावर स्पेन्सरने त्याला बाहेरचा रस्ता दाखविला. 'गेट आऊट ऑफ माय ऑफिस. ऑर आय विल् हॅव यू रिमूव्हड' स्पेन्सर म्हणाला. चार्ल्सचा यापूर्वी असा अपमान कुणी केला नव्हता. स्पेन्सरला धडा शिकवायचा या हेतूनेच तो बाहेर पडला.

चार्ल्स अवेळी घरी आलेला पाहून फिओनाला आश्चर्य वाटले. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून त्याचे काहीतरी बिनसले आहे हे तिच्या ध्यानात आले; पण स्वतःहून त्याला काही विचारायचा तिला धीर झाला नाही. चार्ल्सला आपले मन कुठेतरी मोकळे करावेसे वाटत होते. त्याने फिओनाला सुरुवातीपासून काय घडले ते सांगितले.

'असे असेल तर तू स्पेन्सरला धडा शिकवलाच पाहिजे.' फिओना म्हणाली.

'सो वॉट डू यू थिंक आय ऑट टू डू ओल्ड गर्ल?' चार्ल्सने विचारले.

इतक्या दिवसानंतर पहिल्यांदाच चार्ल्सने तिच्याशी पूर्वीसारखे बोलायला सुरुवात केली होती. चार्ल्सने आपल्याला विश्वासात घेतले याचा तिला आनंद झाला.

'स्पेन्सरबद्दल बऱ्याच गोष्टी मी ऐकून आहे. त्याची जुनी सेक्रेटरी मार्गारेट ट्रूबऑने मला त्या सांगितल्या. गेल्याच महिन्यात स्पेन्सरने तिला कामावरून काढून टाकले. इतके दिवस विषय निघाला नाही म्हणून मी तुला काही बोलले नाही. तू एकदा मार्गारेटला भेटून माहिती का काढत नाहीस?'

चार्ल्सने त्याच्या नेहमीच्या क्लबमध्ये मार्गारेटला जेवायला बोलावले. तिच्याशी बोलणे झाल्यावर दुसऱ्याच दिवशी चार्ल्सने स्पेन्सरची अपॉइंटमेंट घेतली. स्पेन्सरने इच्छा नसतानाही पाच मिनिटे चार्ल्सला द्यायचे कबूल केले.

स्पेन्सरच्या समोर चार्ल्स खुर्ची ओढून बसला. 'मला बँकेच्या शेअर होल्डर्सच्या वार्षिक सभेत काही प्रश्न विचारायचे आहेत; पण त्या आधी तुझ्याशी चर्चा करावी या हेतूने मी येथे आलो.' चार्ल्स म्हणाला.

चार्ल्सचा एकूण अविर्भाव पाहून त्याच्या मनात काय आहे याचा स्पेन्सरला थांगपत्ता लागेना.

'मिस जेनेट डेरॉ ह्या सेमूर बँकेत काम करणाऱ्या मुलीबद्दल मला चौकशी करायची आहे. गेली पाच वर्षे तिचे नाव पेरोलवर आहे आणि दरमहा ४०० पौंड तिच्या नावावर लॉइड बँकेत भरले जातात. म्हणजे आता पाच वर्षात तिच्या नावावर २५०० पौंड जमा झाले असतील.'

स्पेन्सरचा चेहरा पडला. त्याने कपाळावरचा घाम पुसला.

'मला वाटतं जेनेट डेरॉ अस्तित्वातच नाही. म्हणून पुढच्या महिन्यातल्या वार्षिक सभेत तिच्याबद्दल चौकशी करायचे मी ठरविले आहे.'

'यू आर अ बास्टर्ड, चार्ल्स' स्पेन्सर म्हणाला.

चार्ल्सला हसायला लागला.

'वॉट्स द डिल?' स्पेन्सरने विचारले.

'जास्त नाही. माझी संचालक मंडळावर नेमणूक व्हायला हवी. आणि ह्या महिन्यापासूनच जेनेट डेरॉच्या नावावर सेमूर बँकेचे पैसे

खाणे बंद करून टाक.' चार्ल्स म्हणाला.

एक महिन्याने चार्ल्स बँकेच्या संचालक मंडळाचा सभासद म्हणून शेअर होल्डर्सच्या वार्षिक सभेला हजर राहिला. स्पेन्सरने बँकेच्या वर्षभरातील कामाचा अहवाल सादर केला. बरेचसे प्रश्न विचारले गेले पण चार्ल्सने एकही प्रश्न विचारला नाही.

सभा संपल्यावर चार्ल्सने पुन्हा एकदा स्पेन्सरची अपॉइंटमेंट मागितली. चार्ल्ससमोर बसल्यावर स्पेन्सरने फक्त एकाच शब्दात चार्ल्सचे आभार मानले ' थँक्स् '

चार्ल्सने कोटाच्या खिशातून डायरी काढली आणि विचारले ' BX41207122 हा झुरिचमधल्या बँकेचा लॉकर कोणाच्या नावावर आहे याची तुला कल्पना आहे का ?'

' पण तू कबूल केले आहेस हा विषय तू पुन्हा कधी काढणार नाहीस. '

' ते जेनेट डेरॉबद्दल; पण स्विस बँकेतल्या अकाऊंटविषयी आपले काहीच बोलणं झाले नाही. '

' तुला काहीच सिद्ध करता येणार नाही. '

' तुला काय वाटतं मी फुकट नऊ वर्षे राजकारणात काढली. '

' तू जर ही माहिती जाहीर केलीस तर बँकेचे नाव खराब होईल.'

' कबूल. पण डायरेक्टर ऑफ पब्लिक प्रॉसेक्यूशनच्या हातात हा पुरावा पडला तर तुला कमीतकमी दहा वर्षं तरी तुरुंगात काढावी लागतील. '

' मग आता तुला काय हवंय ?'


' युवर जॉब '

प्रथम स्पेन्सरचा चार्ल्सवर विश्वासच बसेना. चार्ल्सने त्याला विचार करायला २४ तासांचा अवधी दिला स्पेन्सरने राजिनामा द्यायचे मान्य केले; पण त्याला नुकसानभरपाई म्हणून दोन वर्षांचा पगार हवा होता. चार्ल्स फक्त एकच वर्षाचा पगार द्यायला कबूल झाला.

एका आठवड्यात चार्ल्स वर्षाला ४०,००० पौंड पगारावर सेमूर बँकेचा चेअरमन झाला. नेमणूक झाल्याच्या दुसऱ्या दिवशी मार्गारेट ट्रूब्रशॉला नोकरीवर परत घेण्यात आले. चार्ल्सने तिचे कॉंट्रॅक्ट आणखी पाच वर्षांनी वाढविले पण तिला आपली सेक्रेटरी म्हणून काही नेमले नाही.

सायमन कस्लेकचे नशीब जोरावर होते. त्याला फार काळ काही मतदारसंघाची वाट पहात थांबावे लागले नाही. ' पकल्ब्रिज ' मतदारसंघातून कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या तिकीटावर निवडून आलेले सर मायकेल बेकर ह्यांना पुढे निवडणूक लढविण्याची इच्छा नव्हती. वयाची सत्तरी गाठल्याने आता त्यांना राजकारणातून निवृत्त व्हायचे होते. ' पकलब्रिजचा ' मतदारसंघ चार्ल्सच्या ससेक्स डाउन मतदारसंघाच्या दक्षिणेला होता. ह्या मतदारसंघात कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या निवडसमितीचा अध्यक्ष मिलबर्न म्हणून एक कारखानदार होते. सायमनने पुन्हा चार्ल्सला फोन करून मिलबर्नकडे शब्द टाकायची विनंती केली. चार्ल्स नुकताच ' सेमूर बँकेचा ' चेअरमन झाला होता. मिलबर्नंनी त्याच्या शब्दाला नक्कीच मान दिला असता.

चार्ल्सने ताबडतोब सायमनला मदत करायचे मान्य केले. सायमनची पत्नी एलिझाबेथला चार्ल्स कधीच आवडला नव्हता. तिने ह्या



तू आता येथून निघून जातोस की...

¤

वेळीही सायमनला सांगितले की, त्याने चार्ल्सवर विश्वास ठेवू नये. पण सायमन म्हणाला की तिला रॉनी नेदरकोटबद्दल सुद्धा असेच वाटत होते; पण उलट रॉनीनेच त्याला त्याच्या कंपनीचे एक्झेक्युटिव्ह डायरेक्टर म्हणून बोलावले होते.

पकल्ब्रिज मतदारसंघात मुलाखतीसाठी तयार केलेल्या शॉर्टलिस्ट मध्ये सायमनचे नाव होते. एलिझाबेथला बरोबर घेऊन सायमन मुलाखतीसाठी ' पकल्ब्रिजच्या ' कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या कार्यालयात गेला. एकूण बारा जणांची निवडसमिती होती. आठ पुरुष आणि चार स्त्री सदस्य.

सायमनची मुलाखत चांगली झाली. फक्त समितीचा अध्यक्ष मिलबर्नने सायमनला दोन-तीन वेळा चार्ल्सबद्दल प्रश्न विचारले. ' पकल्ब्रिजच्या ' सीटसाठी एकूण चार उमेदवार शॉर्टलिस्टवर होते. संध्याकाळपर्यंत मुलाखती संपल्यानंतर मतदान घेण्यात आले. सर्व सदस्यांनी एकमताने सायमनला पुढच्या निवडणुकीत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे तिकीट द्यावे असा निर्णय घेतला. निवड झाल्यावर सभासदांनी सायमनला भाषण करण्याचा आग्रह केला. सायमनच्या हाऊस ऑफ कॉमन्समधल्या वक्तृत्वाबद्दल ते बरेच काही ऐकून होते.

सायमन फक्त एकच वाक्य बोलला ' तुम्ही माझी निवड केल्याचा मला इतका आनंद झाला आहे की आता निवडणुकीसाठी आणखी चार वर्षे थांबायला माझी तयारी नाही ' सगळे सभासद हसायला लागले.

' पकल्ब्रिज 'हून निघाल्यावर सायमनला आणि इलिझाबेथला गाडीत बसवून देताना निवडसमितीचा अध्यक्ष मिलबर्न सायमनला म्हणाले ' चार्ल्स सेमूरने मला फोन करून सांगितले की कोणत्याही परिस्थितीत सायमन कस्लेकला पक्षाचे तिकिट मिळता कामा नये तेव्हाच मी तुमची निवड करायचे निश्चित केले. चार्ल्स सेमूर हा

माणूस मला कधीच आवडला नाही.'

सायमनने इलिझाबेथकडे पाहिले 'माझी माणसांची पारख कधी चुकीची नसते' ती म्हणाली.

रेमंडची अपेक्षा होती त्याप्रमाणे दोन दिवसात टेन डाउनिंग स्ट्रीट वरून रेमंडला फोन आला नाही. याचा अर्थ आपल्या इच्छेविरुद्ध रेमंडने मंत्रिमंडळातून राजिनामा दिला ह्याचा अजून हॅरॉल्ड विल्सनला विसर पडला नव्हता. हॅरॉल्ड विल्सनने रेमंडला मंत्रिमंडळात घेतले नाही ह्याचा टाइम्स आणि गार्डियनमध्येही उल्लेख झाला. रेमंडसारख्या उत्तम प्रशासकाला मंत्रिमंडळातून वगळण्यात हॅरॉल्ड विल्सनने चूक केली असाच सर्वसाधारण सूर होता. रेमंडने 'लिकन्स् इन' फर्ममधली आपली प्रॅक्टीस पुढे चालू ठेवण्याचे ठरविले.

अँड्रयू फ्रासरला मात्र हॅरॉल्ड विल्सनने मंत्रिमंडळात घेतले. आधीच्या मंत्रिमंडळात अँड्रयूने अंडर सेक्रेटरी फॉर स्कॉटलंड म्हणून काम केले होते. आता हॅरॉल्ड विल्सनने त्याला मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर होम म्हणून होम डिपार्टमेंटमध्ये नियुक्त केले. हीथच्या कॉन्झर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळात सायमन कस्लेककडे हे खाते होते.

अॅन्ड्रयूचा मुलगा रॉबर्ट आता चार वर्षांचा झाला होता. रात्री उशिरापर्यंत अँड्रयू घरी फायली उरकत बसायचा आणि रॉबर्ट त्याच्या खोलीत आरडा ओरडा करीत बसून रहायचा. होम डिपार्टमेंटकडून घरी पाठविलेली फायलींची लाल खोकी रॉबर्टला खेळायला पाहिजे असायची. लुईसची नजर चुकवून तो खोक्यातल्या फायली फेकून रिकामी खोकी खेळायला घ्यायचा. 'होम डिपार्टमेंटच्या' फायलींचा रॉबर्टने ज्या प्रकारे विध्वंस करायला लावला होता ते पाहून लुईस त्याला 'रशियन स्पाय' म्हणत असे. अँड्रयूने रॉबर्टला आता पासूनच फुटबॉलचे धडे द्यायला सुरुवात केली.

'एडिंबरो कार्लटनमधून गेल्या निवडणुकीत अँड्रयूच्या विरुद्ध उभा राहिलेला स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीचा (एस.एन.पी) उमेदवार ज्यो मॅकपर्सन अॅन्ड्रयूला त्याच्या घरी भेटायला आला. निवडणुकीत मॅकपर्सनचा अँड्रयूने पराभव केला तरी हाऊस ऑफ कॉमन्स मध्ये स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीचे सात उमेदवार निवडून आले होते.

ज्योने अॅन्ड्रयूला सांगितले की पुढची निवडणुक जर तो लेबर-पार्टीऐवजी एस. एन. पी. च्या तिकिटावर लढायला तयार झाला तर त्याला एस. एन. पी. चे अध्यक्ष करण्यात येईल. अॅन्ड्रयूच्या हाऊस ऑफ कॉमन्स मधल्या कामामुळे स्कॉटलंडमध्ये त्याचा चांगलाच प्रभाव होता. तो जर एस. एन. पी. अध्यक्ष झाला तर पुढच्या निवडणुकीत एस. एन. पी. ला स्कॉटलंडच्या सत्तर पैकी चाळीस पन्नास तरी जागा सहज काबीज करता येतील असे मॅकपर्सनचे म्हणणे पडले.

अॅन्ड्रयूला गंमत वाटली. ह्याच ज्यो मॅकपर्सनने मागच्या निवडणुकीत आपल्या विरुद्ध वाट्टेल ती पत्रके काढली होती.

ज्यो पुढे म्हणाला की लेबर पार्टी दिवसेन् दिवस अधिक डावीकडे झुकत होती त्यामुळे अॅन्ड्रयू सारख्या मवाळ (मॉडरेट) नेत्यांचे पक्षातले महत्त्व कमी होत चालले होते. ज्योचे म्हणणे खरे होते; पण अॅन्ड्रयूची पक्ष सोडण्याची इच्छा नव्हती. ज्योने अध्यक्षपदाचे आमिष दाखविले म्हणून त्याच्या निर्णयात काही फरक पडणार नव्हता. त्याने ज्योचे भेटीबद्दल आभार मानले पण आपल्याला लेबर पार्टी सोडण्याची बिलकूल इच्छा नसल्याचे सांगितले. मात्र ह्या बोलण्याबद्दल दोघांनीही गुप्तता बाळगायचे ठवले. ज्यो बरोबरचे संभाषण अॅन्ड्रयूने जेव्हा लुईसला सांगितले तेव्हा ती म्हणाली 'तू त्यांचो ऑफर धुडकावून दिलीस पण ही माणसे सूड उगवल्या खेरीज रहायची नाहीत.'

रेमंडची केट गर्यवेट ह्या अमेरिकन स्त्रीशी पहिल्यांदा ओळख बँकर्स असोसिएशनच्या वार्षिक समारंभात झाली. प्रमुख पाहुणे म्हणून पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सनला बोलावणे होते. एम्प्लॉयमेंट डिपार्टमेंटचा रेमंड माजी अंडर सेक्रेटरी होता त्यामुळे इतर मंत्र्यांबरोबर त्यालाही बोलावणे होते. जेवताना केट रेमंडच्या शेजारच्या खुर्चीवर बसली होती. केट नुकतीच न्युयॉर्कहून अमेरिकन बँकेची युरो बॉंड मॅनेजर म्हणून लंडनला आलेली होती. टेबलवर रेमंडच्या नावापुढे एम. पी. लिहिलेले पाहून तिने रेमंडला तो कोणत्या पक्षाचा एम पी आहे असे विचारले. रेमंडला हसू आले. इंग्लंडमध्ये असा प्रश्न त्याला विचारायची कुणाला गरज भासली नसती.

'लेबर' रेमंड म्हणाला, 'तुम्ही कोणत्या पक्षाच्या बाजूच्या आहात?'

'माझा आधीचा नवरा रिपब्लिकन पार्टीचा सेनेटर आहे त्यामुळे माझी सहानुभूती नेहमीच लेबर पार्टीकडे असते' केट म्हणाली. केट नुकतीच लडनला आल्याने तिच्या फारशा ओळखी नव्हत्या. रेमंडची कुशाग्र बुद्धी तिच्या अमेरिकन नजरेला ओळखू लागली. रेमंड सहसा समारंभांना जात नसे पण बँकर्स असोसिएशनच्या पार्टीला गेल्याचा त्याला फायदा झाला. थोड्याच दिवसात केटची आणि त्याची दाट मैत्री जमली. आतापर्यंत रेमंडच्या आयुष्यात आलेल्या सर्व स्त्रियांपेक्षा केट उजवी होती. स्वतंत्र वृत्तीची होती. त्याच्या इतकीच बुद्धीमान होती. तिचा जीवनाबद्दलचा दृष्टिकोन निकोप होता. जॉईसपेक्षा केट नुसती सुंदरच होती एवढे नव्हे तर तिला जॉईस पेक्षा किती तरी पटीने उत्तम विनोदबुद्धी होती.

थोड्याच आठवड्यात केट रेमंडबरोबर ब्रिटिश राजकारणावर चर्चा करून त्याला त्याच्या पक्षातल्या राजकारणाविषयी अचूक सल्ला देऊ लागली. आयुष्यात पहिल्यांदाच रेमंडला खऱ्या अर्थाने जोडीदाराचे आकर्षण वाटू लागले होते. केटने थोडा जरी कल दाखविला असता तर जॉईसला घटस्फोट देऊन रेमंड केटशी लग्न करायला तयार झाला असता. पण ब्रिटिश एम्पीशी लग्न करायची केटची इच्छा नव्हती. रेमंडची मैत्री तिला आवडत होती पण स्वतःचे स्वातंत्र्य तिला तितकेच प्रिय होते.

रेमंडला वाटले तितकेही महिने हॅरॉल्ड विल्सनचे सरकार टिकले नाही. लिबरल पार्टीशी लेबर पार्टीचे जमू शकले नाही. सत्तेवर आल्यावर आठच महिन्यात हॅरॉल्ड विल्सनने पुन्हा जनमताचा कौल घेण्याचे ठरविले. सार्वत्रिक निवडणुकांची तारीख १० ऑक्टोबर १९७४ ठरली.

निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यावर रेमंड ताबडतोब लीडस्ला आला. रेमंडचीही पाचवी निवडणुक. जवळजवळ चार ते पाच महिन्यांनी जॉईसची आणि त्याची पहिल्यांदा भेट झाली. जॉईस लीडस् मधल्या त्यांच्या घरात एकटीच रहात असे. रेमंडची मतदार संघा-

तील सगळी कामे ती एकटी पहात असल्याने दिवसभर ती कामात गुंतलेली असे. रेमंडचे तिच्याशी फोनवरच बोलणे होत असे.

रेमंडने जॉईसकडे पाहिले, केटपेक्षा ती चार वर्षांनी मोठी होती; पण दोघींमध्ये केवढा फरक ! घरी जाताना वाटेत जॉईसने रेमंडला प्रचाराचा सगळा प्लॅन सांगितला. मतदार संघातल्या आपल्या यशात जॉईसचा मोठा वाटा आहे हे उघड स्विकारणे रेमंडला जड वाटत असते तरी मनातून त्याला त्याची जाणीव व्हायला लागली होती.

निवडणुकीत लेबर पार्टीला २/३ बहुमत मिळाले नाही तरी वर्किंग मेजॉरिटी मिळाली. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीपेक्षा लेबर पार्टीचे एकूण ४३ उमेदवार अधिक निवडून आले. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी सहीत इतर सर्व विरोधी पक्षांपेक्षा मात्र एकूण तीनच सदस्यांचे बहुमत लेबर पार्टीला होते; पण पूर्वीपेक्षा परिस्थिती सुधारली होती. लिबरल पार्टीच्या मदतीशिवाय लेबर पार्टी आता सरकार स्थापन करू शकत होती हॅरॉल्ड विल्सनना आता अजून पाच वर्षे तरी चिंता करायची आवश्यकता नव्हती.


स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीने अँड्रूच्या विरूद्ध ज्यो मॅकपर्सनला उभे केले होते. मॅकपर्सनने पुन्हा अँड्रूवर टीकेची झोड उठवली. अँड्रूबद्दल एस् एन् पीने शिवराळ पत्रके काढली. लुईसला तर ह्या सगळ्याची इतकी चीड आली की तिने अँड्रूला एस्एन्पीने केलेल्या ऑफरबद्दल वृत्तपत्रांकडे बातमी द्यायला सांगितले. अँड्रू म्हणाला की त्याने ज्यो मॅकपर्सनला आपण त्या ऑफरबद्दल गुप्तता पाळू असा शब्द दिला होता. केवळ ज्योच्या वागण्यामुळे शब्द मोडायची त्याला गरज वाटत नव्हती. अँड्रूने त्याच्या एडिंबरो कार्लटन मतदार संघातून १,६५६ मतांनी लेबर पार्टीच्या तिकिटावर निवडणूक जिंकली. ज्यो मॅकपर्सन दुसऱ्या क्रमांकावर होता आणि सर्वात कमी मते कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या उमेदवाराला मिळाली. हॅरॉल्ड विल्सनने पुन्हा अँड्रूला होम डिपार्टमेंट मध्ये मिनिस्टर ऑफ स्टेट म्हणून रुजू व्हायला सांगितले.

'ससेक्स डाऊन' मतदार संघातून चार्ल्स २२००० मतांनी निवडून आला. 'पक्लब्रिज' मतदार संघातून लढवलेली सायमनची ही पहिली निवडणूक. त्याने आणि इलिझाबेथने मतदार संघातल्या निम्म्याहून अधिक लोकांची प्रत्यक्ष भेट घेतली होती. कोव्हेंट्री सेंट्रल मतदार संघातून सायमनला दोन हजारावर कधी बहुमत मिळाले नव्हते. ह्यावेळी पकलब्रिजमधून सायमन १८,४१९ मतांनी निवडून आला.

लीडस् मतदार संघातून रेमंड १२,२०७ मतांनी निवडून आला. शुक्रवार आणि शनिवार त्याने मतदारसंघातच काढले आणि सत्कार, आभार प्रदर्शनाचे कार्यक्रम उरकले. रविवारी तो लंडनला निघाला तेव्हा स्टेशनवर त्याला सोडताना जॉईस म्हणाली, 'आता यावेळी तरी विल्सन तुला मंत्रिमंडळात घेतीलच.' पण पंतप्रधानांनी याही खेपेला रेमंडला सत्तेपासून दूर ठेवले.

रेमंडची निराशा केटला जाणवली होती रविवारी रात्री त्याला जेवायला ती बाहेर घेऊन गेली.

ब्लॅकपूल येथे लेबर पार्टीची वार्षिक कॉन्फरन्स होती. रेमंड गेली तीन–चार वर्षे अशा परिषदांना जात नव्हता. संसदेबाहेरील कामगार नेतृत्वाचा संसदीय लेबर पार्टीच्या नेतृत्वावर काही एक परिणाम होत



रेमंड – लेबर पार्टीच्या परिषदेत अनपेक्षित यश

¤

नाही ह्याची त्याला कल्पना होती. केटने पाठीशी लागून त्याला परिषदेला जायला लावले.

आपण जर मंत्री नसलो, कामगार पुढारी नसलो तर अशा परिषदांत काहीही महत्त्व मिळत नाही. चार दिवस फक्त दोन वेळची आळणी जेवणं आणि कंटाळवाणी भाषणे ह्यांना तोंड द्यावं लागतं असे रेमंडचे स्पष्ट मत होते.

केटचे म्हणणे पडले की, ह्या परिषदांचा तात्कालिक फायदा मिळणार नसला तरी कामगार चळवळीशी संबंध ठेवल्याचा त्याला पुढे फायदा मिळेल.

'तुझे खरे सामर्थ्य कामगारांमध्ये आहे. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये नाही. तू परिषदेपुढे आलेले ठराव पाहिलेस का? अँथनी वेजवुडने ह्यापुढे पक्षाचा हाऊस ऑफ कॉमन्समधील नेता हा निवडून आलेल्या सदस्यांऐवजी कामगार नेत्यांकडून निवडला जावा अशी मागणी केली आहे.' केट म्हणाली.

'वेजवुड मूर्ख आहे. त्याने अमेरिकन बाईशी लग्न केलंय म्हणून त्याला ठराव सुचतात. इथल्या लेबर पार्टीत असले काही व्हायचे नाही.'

आणि तरीही केटच्या आग्रहामुळे रेमंड परिषदेला हजर राहिला. जवळ जवळ ४,००० कार्यकर्ते परिषदेला आले होते. 'फुल एम्प्लॉयमेंट अॅट एनी कॉस्ट' आणि 'रिफ्लेक्शन्स् ऑफ अ वर्कर एज्युकेटेड आफ्टर द थर्टीज' ही रेमंडची दोन्ही पुस्तके त्यातल्या बऱ्याचजणांनी वाचलेली होती. त्यामुळे रेमंडचे परिषदेत स्वागत चांगले झाले.

अँड्र्यू फ्रासर दरवर्षी नेमाने पार्टी कॉन्फरन्सला हजर राहायचा. वेजवूडचा ठराव त्याने पाहिला होता; पण पक्षाचे हाऊस ऑफ कॉमन्समधील राजकारण आणि कामगार चळवळीचे स्वरूप ह्यामध्ये फरक असल्याने बाहेरून जर सभागृहातील नेतृत्वाची निवड झाली तर अशा नेत्याचे कॉमन्समधील सभासदांबरोबर जुळायचे नाही असे त्याला वाटत होते. वेजवुडच्या ठरावाचा थोड्याच मतांनी का होईना पराभव झाला तेव्हा अँड्र्यूला हायसे वाटले.

अँड्र्यू मंत्री असला तरी त्याच्या वाटेला ब्लॅकपूलच्या हॉटेल-मधली छोटीशी खोली आली होती. लेबर पार्टीच्या अशा परिषदांना मोठमोठ्या कामगार पुढाऱ्यांना जेवढे महत्त्व मिळते तेवढे संसदीय विंगच्या सभासदांना मिळत नाही. परिषदेच्या वेळेतही मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर होम म्हणून डिपार्टमेंटच्या फायली उरकण्याचे काम अँड्र्यूला पार पाडावे लागत होते.

सकाळचे अधिवेशन आटोपून अँड्र्यू जेव्हा हॉटेलवर परत जायला निघाला तेव्हा वाटेत रेमंडला पाहून त्याला आश्चर्य वाटले. गेली दहा वर्षे हाऊस ऑफ कॉमन्समध्ये एकत्र काढूनही रेमंडशी त्याचा जवळून परिचय झालेला नव्हता; पण रेमंडने अवमूल्यनाच्या प्रश्ना-वरून दिलेल्या राजिनाम्यामुळे त्याला नेहमीच रेमंडविषयी कौतुक-मिश्रीत आदर वाटत आला होता. परिषदेमधल्या भाषणांचा अँड्र्यू इतकाच रेमंडलाही कंटाळा आला होता. दोघांनीही दुपारी एकत्र जेवायला जायचे ठरविले.

'विल्सननी तुला मंत्रिमंडळात घेतले नाही हे तुला चांगलेच लाग-लेले दिसतेय.' जेवताना अँड्र्यूने विचारले.

'फारच.'

'पण तरीही तू पक्षाच्या परिषदेला आलास हे चांगले केलेस. तुझे खरे सामर्थ्य कामगार चळवळीतच आहे.' अँड्र्यू म्हणाला.

रेमंडला आश्चर्य वाटले. केटने त्याला नेमके हेच सांगितले होते.

अँड्र्यू रेमंडला म्हणाला की, वेळात वेळ काढून तो परिषदेला आला कारण ह्याच एका प्रसंगी पक्षाच्या तळागाळाच्या कार्यकर्त्यांना भेटण्याची संधी मिळते. पक्षात 'अति डाव्या विचारसरणीचा' (extreme left) जोर धरत होता त्याबद्दल त्याला चिंता वाटत होती. ह्या लोकांमुळे पक्षाचे मवाळ संसदीय नेतृत्व दुबळे होईल असे त्याला वाटत होते. अँड्र्यूला ही सगळी माणसे हट्टी मुलांसारखी अपरिक्व वाटत होती. रेमंड त्याच्या निरीक्षणाशी सहमत होता.

'तुझ्या मंत्रिपदाचा मला हेवा वाटतो. बॅक बेंचर म्हणून बसा-यला मी राजकारणात आलो नाही.' निघताना हसत रेमंड अँड्र्यूला म्हणाला.

'राजकारणात केव्हा काय घडेल याचा नेम नाही. एक दिवस तू मंत्रिमंडळात बसलेला असशील आणि बॅक बेंचर म्हणून मला तुझा हेवा वाटेल.' अँड्र्यू म्हणाला.

'विल्सन असेपर्यंत नाही.' रेमंड म्हणाला.

'कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीत आता परत पक्षाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक घेतली जाईल. हीथविरुद्ध कोण निवडून येईल तुला वाटतं?' अँड्र्यूने विचारले.

'मार्गारेट थॅचर. सायमन कसूलेक तिच्यासाठी पाठिंबा मिळव-तोय. मागच्या वेळेस त्याने माऊडलिंगसाठी प्रचार केला होता.' रेमंड म्हणाला.

थॅचर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीची नेता म्हणून निवडून येईल असे केटनेच रेमंडला सांगितले होते. यासाठी वाट्टेल तेवढ्याची पैज लावा-यची तिची तयारी होती. केटचा अंदाज एरवीही इतका अचूक ठरा-यचा की, ह्यावेळीही तिचे म्हणणे खरे ठरेल असे रेमंडला वाटत होते.

चार्ल्स सेमूरला मात्र तसे वाटत नव्हते. बाईने आपल्या पक्षाचा नेता व्हावे ही कल्पनाच त्याला सहन होत नव्हती. हीथच्या नेतृत्वा-खाली पक्षाचा गेल्या दोन निवडणुकांत पराभव झाला त्यामुळे आता त्याला पुन्हा नेतेपदासाठी पक्षाचा कौल घ्यावा लागेल ह्याची चार्ल्सला कल्पना होती. एवढ्यासाठीच हीथने चार्ल्सला शॅडो कॅबिनेटमध्ये शॅडो मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर ट्रेड अँन्ड इंडस्ट्री हे पद देऊ केले तरी चार्ल्सने ते नाकारले. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा नवा नेता निवडून येई-पर्यंत आपण शॅडो कॅबिनेटमध्ये जाऊ नये असा त्याचा विचार होता. जोपर्यंत हीथविरुद्ध कुणी वजनदार उमेदवार उभा राहात नाही तोवर आपण हीथला पाठिंबा द्यावा असे त्याने ठरविले. आपण सेमूर बँकेचे चेअरमन असल्याने शॅडो कॅबिनेटमध्ये गेलो नाही हे त्याने इतरांना सांगण्यासाठी कारण पुढे केले होते.

स्वत: एडवर्ड हीथना मात्र आपल्या कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीतील नेतृ-त्वाला कुणी आव्हान देईल असे वाटत नव्हते. मार्गारेट थॅचरबद्दलचे सायमनचे प्रेम हीथना ठाऊक होते. त्यांनी सायमनला शॅडो कॅबिनेट-मध्ये जागा दिली नाही.

निवडून आल्यानंतर एक-दोन महिन्यातच सायमनने मार्गारेट थॅचरसाठी पक्षाच्या सभासदांना भेटायला सुरुवात केली होती. जाने-वारीच्या पहिल्या आठवड्यात पत्रकार परिषद घेऊन मार्गारेट थॅचरने आपण पक्षाच्या नेतेपदाची निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. सायमन ह्या परिषदेला हजर राहिला होता. थॅचरप्रमा-णेच ह्युग फ्रासर नावाच्या एका कॉन्झर्व्हेटिव्ह नेत्यानेही निवडणुकी-साठी आपली उमेदवारी जाहीर केली होती.

निवडणुकीची तारीख ठरली–४ फेब्रुवारी १९७५. ह्या खेपेस जो कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा नेता होईल तोच पुढच्या निवडणुकीत पक्षाचा विजय झाला तर पंतप्रधान बनेल हे उघड होते; पण त्याचबरोबर नेतेपदाच्या निवडणुकीत पराभव झाला तर पराभूत उमेदवाराला आणि त्याच्या सर्वच पाठीराख्यांना चार ते पाच वर्षे तरी कोणतेच महत्त्वाचे पद मिळणार नव्हते.

चार फेब्रुवारीला दुपारी निकाल जाहीर झाला.

| | |
|---|---|
| मार्गारेट थॅचर | १३० |
| एडवर्ड हीथ | ११९ |
| ह्युग फ्रासर | १६ |

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या घटनेनुसार निवडून येणाऱ्या नेत्याला १५ हून जास्त बहुमत लागते. त्यामुळे पुन्हा मतदान घेण्याचे ठरले. पक्षाच्या व्हिपने निवडणुकीसाठी सात दिवसांची मुदत दिली. फेर निवडणुकीत आपण निवडून येण्याची शक्यता नाही हे पाहिल्यावर एडवर्ड हीथने आपले नाव मागे घेतले आणि हीथच्या शॅडो कॅबिनेट मधल्या तीन मंत्र्यांनी आपली उमेदवारी जाहीर केली.

थॅचरच्या पाठीराख्यांना एकत्र ठेवण्यासाठी सायमनने सात दिवस

अहोरात्र परिश्रम केले.

निवडणुकीच्या दिवशी चार्ल्सने शॅडो सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर ट्रेड अँड इंडस्ट्री यांना मत दिले. तासाभरात निकाल जाहीर झाला. एकूण पाच उमेदवार उभे होते. मार्गारेट थॅचरला १४६ मते पडली. दुसऱ्या क्रमांकाच्या उमेदवाराला ७९ मते होती.

सायमनने त्याच दिवशी थॅचरला पत्र लिहिले.

११ फेब्रुवारी १९७५

डिअर मार्गारेट,

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या इतिहासात पहिल्यांदाच स्त्रीची नेतेपदासाठी निवड झाली. ह्या तुमच्या विजयात माझाही थोडा फार हातभार लागला याचा मला अभिमान वाटतो. विजयाबद्दल अभिनंदन !

—सायमन

चार्ल्सनेसुद्धा त्याच दिवशी थॅचरला पत्र लिहिले.

११ फेब्रुवारी १९७५

डिअर मार्गारेट,

पहिल्या राऊंडमध्ये मी एडवर्ड हीथना पाठिंबा दिला हे तुमच्यापासून लपवून ठेवण्याची माझी इच्छा नाही. हीथच्या मंत्रिमंडळात मी शॅडो मिनिस्टर म्हणून काम केले असल्याने त्यांना पाठिंबा देणे मला योग्य वाटले. दुसऱ्या राऊंडमध्ये मात्र मी तुम्हाला मत दिले. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या इतिहासात प्रथमच स्त्री म्हणून तुमची नेतेपदासाठी निवड झाली याचा मला अभिमान वाटतो.

चार्ल्स

मार्गारेट थॅचरनी सगळ्या सभासदांना आभाराची पत्रे पाठवली. सायमनला त्याच्या हस्ताक्षरातले पत्र मिळाले. थॅचरनी त्याला शिक्षणमंत्री म्हणून शॅडो कॅबिनेटमध्ये यायची विनंती केली होती.

थॅचरच्या सेक्रेटरीने टाईप केलेले आभारचे पत्र चार्ल्सला त्याच दिवशी मिळाले.

पक्षाच्या नेतेपदाच्या निवडणुकीत आपला अंदाज चुकला याची फळे आपल्याला भोगायला लागतील याची कल्पना चार्ल्सला होती; पण सायमनला इतक्या सहजासहजी त्याने पुढे जाऊ दिले नसते. चार्ल्सने अडथळा आणूनही सायमनने पकलब्रिजचा मतदारसंघ मिळवला होता आणि आता तर तो निवडून येऊन शॅडो मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर एज्युकेशन बनला होता. सायमनला संकटात टाकण्याची चार्ल्सला पुन्हा एकदा संधी चालून आली.

सेमूर बँकेच्या चेअरमनचे पद चार्ल्सला वाटले तितके सोपे नव्हते. हाउस ऑफ कॉमन्समधील राजकारण आणि बँकेचे काम ह्यांचा मेळ घालताना त्याची फार ओढाताण होऊ लागली. चार्ल्सने बँकेच्या संचालक मंडळाच्या परवानगीने बँकेसाठी चीफ एक्झेक्युटिव्ह नेमायचे ठरविले.

बऱ्याच उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर चार्ल्सला बँक ऑफ अमेरिकेचा चीफ एक्झेक्युटिव्ह क्लाईव्ह रेनॉल्ड पसंत पडला. क्लाईव्हने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि हॉवर्ड बिझनेस स्कूलमध्ये शिक्षण घेतले होते. बारीकसारीक बाबींमध्ये शिकागोमधल्या बँक ऑफ अमेरिकेच्या मेन ऑफिसची परवानगी घ्यावी लागत असल्याने क्लाईव्ह बँक ऑफ अमेरिकेच्या नोकरीला कंटाळला होता. बँकेच्या व्यवहाराबाबत क्लाईव्हचे विचार चार्ल्सच्या विचारांशी मिळते-जुळते होते. त्यामुळे त्याची चीफ एक्झेक्युटिव्ह म्हणून नेमणूक केल्यावर आपल्याला चेअरमन म्हणून बँकेच्या कामकाजात फारसे लक्ष घालायची गरज भासायची नाही असा चार्ल्सने विचार केला. क्लाईव्हची त्याने वार्षिक ५०,००० पौंडावर नेमणूक केली.

क्लाईव्हला खाजगी असे काही आयुष्य नव्हते. तो ४१ वर्षांचा होता पण अजूनही अविवाहित होता. चार्ल्सची आणि त्याची मैत्री काही जमली नाही; पण क्लाईव्हच्या कामावर चार्ल्स खूष होता. क्लाईव्ह तासभर आधीच ऑफिसमध्ये यायचा आणि संध्याकाळी सात-साडेसातपर्यंत त्याचे काम चालायचे. चार्ल्सला चेअरमन ह्या नात्याने आवश्यक तेवढा मान तो देत असे. रोज सकाळी दहा वाजता दोघांची तासभर भेट होत असे. ह्यावेळी ते बँकेच्या विविध कामांबद्दल निर्णय घेत असत.

ज्या कंपन्यांचा सेमूर बँकेत तीन लाख पौंडापेक्षा अधिक अकाऊंट होता अशा कंपन्यांची एक वेगळी फाईल क्लाईव्हने तयार केली होती. ह्या कंपन्यांचे आर्थिक व्यवहार तो नेहमी चार्ल्सला तपासणीसाठी देत असे. अशा तीन-चार फाईल्स चाळत असताना चार्ल्सच्या हातात नेदरकोट अँण्ड कंपनीची फाईल आली. नेहमीच्या सवयीने चार्ल्सने कंपनीच्या संचालकांची नावे पाहिली. त्याला सायमन कसलेकृचे नाव दिसले. चार्ल्सच्या डोक्यात कल्पना आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी क्लाईव्ह जेव्हा त्याच्या केबिनमध्ये चर्चेला आला तेव्हा चार्ल्सने त्याला नेदरकोट अँण्ड कंपनीविषयी माहिती विचारली. क्लाईव्ह म्हणाला की कंपनीचे एकूण अॅसेटस् एक कोटी पौंडापर्यंत आहेत आणि सध्याचा ओव्हर ड्राफ्ट सत्तर हजार पौंडाचा आहे.

क्लाईव्हच्या मते कंपनीचे संचालकमंडळ आणि मॅनेजमेंट उत्तम होती. त्यामुळे कंपनी जेव्हा पब्लिक लिमिटेड होईल तेव्हा कंपनीच्या शेअर्सना चांगला भाव आला असता. तो म्हणाला की, नेदरकोट अँण्ड कंपनीचा अर्धा अकाऊंट सेमूर बॅन्केत होता आणि अर्धा मिडलॅण्ड बॅन्केत. सेमूर बॅन्केकडे कंपनीचे साडे-सात टक्के शेअर्स होते.

चार्ल्सने कंपनीचा अकाऊंट बंद करून बॅन्केच्या ताब्यातले साडेसात टक्के शेअर्स विक्रीला काढायला सांगितले.

क्लाईव्हला धक्काच बसला.

'पण त्यामुळे कंपनीचे दिवाळे निघेल.'

'मला ठाऊक आहे; पण माझ्या निर्णयापाठची कारणे स्पष्ट करण्याची माझी इच्छा नाही.'

आपला चेअरमन इतके विचित्र वागू शकेल ह्याची क्लाईव्हला कल्पनाच नव्हती. चार्ल्सच्या निर्णयाचा त्याला अर्थच लागेना. प्रॉपर्टी कंपन्यांना सध्या चांगले दिवस नसले तरी नेदरकोट अँड कंपनी उत्तम प्रकारे चालवली जात होती. सेमूर बँकेने जर कंपनीचा अकाऊंट अचानक बंद केला तर मिडलॅंड बँकेने कंपनीच्या सर्व अकाऊंटची जबाबदारी उचलली नसती. याचा अर्थ महिनाभरात जर कंपनीने नवीन बँक गाठली नाही तर मॅनेजमेंटला दिवाळे काढण्याखेरीज गत्यंतर उरले नसते.

क्लाईव्ह पुढे काही विचारायच्या आतच चार्ल्सने मिटिंग संपल्याचे



**सायमन – राजिनामा देण्यावाचून पर्यायच नव्हता**

सांगितले आणि तो हाऊस ऑफ कॉमन्समध्ये जायला निघाला. क्लाईव्हशी बोलणे करण्यापूर्वी चार्ल्सने सायमनचा ओव्हर ड्राफ्ट एक लाख आठ हजार पौंडांपर्यंत जाऊन पोहोचला असल्याची माहिती मिळवली होती. आता जर नेदरकोट कंपनीचे दिवाळे निघाले तर कंपनीच्या शेअर्सना ही किंमत रहाणार नाही. म्हणजे कंपनीबरोबर सायमनचेही दिवाळे निघेल.

हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमाप्रमाणे दिवाळखोर सदस्याला सभासद राहता येत नाही त्यामुळे सायमनचे राजकीय भवितव्य जवळजवळ संपल्यातच जमा होते.

इंग्लंडमध्ये कोणत्याही कंपनीचे शेअर्स जेव्हा विक्रीला काढले जातात तेव्हा शेअर होल्डरचे नाव गुप्त ठेवले जाते. मिडलँड ही नेदरकोट कंपनीची प्रमुख (principal) बँक असल्याने सेमूर बँकेने नेदरकोट कंपनीचा अकाऊंट बंद केल्याची बातमीही रॉनीला मिळाली नसती.

मिडलँड बँकेने अचानक रॉनी नेदरकोटला महिनाभरात नवीन बँक शोधण्याची विनंती केली तेव्हा रॉनीचे धाबे दणाणले. त्याने कंपनीच्या संचालक मंडळाची सभा बोलवून परिस्थिती विषद केली. रॉनीला सायमनच्या भवितव्याचीच जास्त चिंता होती.

आठवडाभर विचार करून सायमनचे निम्मे केस पांढरे व्हायची पाळी आली होती. महिनाभरात एक लाख पौंड उभे करणे काही सोपी गोष्ट नव्हती. एकदा कंपनीचे दिवाळे निघाले की सायमनचा सगळा पैसा पाण्यात जाणार होता. मुलांना कॉलेजला पाठवायला सुद्धा त्याच्याकडे पैसे उरले नसते.

सायमनने इलिझाबेथला सगळी हकिगत सांगितली तेव्हा ती म्हणाली 'मी तुला पहिल्यापासून रॉनीबद्दल बजावत होते हा माणूस तुला कधीतरी गोत्यात आणेल.' पण सायमनला माहीत होते चूक त्याचीच होती. त्याने इतके शेअर्स घ्यायची गरज नव्हती. आता रॉनीला दोष देण्यात काही अर्थ नव्हता.

एक आठवड्यानंतर त्याने इलिझाबेथला सांगितले की, त्याने हाऊस ऑफ कॉमन्समधून राजिनामा द्यायचे ठरविले आहे. थॅचरला काय स्पष्टिकरण द्यायचे हे त्याने अजून ठरवले नव्हते.

सायमनच्या पकल्ब्रिज मतदार संघाच्या कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे चेअरमन मिलबर्न ह्यांच्याकडे सायमनने राजिनाम्याचे पत्र देण्याचे ठरविले. महिना अखेरपर्यंत रॉनी नेदरकोटला नवीन बँक धुंडाळण्यात अपयश आले तेव्हा रॉनीने दिवाळखोरीची नोटीस द्यायचे निश्चित केले आणि सायमन गाडी घेऊन पकल्ब्रिजला निघाला. इलिझाबेथलाही त्याच्याबरोबर यायचे होते पण सायमन म्हणाला त्याला एकटेच जायची इच्छा होती.

सायमनची कहाणी ऐकून मिलबर्नला वाईट वाटले. सायमनने राजिनाम्याचे पत्र दिल्यावर मिलबर्न म्हणाले 'मी मंगळवारपर्यंत वाट पाहातो. रॉनीची नोटीस पेपरात आली की तुझा राजिनामा जाहीर करता येईल.' सायमनला गाडीशी सोडताना मिलबर्न म्हणाले पहिल्या निवडणुकीतच तू इथल्या लोकांमध्ये प्रिय झाला होतास. माझी निवड अचूक होती. तुझे दुर्दैव हे आमचेही दुर्दैव आहे.'

पकल्ब्रिजहून लंडनला परतताना वाटेत सायमनने गाडीतला रेडिओ लावला. दर अर्ध्या तासाने बीबीसीवर न्यूज फ्लॅश येत होता. बातमी ऐकून सायमनला धक्काच बसला. पंतप्रधान हॅरॉल्ड विलसननी राजिनामा दिला होता. वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्याने विलसनना आता पक्षातल्या दुसऱ्या कुणीतरी आपली जबाबदारी उचलावी असे वाटत होते. सायमनला क्षणभर आपल्या दुःखाचा विसर पडला 'आता कोण पंतप्रधान बनणार –जेम्स कॅलहॅन की मायकेल फूट ?'

रेमंडने रेडिओवर बातमी ऐकली तेव्हा तो केट बरोबर घरी होता.

'आता रेमंड गोल्ड यांचा वनवास संपला म्हणायचे तर' केट म्हणाली.

'काही नेम नाही. कोण पंतप्रधान बनेल याच्यावर सर्व अवलंबून आहे कॅलहॅन मॉडरेट आहेत पण मायकेल फूटला पक्षातल्या डाव्या गटाची सहानुभूती आहे.'

केट आता रेमंडच्या फ्लॅटवरच रहायला लागली होती. रेमंडने रोज विषय काढला तरी तिची लग्नाला तयारी नव्हती.

'मी तुला हजारदा सांगितलंय मला अमेरिकेला परत जायचे आहे. ब्रिटनच्या भावी पंतप्रधानांची पत्नी व्हायची माझी इच्छा नाही.'

'ब्रिटनच्या तीन पंतप्रधानांच्या बायका अमेरिकन होत्या' रेमंडने तिला गंभीरपणे सांगितले.

'टू हेल विथ युवर हिस्टॉरिकल प्रिसिडेंटस्' केट म्हणाली, 'शिवाय तुझा लीडस् मतदार संघ मला बिलकुल आवडत नाही. आपण मित्र आहोत तेच उत्तम.' केटशी वाद घालण्यात काही अर्थ नव्हता.

विलसन यांच्या घोषणेनंतर दोन दिवसात संसदीय लेबर पार्टीची निवडणूक झाली. रेमंड आणि अँड्र्यू दोघांनीही जेम्स कॅलहॅनना

पाठिंबा दिला होता. पहिल्या फेरीत पराभव झाला तरी कॅलहॅन दुसऱ्या फेरीत निवडून आले. राणीनं पंतप्रधान पदाची सूत्रे हातात घेण्यासाठी कॅलहॅनना बकिंग हॅम पॅलेसमध्ये पाचारण केले.

नवे पंतप्रधान आल्यानंतर त्यांना आपल्या इच्छेनुसार मंत्रिमंडळ बनविणे सोपे पडावे म्हणून आधीच्या मंत्रिमंडळातील सर्व सदस्य राजिनामा सादर करतात. अँड्र्यूनेही इतर मंत्र्यांप्रमाणे त्याच्या मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर होम या पदाचा राजिनामा दिला.

रेमंड कोर्टात अशिलाची बाजू मांडत होता. तेवढ्यात त्याच्या ज्युनिअर वकिलाने त्याला एक चिठ्ठी दिली. रेमंडला ताबडतोब टेन डाऊनिंग स्ट्रीटला फोन करायला सांगितले होते. कोर्टातले काम आणखी तासभर चालले. रेमंड घाईघाईनं बाहेर पडला आणि पब्लिक टेलिफोन बूथ मधून फोन लावला. सेक्रेटरीनं फोन पंतप्रधानांकडे जोडला.

'गुड अफ्टरनुन रे' कॅलहॅनचा आवाज ओळखायला रेमंडला वेळ लागला नाही.

'आय् थिंक् इटस् टाईम यू रिजॉईन द् गव्हर्नमेंट अॅज मिनिस्टर ऑफ स्टेट अॅट द डिपार्टमेंट ऑफ ट्रेड.'

रेमंडन तात्काळ होकार दिला.

रिसिव्हर खाली ठेवून रेमंडन परत उचलला आणि बँक ऑफ अमेरिकेचा बरनं फिरवला. 'युरो बाँड मॅनेजर केट गर्थवेट प्लिज.'

बूथमधून बाहेर पडताना रेमंडला वाटले जॉईसलाही फोन करायला हवा होता.

(क्रमशः)

## रंगभूमी

# पी. डी. ए. चे नवे नाटक : हा खेळ संचिताचा

वि. भा. देशपांडे

दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीने काही निमित्ताने लोककलांवर आधारीत असलेल्या नाटकांचा स्पर्धावजा एक महोत्सव नुकताच पणजीमध्ये केला. पहिल्या फेरीसाठी ज्या संस्थांना निमंत्रित केले होते त्यामध्ये पुण्याची प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन ही संस्था होती. या संस्थेने अशोकजी परांजपे यांचे 'हा खेळ संचिताचा' हे नवे नाटक पेश केले. त्याचे सध्या प्रयोग चालू आहेत.

आपल्याकडच्या प्राचीन लोककथांमध्ये ज्या विशेष प्रसिद्ध कथा आहेत त्यामध्ये सटवाई आणि तिच्या मुलीची कथा एक महत्त्वपूर्ण मानली जाते. जी सटवाई साऱ्या मानवजातीचे भविष्य सांगू शकते तिच्या मुलीच्या जीवनात जेव्हा काही विपरीत घडते तेव्हा त्यातून निर्माण होणारे नाटय चक्रावणारे आहे. तोच कथेचा गाभा आहे. कोणत्याही लोककथेचा कथाभाग किंवा कथापण नाटयरचनेला आव्हानात्मक असते तसे याही कथेचे आहेच; पण कथानकापेक्षाही त्यातले जे सत्व असते ते निरंतर राहणारे असते. शतकानुशतके ते आपल्याला नवा अर्थ आणि आशय देत असते. अशी क्षमता असलेली सटवाईची, तिच्या मुलीची ही कथा आहे. आपला मुलगाच आपला प्रियकर होणे आणि त्याच्याशी विवाह होणे ही मूळची धक्कास्पद घटना. ही नाटकाच्या उभारणीला उपकारकच आहे. या कथेतले साम्य सोफोक्लिसच्या राजा इडिपस नाटकाशी सहजपणाने ध्यानात येणार आहे; पण हे नाटक इडिपसशी कथासाम्यापलिकडे कोणतीच जवळीक साधणारे नाही. सटवाईची कथा अस्सल भारतीय आहे त्यामुळे त्यातली पाळेमुळे शोधण्यासाठी परकियांची मदत किंवा हवाला घेण्याचा यत्न होऊ नये.

लोककथेवर आधारलेले नाटयरूप हे लोकनाटकाच्या हिशेबात आपल्यासमोर यावे अशी अपेक्षा असते; पण या नाटकाच्या संहितेने त्या अपेक्षा सर्वार्थाने पूर्ण केल्या नाहीत. यामध्ये लोकतत्त्व हे प्राणभूत न राहता सोयीसोयीने वापरल्यासारखे झाले आणि एकूण नाटयरूप नेहमीच्या नाटकाप्रमाणेच म्हणजे संवादांच्या भाराने वाकलेले असे झाले. एकूण संहिता खूपच पसरट झाली. वास्तविक लोककथेचा जीव जर लहान असेल (आणि तसा तो या कथेचा आहेच) तर प्रमाणापेक्षा संहितेचा विस्तार करण्यात मतलब नाही. हा विस्तार होण्याचे मुख्य कारण म्हणजे कथेच्या तपशिलात भराव टाकण्यासाठी ज्या गोष्टी नाटककाराने वापरल्या आहेत त्यांचे प्रमाण व्यस्त आहे. दर्शन, निवेदन आणि कथन यांचे प्रमाण समतोलाने येणे आवश्यक होते. लग्न, मुलाचा नामकरण विधी आदी गोष्टींच्या तपशिलाचा भरणा अनावश्यक वाटला. अशोकजी हे लोककलांचे प्रथितयश जाणकार म्हणून मानले जातात. त्यामुळे लोककलांच्या तपशिलाविषयी त्यांना अनेक गोष्टी ज्ञात असणार यात शंका नाही; पण लोककथेला येणारे नाटय मूळच्या कथेचे सत्व हरवून बसत नाही ना याची काळजी घ्यायला हवी, ती तितकी घेतली गेली नाही.

संहितेचे संपादन हे स्वतः जसे लेखकाने करावे अशी अपेक्षा असते, तसेच ते दिग्दर्शकाने करावे अशी अधिक अपेक्षा असते. दिग्दर्शक आहेत अजित सातभाई. अजितने या नाटकाचे प्रयोगरूप खूपच सुसह्य करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे; पण त्या प्रयत्नांना असलेल्या मर्यादा जाणवत होत्या. लोककलांवर आधारीत प्रयोगामध्ये नेहमी खटकणारी गोष्ट असते ती म्हणजे यात काम करणारे कलाकार नागर असतात. त्यांनी कितीही लोकरंगभूमीतील मंडळींचे सोंग काढायचे म्हटले तरी दिसणे, बोलणे, वावरणे यातल्या मर्यादा असतातच.

विशेषत: त्यातली कृत्रिमता त्रासदायक ठरते. या प्रयोगात तुलनेने तो भाग कमी प्रमाणात जाणवला. सटवाईच्या भूमिकेत सेवा चौहान, राधेच्या ( सटवाईची मुलगी ) भूमिकेतील अमृता सातभाई, राजा झालेला सारंग जोग ही तीन मंडळी यामध्ये महत्त्वाची होती. त्यांनी आपल्या भूमिका अभिनित करताना आवश्यक ते भूमिकेचे भान योग्य रीतीने राखले होते. अमृता सातभाईने राधेच्या जीवनातील अनेक भावच्छटा परिणामकारी पद्धतीने व्यक्त केल्या. विशेषत: अतिथी आल्यावरची स्थिती, समर्पण झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळची भावस्थिती, राजाने घातलेली लग्नाची मागणी, मुलगा झाल्यावर गंगार्पण करण्याची झालेली आज्ञा, आपल्यामुळे या राज्यात विपरीत घडते याची जाण, अशा अनेक गोष्टीतील तपशील बारकाव्याने व्यक्त झाल्याने प्रयोगाची गुणवत्ता अधिक होत गेली.

संगीताची बाजू सांभाळली होती राम कदम यांनी. रामभाऊ हेही लोकगीतांना चाली देण्यात तरबेज आहेत. त्यांनी इथेही चांगली कामगिरी केली. पण राजनर्तिका जेव्हा नाचते तेव्हाच्या गाण्याला तसेच आणखी काही जागी ' फिल्मी स्पर्श ' जाणवून गेला. त्यातला रांगडेपणा जेवढा यायला पाहिजे होता तेवढा न येता जी सफाई आली त्याने त्यातले ' लोक ' तत्त्व क्षीण वाटले. निवेदक हा काहीसा कीर्तनकाराच्या थाटाचा होता. ते काम केले श्रीराम खरे याने. आवश्यक ते गानकौशल्य आणि भूमिकेचा आब राखून त्याने आपली कामगिरी व्यवस्थित बजावली. पण त्याच्या मानाने भूमिकांचा ऐवज किंवा गायनाचा ऐवज कमी असूनही नंदू भागवत या नवोदित कलाकाराने लक्षवेधी कामगिरी केली. त्याने म्हटलेला पोवाडा, धनगरी गाणे, भारूड आदी प्रकार तडफेने पेश झाले. या कलाकाराचा उपयोग अधिक मोठ्या भूमिकेसाठी व्हायला हवा. विनोदक हा विदूषक, सोंगाड्या अशा विविध पद्धतीने लेखकाने लिहिलेला आहे. ती भूमिका राम चव्हाण यांनी केली. त्यांची कामातली सहजता, संवादफेकीची समयसूचकता आणि विनोद पोहोचवण्याची पद्धत उत्तम आहे. पण मुळात नाटककाराने या भूमिकेच्या तोंडी इतक्या शाब्दिक कोट्या चिल्लरपणाने टाकलेल्या आहेत की त्या पुढे पुढे असह्य होतात. त्याला आवर घालायला हवा. इतक्या वाह्यात विनोदाची गरज मनोरंजन म्हणूनही अपेक्षित नाही. अगदी छोट्या भूमिकेत पण लक्षवेधी ठरलेले आणखी काही कलाकार म्हणजे ज्योतिषी झालेला दिलीप वेंगुर्लेकर, नर्तिका असलेली जयश्री केळकर इत्यादी.

नाटकाचे शीर्षक गृहीत धरून एक शीर्षक गान वापरले गेले, तसेच आपण सारेच कळसूत्री बाहुल्या आहोत यावर भर देऊन अनेक प्रवेशांच्या आरंभी पात्रांच्या हालचाली कळसूत्रीप्रमाणे ठेवण्याचा प्रयत्न होता. पण त्यातून विषय–आशय कळायला विशेष मदत झाली नाही उलट शब्द आणि कृती यांच्यातील पुनरुक्ती पुढे परिणाम उणावणारी झाली. □

चित्रपट

# रावण : दिग्दर्शक-लेखक-निर्मात्याची तारांबळ

रावण हे चित्रपटाचं नाव वाचल्यानंतर तुमच्या डोळ्यासमोर साधारण कशा प्रकारचा चित्रपट उभा राहतो? पौराणिक? निदान ' रावण ' बघण्याआधी माझ्या डोळ्यासमोर तरी अगदी सही सही पौराणिक नाही तरी पुराणकालीन अंश असलेला किंवा पुराणकालीन घटना आताच्या काळात रुजतील अशा रीतीनं काढलेला–अशी काहीशी कल्पना होती; पण चित्रपट पाहिल्यानंतर लक्षात येतं की, चित्रपटाच्या शीर्षकानं कशी गल्लत केली आहे ते ! कारण ढोबळमानानं बोलायचं झालं तर ' रावण ' हा चित्रपटही एक प्रेमाचा त्रिकोण ( किंवा चौकोन ) घेऊन आलेली प्रेमकथाच आहे. या प्रेमकथेला ' रावण ' हे काहीसं कर्कश आणि या नावाशी निगडीत पुराणकालीन संदर्भ मनात असल्यानं पूर्णतया विसंगत वाटतं आणि ' रावण ' हेच नाव का दिलं तेही कळत नाही.

रावण ( गुलशन अरोरा ) हा चित्रपटाचा नायक. त्याच्या नावावरून चित्रपटाला हे नाव दिलं म्हणावं तर चित्रपटाच्या नायकाचं नाव रावण का ठेवावं असा प्रश्न पडतो. निदान नायकाला जेव्हा एखादं वैशिष्ट्यपूर्ण नाव दिलं जातं, तेव्हा सर्वसाधारणपणं त्यामागं दिग्दर्शकाची काही विशिष्ट भूमिका असते. म्हणजे ' रावण ' असं नाव नायकाला दिल्यानंतर रामायणातल्या रावणाशी काही साधर्म्य दाखवण्याचा किंवा या निमित्तानं पुराणकालीन रावणाची प्रतिमा बदलण्याचा हेतू असावा, वगैरे. पण ' रावण' नायकाचा रामायणातल्या रावणाशी अर्थाअर्थी काही संबंध आहे, असं कुठंच जाणवत नाही. फक्त कथेच्या सोयीसाठी हे नाव निवडण्यात आलं असावं. कारण दसऱ्याच्या दिवशी सगळीकडे रावणाच्या प्रतिमेचं दहन करण्याची प्रथा असली तरी एक गाव असं आहे की, जिथं कुंभकर्ण आणि मेघनादाच्या प्रतिमा जाळल्या जातात; पण रावणाची मूर्ती फक्त उभी केली जाते, तिचं दहन केलं जात नाही. आणि याला कारणीभूत आहे ती रावण आणि गंगा यांची प्रेमकहाणी. मग फ्लॅश बॅक. आपल्या मदारी मामाबरोबर रस्त्यारस्त्यावरून खेळ करत फिरणारी गंगा ही एक असहाय्य तरुणी मनातली सगळी दु:खं, वेदना, व्यथा रात्री चंद्राजवळ बोलण्याची सवय असलेली. तिला नेहमी एक विश्वास वाटत असतो की, चंद्र येईल आणि आपल्या व्यथा दूर करेल. रावणही असाच एक मदारी. नंदू (विक्रम) आणि रावण जिगरी दोस्त. गंगाला पाहून रावण तिला पळवून न्यायचं ठरवतो; पण पळवून न्यायची वेळच येत नाही. कारण मामाच्या छळाला कंटाळलेली गंगा रात्री चंद्राशी बोलत असतानाच रावण तिथं येतो. आणि रावण चंद्राकडूनच आलाय असं समजून गंगा आपणहूनच त्याच्या स्वाधीन होते. आता गंगा, रावण आणि नंदू यांचं एक छोटंसं, छानसं आयुष्य सुरू होतं. गंगा रावणाकडे आदरमिश्रीत प्रेमानं बघते तर सदा आजारी असलेल्या नंदूकडे सहानुभूतीमिश्रीत प्रेमानं बघते; पण रावण गैरसमज करून घेतो

आणि चाकूच्या खेळात कपटानं नंदूला ठार करतो. पोलिसांना चुकवत रावण आणि गंगा एका सुनसान रेल्वे स्टेशनवर येतात. नंदूच्या सहवासाची सवय झालेली गंगा नंदूला विसरू शकत नाही. आणि दुसऱ्या दिवशी परत येण्याचं खोटं आश्वासन देऊन चिडलेला रावण गंगाला एकटीलाच त्या स्टेशनवर सोडून जातो. पोलीस त्याला पकडतात आणि जेलमध्ये टाकतात. तर इकडे रावणाची अव्याहत वाट बघणं ही एकमेव ओढ गंगाच्या जिवंत राहण्याचं कारण बनतं. नंतर जवळजवळ चौदा वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतर दोघांचं मीलन होतं ते दसऱ्याच्याच दिवशी आणि जळणाऱ्या रावणाचे अवशेष अंगावर पडून एकत्रच मरतात,

या चित्रपटात महत्त्वाची पात्र चारच. गंगा, रावण नंदू आणि स्टेशनमास्तर म्हणजेच गंगाच्या आयुष्यात तीन पुरुष येतात. तिघांच्या स्वभावाच्या तीन तऱ्हा. रावण हा खडबडीत, बेफिकीर आणि कोणत्याही गोष्टीच्या फारशा खोलात न शिरणारा. तर नंदू हळुवार, कवीवृत्तीचा आणि गंगाची मानसिक गरज पुरवणारा. रावण आणि गंगा दोघंही प्रेमासाठी, भावनिक आधारासाठी आसुसलेले आहेत. साहजिकच ही गरज आपापसात भागवण्याऐवजी ते नंदूकडे ओढले जातात. कारण नंदूचा मिळतं जुळतं घेण्याचा स्वभाव. रावण आणि गंगा दोघांना एकमेकांविषयी आकर्षण आहे; पण 'मुझे किसीकी जरुरत नही' असं सतत घोकणारा रावण आणि अपरिपक्व गंगा यांच्या भिन्न व्यक्तिरेखा एकमेकात मिसळू शकत नाहीत, असा काहीसा विचित्र तिढा आहे किंवा नंदूच्या कमजोरपणामुळं गंगाच्या त्याच्या बद्दलच्या भावना स्पष्ट व्हायला जसा वाव मिळतो. तसा वाव रावणच्या मनमानी स्वभावामुळं मिळत नाही. परिणामी हा तिढा हळुवारपणे न सोडवता रावण नंदूचा खून करण्याचा रासवट मार्ग स्वीकारतो. पण त्यामुळंही मीलन न होता दुरावाच निर्माण होतो. तुरुंगात एकटया पडलेल्या रावणाला जुन्या घटनांचे संदर्भ कळतात आणि मग त्याला उपरती होते. हाही त्याच्या स्वभावात होत गेलेला सूक्ष्म बदलच. दरम्यान स्टेशनवर एकटी पडलेल्या गंगाच्या दिशाहीन आयुष्याला आधार असतो तो रावणाची वाट बघण्याचा आणि स्टेशनमास्तरचा (ओम पुरी). गंगाचा तो अव्याहत इंतजार पाहून स्टेशनमास्तरला ती 'देवी' समान भासते तर गावकरी तिला वेडी ठरवतात. यावरून स्टेशनमास्तरला गंगाविषयी किती आपुलकी वाटते, ते लक्षात येतं; पण म्हणून गावात देवीचं देऊळ कुठे आहे, हे विचारणाऱ्या लोकांना उत्तरादाखल गंगाकडे बोट दाखवत 'सही देवी तो ये है' वगैरे म्हणणं म्हणजे फारच झालं. तसंच नंदूची पार्श्वभूमी जशी उजेडात येत नाही, तशीच स्टेशनमास्तरची. त्यामुळं या दोन्ही व्यक्तिरेखा गंगाच्या जीवनातले महत्त्वाचे टप्पे असूनही लोंबकळत राहतात.

## स्मिता पाटील–काय बोलावं ?

निर्माता, दिग्दर्शक आणि लेखक या तिन्ही भूमिका सांभाळताना जॉनी बक्षी यांची तारांबळ उडाली आहे. कथाकल्पना चांगली असूनही ती योग्य प्रकारे मांडता आलेली नाही ही दुर्दैवाची गोष्ट. तेच तेच प्रसंग आणि तेच तेच संवाद पुन्हा पुन्हा दाखवले गेल्यानं चित्रपटाची गतीही कमी होते. उदा रावण आणि गंगा मिळून खेळ करतानाचे प्रसंग किंवा गंगाचे वाट बघण्याचे प्रसंग. गाडी येणं, गाडी येताना पाहून, गंगाचं पळत येणं, रावण आलेला नाही पाहून निराशेनं ग्रासणं किंवा रावणाचं खेळ करणं म्हणजे फक्त चाकूचा खेळ. त्यानं चाकू मारणं, नंदूच्या घाबरल्यासारख्या प्रतिक्रिया, रावणाचं पैसे मागणं आणि लोकांनी धाड–धाड पैसे फेकणं...वगैरे. सुरुवातीला आपली आई आणि तीन छोटी भावंडं यांना सोडून येताना किंवा रावणाबरोबर खेळ करताना त्यांची आठवण होऊन कासावीस होणाऱ्या गंगाला पुढं त्यांची आठवणही होत नाही किंबहुना रावणाची वाट बघण्यात तिच्या आयुष्याची पहिली काही वर्षं अशी काही वजाच होऊन जातात, हे न पटणारं आणि त्यामुळेच चित्रपटाचा सुरुवातीचा भाग ठिगळासारखा वाटतो.

रावणाचं काम केलेला गुलशन अरोरा हा या चौघांमध्ये भाव खाऊन जातो. देखणी शरीरयष्टी लाभलेला हा तरुण 'रावण' ची सारी स्वभाववैशिष्ट्ये चांगली दाखवत असला तरी इमोशनल सीन्समध्ये कमी पडतो. तरीही त्याचे मदारी म्हणूनचे हावभाव, लकबी, रासवटपणा, तुरुंगातला अबोल अरेरावीपणा बघण्याजोगं. काही अपेक्षा ठेवाव्यात असा नट चित्रपटसृष्टीला मिळालाय. त्याची योग्य दखल घेतली गेली तर बरंय, नाही तर त्याची अवस्थाही विक्रमसारखीच व्हायची. विक्रम हा 'ज्यूली' चित्रपटाद्वारा आलेला कलाकार पुढं काही तग धरू शकला नाही. परिणामी अभिनेत्याकडून निर्मातापदाकडे वळला; पण 'रावण' मध्ये मात्र नंदूची छोटीशी भूमिका चांगली करून जातो. ओम पुरी हा सध्या फॉर्मात असलेला नट. तोही स्टेशनमास्तरची भूमिका सहजी करून जातो. पण रावणप्रमाणे या दोघांच्या भूमिका मनावर ठसत नाहीत. कारण कथेत त्यांना न मिळालेला न्याय. मदाऱ्याच्या खेळाची किंवा स्टेशनवरील प्रसंगांची तीच तीच दृश्य दाखवण्यापेक्षा या दोन व्यक्तिरेखा अधिक स्पष्ट करायला हव्या होत्या. स्मिता पाटील ही एक बुजुर्ग अभिनेत्री. तिच्या अभिनयाचं तोंड आणि हात दुखेपर्यंत कवतिक झालंय. तेव्हा या चित्रपटातील भूमिकेची अशी काय भूल तिच्यावर पडली म्हणून तिनं ही भूमिका स्वीकारली असावी ? जॉनी बक्षीशी असलेल्या मित्रत्वाच्या संबंधातून तिनं या भूमिकेचा स्वीकार केला असण्याच्या शक्यतेची शक्यता अधिक वाटते. या गंगाच्या भूमिकेशी कुठे समरसच होता येत नाही. तिचा इंतजार मनाला कुठं भिडत नाही की, अस्वस्थही करीत नाही. स्मिताच्या अभिनयात जशी खास चमक आढळत नाही, तशीच जॉनी बक्षींच्याही दिग्दर्शनातही. त्यामुळं कथा गंगाची असूनही चित्रपट गंगाचा वाटत नाही. भगवान कृष्णाला पत्र लिहून पैसे मागवणारी नायिका आणि ते पाहून पोस्टातली माणसं पैसे गोळा करून पाठवतात. असले प्रसंग लहान मुलांच्या चित्रपटातच शोभून दिसणारे. चित्रपटाची पटकथा आणि संवाद कुणाचे आहेत याचा काहीच उल्लेख नाही.

'रावण' चं वैशिष्टय म्हणजे प्रवीण भट्ट यांचं छायाचित्रण आणि जगजीत-चित्रा सिंगचं संगीत. प्रवीण भट्ट यांचं आतापर्यंत 'मासूम', 'अर्थ', 'उमराव जान' या चित्रपटातील कामगिरीबद्दल कौतुक झालंच आहे, त्यात या चित्रपटाचाही समावेश व्हावा.

चित्रा सिंगच्या आवाजातलं 'मोहे आज न देखो हरजाई, मैं घरपे चुनरिया भूल आई, हे काहीसं लोकगीताचा बाज घेऊन आलेलं गाणं विशेष लक्षात राहणारं. स्मिता पाटी-लला नायिकेबरोबरच गायिका म्हणून पेश करण्याचा या चित्रपटानं प्रयत्न केला आहे. त्याचा पब्लिसिटीतही मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतला गेला; पण प्रत्यक्षात मात्र या गाण्याला कात्री लागली असावी. या चित्रपटाच्या पार्श्वसंगीतात फ्ल्यूटचा केलेला वापरही अप्रतिम.

— शुभदा रानडे

---

# नाट्यपंढरी



## ☐ गोखले–कोल्हटकर

मराठी रंगभूमीच्या मंदिरात गोखले–कोल्हटकरांच्या सेवेचा फार मोठा वाटा आहे. या मंडळींचा तिथं एवढा मोठा राबता होता नि आहे की, मंदिराच्या पायरीवर पाय ठेवला की, एखादा तरी गोखले–कोल्हटकर भेटतोच. मग तो सभामंडपात असेल, नाहीतर गाभाऱ्यात असेल ? ( नट–नाटककार–निर्माता कोणत्याही भूमिकेत असेल ) जितके गोखले-कोल्हटकर मला आठवतात तेवढे सांगतो. बाकीच्यांची क्षमा मागून इतकेच विनवितो की, त्यांनी आपल्या नावांची निशाणे शोधून घेऊन नाट्यपंढरीत सामील व्हावे. पंढरीच्या वारीला कुणी निमंत्रणाची का वाट पहातो ?

### गोखले

**रघुनाथराव गोखले** : उत्कृष्ट स्त्रीपार्टी– पार्वतीबाई ( तोतयाचे बंड ) खूप गाजलेली भूमिका भागीदार मालक–सामाजिक नाटक मंडळी. चित्ताकर्षक नाटकमंडळी.

**रामभाऊ गोखले** : रघुनाथरावांचे बंधू. श्रेष्ठ गद्य नट. गाजलेल्या भूमिका : प्रतापराव ( त्राटिका ) फाल्गुनराव, झुंझारराव मोहन (मोहनतारा).

**कमलाबाई गोखले** : (कमलाबाई कामत) रघुनाथरावांची पत्नी स्वतःचीच संस्था असल्याने अनेक प्रमुख भूमिका करीत. त्यांचा गुणविशेष म्हणजे, त्या स्त्री–पुरुष भूमिका सारख्याच कौशल्याने करीत. धैर्यधर-भामिनी (मानापमान), चारुदत्त–वसंतसेना (मृच्छकटिक) नारद (कृष्णार्जुन युद्ध).

**नानबा गोखले** : (नारायण रामचंद्र) आधी चित्ताकर्षक नाटकमंडळी नि नंतर स्वतःची लोकमान्य नाटकमंडळी. अस्खलित वाणीचे गुणी नट. डॉ. गुलाब (हाच मुलाचा बाप) नाना फडणीस (तोतयाचे बंड) या त्यांच्या खूप गाजलेल्या भूमिका.

**बाळकोबा गोखले** : बलवंत संगीत मंडळीचे प्रमुख नट. प्रसंगी कोणत्याही भूमिकेला उभे रहात. धनेश्वर–धुंडिराज (भावबंधन) चंद्र (ब्रह्मकुमारी) एक सेनापती (संन्यस्त खड्ग).

**नानासाहेब गोखले** : (गं. बि.) पत्रकार, नाटककार, अरुणोदय नाटक मंडळीचे मालक· प्राण प्रतिष्ठा, पोकळ प्रतिष्ठा, जनकोजी शिंदे, अनंत फंदी ही त्यांची नाटके.

**चंद्रकांत गोखले** : रघुनाथराव नि कमलाबाई यांचे पुत्र. लहानपणापासून रंगभूमीवर कामे. आताचे चरित्र अभिनेते धुंडिराज (भावबंधन) कबजी (बेबंदशाही) गणपतराव बेलवलकर (नटसम्राट) बॅरिस्टर, पुरुष, पर्याय, श्रद्धा इ. अनेक नाटके.

**लालजी नि छोटू गोखले** : चंद्रकांतांचे बंधू. उत्कृष्ट तबला पटू (तबला नवाज).

**बाबुराव गोखले** : कवी–नट–नाटककार. 'श्री स्टार्स' या संस्थेचे चालक. त्यांचे लोकप्रिय नाटक–करायला गेलो एक.

**विद्याधर गोखले** : पट्टीचे वक्ते, पत्रकार, नाटककार (थोडेसे नटही) संगीत नाटकांची परंपरा सांभाळणारे श्रेष्ठ नाटककार. सुवर्णतुला, मंदारमाला, पंडितराज जगन्नाथ, मदनाची मंजिरी, जयजय गौरीशंकर, स्वरसम्राज्ञी, बावनखणी अशी अनेक नाटके. रंगशारदा ही त्यांची स्वतःची नाट्यसंस्था.

**विक्रम गोखले** : उमदा तरुण नट. महासागर, स्वामी, बॅरिस्टर, जास्वंदी अशा गाजलेल्या अनेक नाटकांचा नायक. चंद्रकांत गोखले यांचा सुपुत्र.

**शरद गोखले** : 'मराठी रंगभूमी' या जयराम शिलेदार यांच्या नाट्यसंस्थेतील गायक नट. कृष्ण ( सौभद्र आणि स्वयंवर ) संशयकल्लोल ( अश्विन शेट ) अनेक संगीत नाटकातून भूमिका.

**मोहन गोखले** : नव्यानेच व्यावसायिक रंगभूमीवर भूमिका. कस्तुरीमृग, सूर्याची पिल्ले ही ते काम करीत असलेली नाटके.

### कोल्हटकर

**महादेवशास्त्री कोल्हटकर** : व्युत्पन्न विद्वान. नटवर्य चिंतामणराव कोल्हटकरांचे आजोबा. १८६७ मध्ये शेक्सपियरच्या 'ऑथेल्लो' चे प्रथम मराठीत भाषांतर केले. याचीच रंगावृत्ती म्हणजे, पुढे खूप गाजलेले देवलांचे 'झुंजारराव' नाटक होय. लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर : अजोड गायक नट. प्रामुख्याने मोहिनीरूपाचे स्त्री पार्टी. किर्लोस्कर संगीत मंडळीचे एक मालक. पहिली सुभद्रा ( संगीत सौभद्र ) पहिली मंथरा ( रामराज्यवियोग ) पुरुष भूमिका : कोदंड ( शारदा ) पुंडरीक ( शापसंभ्रम ) चारुदत्त (मृच्छकटिक) शूरसेन (वीरतनय ) अकाली मृत्यू.

**श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** : (तात्यासाहेब) कवी, नाटककार, विनोदी लेखक, स्वतंत्र सामाजिक नाटकांचे जनक. वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन, वधूपरीक्षा ही त्यांची स्वतंत्र शैलीची नाटके. राम गणेश गडकरी यांचे गुरू. अच्युतराव कोल्हटकर ( साहेब कोल्हटकर म्हणून प्रसिद्ध ) एक वादळी व्यक्तिमत्व. देशभक्त पत्रकार, तुफानी वक्ते, साहित्यिक,नाटककार 'संदेश' चे संपादक. ( संदेशकार ) सुंदोपसुंद, ताई तेलीण, नरिंगी निशाण. विवेकानंद ही त्यांची काही नाटके.

**चिंतामणराव कोल्हटकर** : अभिनय श्रेष्ठ गद्य नट. महाराष्ट्र नाटक मंडळीत पहिले पासून. नंतर 'श्री भारत' नि 'किर्लोस्कर.' किर्लोस्करमध्ये गडकऱ्यांचे 'पुण्यप्रभाव' बसविण्याचा मान. पहिले वृंदावन. बलवंत संगीत मंडळीचे एक मालक. संस्थेची सर्व नाटके त्यानीच निवडली आणि दिग्दर्शित केली.

गाजलेल्या भूमिका : वृंदावन–पुण्यप्रभाव, घनःश्याम–भावबंधन, साबाजी–राजसंन्यास, मातंग युवराज–रणदुंदुभी, विक्रमसिंह–

संन्यस्त खड्ग, कमलाकर–प्रेमसंन्यास किती म्हणून त्यांच्या भूमिका सांगाव्या? नाट्यसंगीत अकादमीकडून श्रेष्ठ अभिनेते म्हणून गौरव. महावस्त्र, मानचिन्ह नि सनद, 'बहुरूपी' हा त्यांचा आपल्या कारकीर्दीचा आढावा घेणारा आत्मचरित्रात्मक ग्रंथ. या ग्रंथाचा (खऱ्या अर्थाने एका बहुरूप्याचा) साहित्य अकादमीकडून सन्मान नि पाच सहस्र रुपयांचे पारितोषिक.


**प्र. श्री. (बापूराव) कोल्हटकर :** श्रीपाद कृष्णांचे चिरंजीव. पत्रकार, नाटककार. सेवा, वृद्धाश्रम, बातमीदार ही त्यांची काही नाटके.

**चित्तरंजन कोल्हटकर :** एक मातबर नट. जुन्या नव्या पिढीचा सुवर्णमध्य. जुन्या नव्या नाटकातून अनेक समर्थ भूमिका. नटश्रेष्ट चिंतामणरावांचे सुपुत्र. त्यांच्या काही लोकप्रिय भूमिका : खंडोजी–बेबंदशाही, नूपुर–पुण्यप्रभाव, जिवाजी कलमदाने–राजसंन्यास, सुधाकर आणि तळीराम–एकचप्याला, घनःश्याम आणि कामण्णा–भावबंधन, सदू–दुरिताचे तिमीर जावो, शंभू महादेव–अश्रूंची झाली फुले, विंतो बापूजी–विषवृक्षाची छाया.

**बाळ कोल्हटकर :** नामवंत नट नि नाटककार. जुन्या अनेक नाटकातून विनोदी भूमिका. कामण्णा–भावबंधन, तळीराम–एकचप्याला, कमालखान–शिवसंभव अशा अनेक. ते आपल्या स्वतःच्या नाटकातून प्रमुख भूमिका करतातच. अत्यंत लोकप्रिय नाटककार. त्यांच्या अनेक नाटकांचे शेकड्यांनी प्रयोग झाले आहेत नि होत आहेत. बहुतेक खेळ त्यांच्या स्वतःच्या 'दुर्वांची जुडी' या नाट्यसंस्थेद्वारे होतात. त्यांची नाट्यसंपदा विपुल आहे. काही अत्यंत नावाजलेली नाटके: मुंबईची माणसे, एखाद्याचं नशीब, वेगळं व्हायचंय मला, दुरितांचे तिमिर जावो, वहातो ही दुर्वांची जुडी, सीमेवरून परत जा, देव दिनाघरी धावला, उघडले स्वर्गाचे दार इत्यादी.

**दिलीप कोल्हटकर :** नट, दिग्दर्शक, प्रकाश-योजनाकार अशा विविध भूमिका बजावित असलेला तरुण कलावंत. भूमिका–जास्वंदी, हमीदाबाईची कोठी. प्रकाश योजना–दिग्दर्शन-देणाराचे हात हजारो, उघडले स्वर्गाचे दार, उचल बांगडी इत्यादी.

**मधुसूदन कोल्हटकर :** नट, निर्माता. एकचप्याला (सुधाकर) बेबंदशाही (संभाजी) ही नाटके नि या भूमिका सातत्याने सादर करतात.



**ह्या ना त्या निमित्ताने : पृष्ठ ४ वरून**

आहेत ह्याचीही बातमी दिली गेली होती. काश्मिर दरीमध्ये तिन्हीच्या तिन्ही जागा फारुक अब्दुल्लाकडे गेल्याचे आधीच जाहीर झाले होते.

श्यामने तेलगु-देशमला व फरुक अब्दुल्लाला सगळ्या जागा गेल्याबद्दल काही बोलायचा प्रयत्न केल्याबरोबर सगळ्यांनी त्याला धडकावून टाकले होते. बर्वे तर म्हणाले सुद्धा की, गेल्या ५–२५ जागा तेलगु देशमला वा ३–४ त्या फरुक अब्दुल्लाला तर काय मोठा फरक पडतो.

'ह्यांचा स्वभाव असाच आहे' राधाने बर्व्यांच्या सुरात सूर मिसळत म्हटले. ह्यांना कोणाचे चांगले झालेले पहावतच नाही. आता कॉंग्रेसला इतक्या शेकड्यांनी जागा मिळताहेत तर हे तेलगु-देशम व फरुक अब्दुल्लाबद्दलच कुरकुरत रहातील.'

त्यामुळे श्यामला चूप बसणे भाग पडले; पण तरी त्याचे मन काही चूप बसेना. दू. द. वर कॉंग्रेसच्या यशाची मीमांसा चालली होती. राजीव गांधींना मत म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेला, देशाचा अखंडपणा राखण्याला मत आहे असे अधिकारी माणसे सांगत होती. पण मग ह्याचा अर्थ तेलगु देशमचा पुढाऱ्यांना वा अब्दुल्लाला एकात्मता व देशाचा अखंडपणा नको आहे काय? राजीव जर तरुणांचा पुढारी आहे, तो पूर्वीच्या धोरणांचे सातत्य राखून नव्या गोष्टी करेल म्हणून त्याला लोकांनी प्रचंड मताने निवडून दिले आहे म्हणून ही विद्वान मंडळी सांगत होती. मग काय आंध्राच्या व काश्मिरच्या लोकांना तरुण नेता नको होता? त्यांना सातत्य टिकवून नव्या गोष्टी आणणाऱ्या पुढाऱ्याची हौस नव्हती?

बाकी हिंदुस्तानात एक व तेलगु-देशम व काश्मिरमध्ये वेगळे चित्र का? हा प्रश्न श्यामला अस्वस्थ करू लागला.

कर्वे विचारे उद्या कचेरीत जायचे आहे म्हणून उठून गेले. कॉंग्रेसच्या जागा वाढतच होत्या. कामत पती–पत्नी, राधा, बर्वे, कर्वीणबाई जणू काही आपणच निवडणुक जिंकलो आहोत ह्या आनंदात होते. आता राजीव गांधी मेनका गांधींपेक्षा काही लाखांनी जास्त मतांनी निवडून आल्याचे जाहीर झाले व राजीव लोकांना दर्शन देण्याकरता त्याच्या घरासमोरच्या सभेत येणार आहे कळल्यावर राधा तातडीने उठली व आपली जुनी शाल राजीव गांधींप्रमाणे लपेटती झाली.

आणि शेवटी कॉंग्रेसला ३९४ जागा म्हणजे ८० टक्के मतदान झाल्याचे जाहीर झाले. त्यावेळी राधा, 'मी म्हटलेच होते की, कॉंग्रेसला जवळजवळ ४०४ जागा मिळतील.' असे मराठी दैनिकाच्या संपादकाप्रमाणे म्हणाली होती व अगदी हतबद्ध होऊनसुद्धा श्याम कपाळाला हात लावायचे भान विसरलाच होता.

तेलगु-देशमला २८ जागा मिळाल्या होत्या व ५ जागा बिगर कॉंग्रेस उमेदवारांना मिळाल्या होत्या म्हणजे ४० जागांपैकी फक्त ६च जागा कॉंग्रेसला मिळाल्या होत्या. जम्मूच्या जागा कॉंग्रेसला मिळाल्या होत्या तर काश्मिरच्या सगळ्या फारुकलाच मिळाल्या होत्या.

बाकी हिंदुस्थानात इंदिरा-राजीव लाट होती तर आंध्रमध्ये वा काश्मिरमध्ये कोणती लाट होती? त्याबद्दल राधा बोलत नव्हती वा मराठी दैनिकाचे संपादक वा दू. द. वरच्या अधिकारी व्यक्ती!

हिंदुस्थानच्या इतिहासात सुभे जड झाल्याची उदाहरणे भरपूर आहेत. निजाम दिल्लीच्या बादशहाचे ऐकेना व होळकर, गायकवाड, शिंदे पेशव्यांचे. आपली स्वतंत्र राज्ये स्थापण्याचे त्यांचे स्वप्न.

भारत देशापेक्षा भारतातल्या लोकांना त्यांचा प्रांत जवळचा वाटतो, समजतो. संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी असेच सगळे कॉंग्रेसचे उमेदवार लोकसभा निवडणुकीत हरले होते. संयुक्त महाराष्ट्राचा पक्ष आजही असता तर येथेसुद्धा तेलगु-देशमसारखी परिस्थिती झाली असती.

महाराष्ट्राचे व देशाचे भाग्य असे की, संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे नेतृत्व चांगल्या व सुबुद्ध लोकांकडे होते. त्यामुळे प्रांतियता-वाद बोकाळला नाही.

पण तेलगु-देशममध्ये वा काश्मिरमध्ये तसेच होईल का? तेथे फुटीर वृत्ती बळावणार नाहीत ना? आज पंजाबचा प्रश्न उभा आहे. उद्या काश्मिर, तेलगु-देशमचा प्रश्न उभा रहाणार नाही ना?

आणि उद्या असा प्रश्न उभा राहिला की राधा, मराठी दैनिकाचे संपादक व तत्सम मंडळी म्हणणारच की, 'आम्ही म्हटलंच होतं आधीच की, हे प्रश्न निर्माण होणार आहेत' म्हणून!

□

प्राप्तीकरदात्यांच्या

माहितीसाठी

# आतां दुप्पट नफा

# ६ वर्षीय

# राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रें

प्राप्तीकर कायद्याच्या नियम ८०-सीच्या अंतर्गत भविष्य निधी, जीवन विम्याचा हप्ता, १० वर्षीय आवर्त मुदतबंद ठेव यातील रकमेवर प्राप्तीकरात जो सवलत मिळते ती सवलत आतां ६ वर्षीय राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रांत केलेल्या गुंतवणूकीला पण लागू करण्यात आली आहे. यात ६ व्या आणि ७ व्या मालिकेचा समावेश आहे.

## ६ वी मालिका

★ रु. १००० चे ६ वर्षांत रु. २०१५ होतात.

★ १२ टक्के अर्धवार्षिक चक्रवाढ व्याज. मुदत पूर्ण झाल्यावर वाटप.

★ व्याजाचा वार्षिक हिशोब. त्यामुळे प्राप्तीकरात फायदा.

## ७ वी मालिका

★ यात रु. १००० गुंतविल्यास दर सहा महिन्यांनी आपणांस रु. ६० मिळतात आणि मुद्दल सुरक्षित राहते.

★ १२ टक्के व्याज, अर्धवार्षिक वाटप.

★ नियमित प्राप्तीच्या दृष्टीने आदर्श योजना.

विविध गुणकात दोन्ही मालिका उपलब्ध आहेत. आपणांस लाभदायक अशा मालिकेची निवड करा.

## दोन्ही मालिकेंत विविध फायदे

- गुंतवणूकीवर मर्यादा नाही.
- गरज वाटल्यास तीन वर्षांनंतर वटविता येतात.
- नामांकन करण्याची सोय.
- प्राप्तीकर कायदयाच्या नियम ८० एलच्या अंतर्गत रु. ७००० पर्यंत व्याजाची रकम (अन्य अधिकृत व्याजाच्या प्राप्तीसह) प्राप्तीकरापासून मुक्त.
- अन्य अधिकृत गुंतवणूकींसह रु. २,६५,००० पर्यंत गुंतवणूक केलेली रकम, संपत्तिकरापासून मुक्त.
- अरहिवासी व्यक्तींनी गुंतवणूक केल्यास त्यांना १ टक्का अधिक म्हणजे १३ टक्के व्याज मिळते. प्राप्तीकर मुक्त व्याज रकमेवर कमाल मर्यादा नाही.

सर्व टपाल कचेऱ्यांतून आणि अधिकृत एजंटांकडे उपलब्ध

डी ए वी पी 84/134

# राष्ट्रीय बचत संघटना

पोस्ट बाक्स नं० 96, नागपुर-6